# माणूस

शनिवार । १९ जुलै १९७५ । एक रुपया

....आपल्या ' माणूस 'मधून आजपर्यंत अनेक कथा वाचावयास मिळाल्या. परवापर्यंत पॅपिलॉन वाचावयास मिळाली. एखादी नवीन कथा सुरु कराल या आशेने ५ जुलैचा अंक बघितला; पण निराशा झाली.

—अशोक वाघ, पालघर

पॅपिलॉन सुरू झाल्यापासून तर माणूसची आम्ही सर्वजण वाट पाहात होतो व तो आल्यावर सर्वांच्या त्यावर उड्या पडत होत्या.

—लीना ढवण, पार्ले

अलिकडील पॅपिलॉन लेखमाला हे अंकाचे एक आकर्षण झाले होते.

—विठ्ठल जोशी, गिरगाव

पॅपिलॉन या कथेचे स्वरूप काही और होतं. पुढील अंक कधी हातात पडतो याची उत्कंठा लागलेली असायची. माझे काही मित्र अगदी नियमितपणे ' माणूस ' माझेकडून केवळ याच कथेसाठी घेऊन जायचे.

—कुं. ल. पुरी

## स्वतःच्या सुटकेसाठी सतत बारा वर्षे धडपडणारा, त्यासाठी नव्या नव्या संकटांना धैर्याने तोंड देणारा हेन्री शॅरियर ऊर्फ पॅपिलॉन वाचकांना मनापासून आवडला.

## स्वतःच्या सुटकेसाठी सतत सत्तर दिवस बर्फाच्छादित अँडीज पर्वतावर, मृत्यूशी जीवघेणी झुंज घेणाऱ्या सोळा लोकांची पुढील अंकापासून सुरू होत असलेली दुसरी एक सत्यकथाही वाचकांना आवडेल........

अनुवाद : रवींद्र गुर्जर

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : पंधरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १९ जुलै | अंक : सहावा-सातवा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


# माझा सुधारित गोबर गॅस प्लँट

कृष्णकांत र. विसपुते, विसपुते इंजिनियरिंग अँण्ड रीसर्च वर्क्स

इंधनाचा तुटवडा आज ना उद्या केवळ भारतालाच नव्हे तर साऱ्या जगालाच पडेल याची कल्पना विचारवंतांना बऱ्याच वर्षांपासून आलेली आहे. यावर उपाय शोधण्यासाठी गेली १५–२० वर्षे मीही प्रयत्नशील असून त्या दृष्टीने गोबर गॅस प्लँटचा उपयोग देशाला चांगला होईल असे मला वाटल्याने मी आपल्याकडील परिस्थितीत जास्तीत जास्त उपयुक्त होईल, असे गोबर गॅसचे संयंत्र बनविण्याचे प्रयत्न गेली कित्येक वर्षे करीत आहे. मी पूर्वीच गोबर गॅसचे एक डिझाइन बनविले असून त्यासंबंधीची सचित्र माहिती 'संपदा'च्या मे १९६१ च्या अंकात व इतरही काही नियतकालिकांत प्रसिद्धही केली आहे. जिज्ञासूंनी तो माझा लेख अवश्य पहावा, अशी विनंती आहे.

अरब-इस्रायल युद्धानंतर मध्यपूर्वेतील अरब देशांनी संगनमत करून खनिज तेलपुरवठा आखडता घेतला व त्याचे दरही भरमसाठ वाढविले. त्यामुळे साऱ्या जगावरच आज तेलसंकट ओढवले आहे. त्यामुळे पर्यायी इंधनाकडे जगाचेच लक्ष वेधले आहे. अर्थात् भारतातही इंधनासाठी गोबर गॅसचा वापर करण्याच्या प्रश्नाला पुन्हा चालना मिळाली आहे. अशी गोबर गॅस संयंत्रे बसविण्यासाठी सरकार सहाय्यदानही देऊ लागले आहे. असे असले तरी जनतेचे अजूनही या प्रश्नाकडे जावे तसे लक्ष गेलेले नाही ही खेदाची गोष्ट आहे.

असे असले तरी मी मात्र इंजिनियरिंग क्षेत्रातील एक कार्यकर्ता ह्या नात्याने गोबर गॅस प्लँटची रचना पूर्णत्वास कशी नेता येईल व त्या संयंत्रांचा उपयोग ग्रामीण आणि नागरी भागासही कसा होईल या दृष्टीने आजवर संशोधन करीतच राहिलो आहे. १४ वर्षांपूर्वी गोबर गॅस प्लँटचे मी एक डिझाइन 'संपदा'मध्ये प्रसिद्ध केले होते. त्यानंतरच्या कालावधीत मला या संयंत्रात आणखी काही सुधारणा कराव्याशा वाटल्या. त्या सुधारणा करून नव्या गॅस प्लँटचे पेटंटही मी नुकतेच घेतले आहे.

अन्न शिजविणे, दिवे लावणे आणि गॅस इंजिन चालविणे एवढी उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवूनच सामान्यपणे आजवर गॅस प्लँटच्या रचना आखल्या जात असत; परंतु उद्योगधंद्यासाठीसुद्धा या गोबर गॅसचा उपयोग करून घेता येईल, असे माझे मत बनले असल्याने आजवर विविध प्रयोग करून मी या प्लँटच्या रचनेबाबत काही गोष्टी हस्तगत केल्या असून त्या पुढीलप्रमाणे :–

१. सिलिंडरमध्ये हायप्रेशरने हा गॅस भरणे व ते सिलिंडर मोटारीत बसवून त्यावर मोटार चालविणे, २. गॅस भरलेल्या सिलिंडरच्या सहाय्याने कारखान्यात वीजनिर्मिती करणे, ३. गॅस वेल्डिंगकरिता या वायूचा उपयोग करणे आणि ४. बॉयलरला इंधन म्हणून त्याचा उपयोग करणे इ.

गोबर गॅसचे प्रेशर गॅस जनरेटरमध्ये ठराविक म्हणजे ४ ते ६ इंच वॉटर कॉलम किंवा अंदाजे दर चौरस इंचाला $\frac{1}{6}$ ते $\frac{1}{5}$ पौंड एवढे असू शकते. त्यामुळे गॅसचा औद्योगिक वापर कसा करावा हा प्रश्न निर्माण झाला. काही लोकांनी या गॅसचा बॉयलरला उपयोग होईल काय अशी विचारणा केली. श्री. भाऊसाहेब पटवर्धन, सप्तलिंगी फलोद्यान कृषि उद्योग, देवरूख (जि. रत्नागिरी) यांना सिट्रोनेला गवतापासून तेल काढण्यासाठी लागणाऱ्या बॉयलरला हा गॅस हायप्रेशरने वापरून त्यांचा बॉयलर मी चालू करून दिला आहे. त्या गॅसचे प्रेशर वाढविण्यासाठी एक छोटे उपकरण गॅस जनरेटर आणि बॉयलर यांच्यामध्ये बसवून तो कार्यभाग साधता आला आहे. गॅस वेल्डिंगसाठी याचा उपयोग कसा करता येईल ह्याबाबत संशोधन चालू आहे. कॅलशियम कार्बाइडऐवजी जर याचा उपयोग झाला तर वेल्डिंग काम बरेच स्वस्त होऊ शकेल. कॅलशियम कार्बाइड (अॅसिटेलीन गॅस) $C_2H_2$ आणि गोबर गॅस म्हणजे मार्श किंवा मिथिन गॅस $CH_4$ अशी त्यांची सूत्रे आहेत. या दोन गॅसमधील गुणधर्म काहीसे वेगळे असल्याने गोबर गॅसचा वेल्डिंगसाठी उपयोग होण्यासाठी आणखी संशोधन आवश्यक आहे.

१९६१ व १९७४ मधील गॅस प्लँटच्या डिझाइनांवरून अस्तित्वात असलेल्या गॅस प्लँटमधील फरक सहजगत्या समजण्यासारखे आहेत. आजवर गोबर गॅस प्लँटच्या रचनेत दोन मुख्य प्रश्न इंजिनियर व संशोधक यांना भेडसावीत होते. या समस्या सोडविण्यासाठी अनेक थोर संशोधकांचे प्रयत्नही चालले आहेत. यांपैकी एक प्रश्न म्हणजे या गॅस प्लँटच्या डायजेस्टर चेंबरमध्ये सतत लागणारे उष्णतामान कसे ठेवता येईल हा होय. दुसरा प्रश्न म्हणजे गॅस प्लँटमधील शेण

चोवीस तासात निदान एकदा तरी कसे ढवळले- जाईल हा होय. या दोन्ही समस्या सोडवून बनविलेला गॅस प्लँट हा महत्त्वपूर्ण व कार्यक्षम कसा ठरेल असे संशोधकांना वाटू लागले असून याचा पुरावा इकॉनॉमिक व पोलिटिकल वुइकली ऑगस्ट १९७४ च्या अंकातील Bio-gas Plants : Prospects, Problems and Tasks लेखक सर्वश्री सी. आर. प्रसाद, के. कृष्णप्रसाद व ए. के. एन. रेड्डी यांच्या लेखात सापडतो. ते या लेखात पृष्ठ १३५६ वर लिहितात–

" With regards to the design of the digester itself, there are two main problems with current Indian designs (1) the lack of adequate agitation of the fermentation mix and (2) the absence of proper temperature control. When slurry is not adequately agitated, a stratification takes place with the sludge setting under thick layer of supernatant liquid on which floats the layer. The minimisation of stratification increases the gas yield, and therefore some method of mixing has to be introduced, for example, mixing by re-circulating the bio-gas by intermittently operated manual stirrers or by wind mill driven agitator. "

विद्वानांना भेडसावणाऱ्या उपरोक्त समस्या मी १९६१ मध्येच टेंपरेचर कंट्रोल आणि गॅस व शेणाचा गाळ यांचे एका पंपाद्वारे अभिसरण (circulation) करून सोडविल्या आहेत. माणसाने फिरवून किंवा पवनचक्कीने हे काम करविणे अत्यंत खर्चाचे आहे. गॅस लिकेजप्रूफ स्टरर बनविणे मोठे जिकिरीचे होईल. कारण त्यातील बॅक्टीरिया अॅनाबिर्क ह्या हवेत न जगणाऱ्या असल्याने त्यांना बाहेरची हवा लागल्यास त्या नष्ट होण्याची भीति आहे. म्हणून उपरोक्त तऱ्हेचे स्टरर बनविणे अत्यंत कठीण आहे. म्हणून हा प्रश्न मी स्वयंचलित गॅसपंपाच्या द्वारे सोडविला आहे.

माझ्या मते लहान प्लँटपेक्षा मोठे ५००, ते ५ हजार, दहा हजार अशा प्रमाणात केल्याने त्यांची उपयुक्तता व महत्त्व पटेल. प्लँटमध्ये नवे शेण भरल्यावर बाहेर पडणाऱ्या शेणापासूनही तितकाच गॅस निर्माण होतो म्हणून हे शेण दुसऱ्या प्लँटमध्ये घेणे फायदेशीर ठरेल. यामुळे कार्यक्षमता वाढेल व खताचा दर्जाही सुधारेल. जुन्या प्लँटचे शेण व गॅस यांचे प्रमाण १ किलोस १·३० घनफूट असे पडते तर तेच वरील योजनेमुळे माझ्या प्लँटमध्ये ३ ते ५ घनफूट मिळेल हे महत्त्वाचे आहे.

महानगरपालिका, मोठ्या वसाहती, कारखाने वगैरे की जेथे १ हजारहून अधिक माणसे काम करतात तेथे असे प्लँट असणे जरुरीचे आहे. पुणे म्यु. कॉर्पोरेशनने अशी गॅस प्लँट बसविली तर ५० ते ६० टक्के विजेची बचत होऊ शकेल असा अंदाज आहे.

### काही वैशिष्ट्ये

माझ्या नव्या प्लँटमध्ये पुढील वैशिष्ट्ये आहेत :

(१) हे प्लँट पूर्णपणे जमिनीच्या वर असल्याने कोठेही हलविता येते.

(२) संपूर्ण लोखंडी असल्याने किंमतीत थोडा–सुमारे दीडपट महाग आहे.

(३) प्लँट स्वच्छ करणे अगदी सुकर आहे.

(४) पूर्णत: लीकप्रुफ आहे.

(५) ग्रॅव्हिटी फीड नसून प्रेशर फीड असल्याने शेण हलविण्याची क्रिया होत असते.

(६) गॅस होल्डर वरखाली होत असताना शेणाचा गाळ हलविण्याची क्रिया आपोआप होते.

(७) टेंपरेचर मीटर असल्यामुळे गॅसनिर्मितीची खात्री.

(८) मोठ्या प्लँटला इलेक्ट्रिक हीटर असून लागणाऱ्या उष्णतेचे थर्मोस्टॅटने नियंत्रण होते. जेथे वीज नसेल तेथे गॅस बर्नर प्लँटखाली बसवून उष्णता देण्याची व्यवस्था आहे.

(९) गॅस काँप्रेसरने सिलिंडरे भरल्यास गॅसची निर्मिती झपाट्याने वाढते.

(१०) हा प्लँट जगाच्या कोणत्याही भागात चालू शकेल. तेथील हवामानाचा त्यावर कोणताच अनिष्ट परिणाम होणार नाही.

अतिशय क्षुल्लक वाटणारे पण अतिशय महान रत्न असे या गॅस प्लँटचे वर्णन करावेसे वाटते. गोबर गॅसकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. सरकार व काही संशोधक हे प्लँट स्वस्त कसे पडतील याकडे लक्ष देत आहेत. परंतु स्वस्त की महाग यापेक्षा त्याची कार्यक्षमता, सार्वत्रिक वापर यावर भर दिला पाहिजे, असे मला वाटते. त्या दृष्टीने अजून खूप संशोधन व्हायला पाहिजे. आजवर हे प्लँट जमिनीत विहीर करूनच केले जात होते व त्या पद्धतीत बदल करणे पटत नव्हते. सरकार, खादी ग्रामोद्योग मंडळ व टाटा आदि कारखानदार यांचे प्लँट सामान्यपणे एकाच तऱ्हेचे आहेत. □

[ –संपदा, जुलै १९७५ अंकावरून साभार ]

---

## मागील दि. १२ जुलै १९७५ चा अंक निघाला नाही.

---

# सोलकढी

## □ पुटकुळीवर नवे गळू

गुरुवार दिनांक २६ जून १९७५ रोजी, राष्ट्रपतींनी एक फर्मान काढून देशात आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्याचे घोषित केले आहे. तशी जुनी एक आणीबाणी तेवत होतीच; पण ती १९७१ साली परकीय आक्रमणाच्या संबंधात उद्भवली होती. आत्ताची ही नवी कोरीकरकरीत आणीबाणी अंतर्गत गडबडीमुळे देशाच्या सुरक्षिततेला धोका झाल्यामुळे वाढलेली आहे. एकूण, पुटकुळीवर नवे आणखी एक गळू यावे तसे झाले आहे. सुरुवातीला हे गळू थोडे ठुसठुसले; परंतु आता मात्र एखादी जन्मखूण असावी तसे ते आपल्या अंगवळणी पडले आहे.'

भारतीय जनतेचा हा अंगभूत समजूतदारपणा, हे या देशाचे एक भाग्यलक्षण आहे. वेडीविद्री परिस्थिती उभी ठाकली तरी आपण एकदम भांभांबावून जात नाही. सुरुवातीला क्वचित तसे झाले तरी ते फार काळ टिकत नाही. आपण, आपल्या नकळत, परिस्थितीचा शाखागामी आणि मूलगामी वेध घेऊन टाकतो; तिचे जे घट्टपातळ करायचे असेल ते एखाद्या जबाबदार व्यक्तीवर अथवा यंत्रणेवर सोपवून चुटक्या वाजवायला मोकळे होतो. नव्या आणीबाणीचे तसेच झाले. या प्रकारची ही पहिलीच आणीबाणी असल्यामुळे प्रथम लोक दचकले; पापशंकी झाले; अडगळीमध्ये पडलेली आपापली व्यक्तिमत्त्वे बाहेर काढून–पुसूनघासूनचकचकीत करून–बिल्ल्यांप्रमाणे दर्शनी लटकवायचाही विचार करू लागले; पण त्याचबरोबर देशाच्या सुरक्षिततेला धक्काधोका आहे हे त्यांनी नीटपणे ध्यानात धरले. स्वतः राष्ट्रपतींनीच तसे सांगितले होते. केंद्रीय शासनाने तसे अंदाजले होते.

सामान्य माणसाला त्यातले काही कळत नाही : कारण शिवाजीनगरचा हादरा पुण्याला बसत नाही; नाशिकच्या चिवडयाचा घमघमाट नाशिकरोडचे नाक खवळून सोडत नाही. त्याला कुंपणापर्यंतचे दिसते. त्यापलीकडे काय घडते आहे हे त्याला कोणी तरी सांगावे लागते. त्यामुळे पलीकडचे सगळेच पाहणाऱ्या केंद्रशासनाने 'आणीबाणी आहे' असे सांगितल्यावर, त्याच्या दिवसरात्रीची घडी विस्कटली नसली तरीसुद्धा, त्याने ती मानली. 'आणीबाणी' म्हणजे नेमके काय, हेदेखील सामान्य माणसाला ठाऊक नसेल. ते त्याला मुळापासून सोलूनसमजावून सांगावे यासाठी मी कोश धुंडाळले. कृ. पां. कुळकर्ण्यांच्या बृहत् व्युत्पत्तिकोशात 'आणीबाणी' हा शब्द नाही. य. रा. दाते–चिं. ग. कर्वे यांच्या सप्तखंडी 'महाराष्ट्र शब्दकोशा'तही त्याचा ठिकाणा नाही. 'आणि' हा शब्द आहे. 'बाणी' हा शब्द आहे. परंतु 'आणीबाणी' हा जोडशब्द मात्र नाही. कोशात नसलेल्या शब्दालाही अर्थ हा असतोच. मला वाटते, 'आणीबाणी' हे एका निकराला गेलेल्या अवस्थेचे नाव आहे. एका अर्थाने ती पूर्वावस्था असते तर दुसऱ्या अर्थाने उत्तरावस्था असते. विरोधी पक्षांनी हेकटपणे चालवलेल्या देशविघातक चळवळीमुळे केंद्रशासनाला नाइलाजाने 'आणीबाणी' पुकारावी लागली. (या अर्थाने आणीबाणी ही उत्तरावस्था आहे.) आणि आता आणीबाणी पुकारल्यामुळे जिकडेतिकडेचोहिकडे स्थैर्यसुखशांतिसमाधानाचे समशीतोष्ण वातावरण पैदा होईल. (या अर्थाने आणीबाणी ही पूर्वावस्था आहे.)

'आणीबाणी' हा नवा पदार्थ कसा तयार होतो आणि कसा लागतो याचे मी केलेले वर्णन वाचल्यावर वाचकांना तो आवडेल असे मानावे काय? माझ्यापुरते बोलायचे तर आणीबाणीमुळे माझ्या एरवीच्या सुखावर एक खरपूस अमीरी साय आली आहे : वर्तमानपत्रातला बाष्कळ व आक्रस्ताळी वाह्यातपणा लोपून जाऊन ती माझ्याशी आर्यपतिव्रतेसारखी बोलू लागली आहे. मराठी दुकानदारांचासुद्धा उर्मटपणा थोडा कमी झाला आहे. परवा तर एक बसकंडक्टर माझ्याशी अदबीने बोलला आणि सचिवालयात ज्याला भेटायला गेलो होतो तो चक्क आपल्याच जागेवर बसून काम करत बसलेला आढळला. मुख्य म्हणजे आपले सगळे जे चाललेले आहे त्याचा कर्ताकरविता कोणी दुसराच आहे, अशा अलौकिक आध्यात्मिक अनुभवाचा रोकडा प्रत्यय या आणीबाणीमुळे मला लाधला आहे. आनंद आहे. ज्याचा दोरा कोणा समर्थाच्या हातात आहे असा पतंग होऊन विहरण्यातली मौज, आपल्याच थिटया पंखांनी उडायचा अटाट करणाऱ्या पाखरांना केव्हाही लाभत नसते.

म्हणून या सुखकर्त्यादुःखहर्त्या आणीबाणीचे मी मोकळया मनाने स्वागत करतो.

तुम्हीसुद्धा स्वागत करा.

आपण सगळे स्वागत करू या. □

## □ दिवाभितरी संघटना

सी. आय्. ए. हे आद्याक्षरांकित संस्थानाव मी प्रथम केव्हा वाचले–ऐकले, आठवत नाही. त्याची ताबडतोब दहशत बसली एवढे मात्र आठवते आहे. ही एक प्रसंगी, ईश्वरी सत्तेला शह देऊ शकणारी शक्ती आहे, हे मला जाणवले होते. तिच्या कर्तबेगारीचा तपशील यथाकाल यथाप्रसंग वाचायला मिळत होता; त्यावरून ती हेपणतेपणकाहीपण करू शकते–करते हे पटले होते. आपल्या प्रिय भारतदेशापुरते बोलायचे तर इथे काँग्रेस आणि सी. आय्. ए. अशा दोनच संस्था कार्यरत असाव्यात अशी माझी समजूत झाली होती. खरे तर सी. आय्. ए. ने जगाच्या पाठीवरचा आणि अंतराळातला प्रत्येक देश आपलासा करून सोडला आहे, असे म्हणतात.

खुद्द आपल्या माहेरघरी–अमेरिकेत–मात्र ती संस्कारसंपन्न सासुरवाशिणीसारखी राहते असा लौकिक होता; परंतु नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या रॉकफेलर-अहवालाने या लौकिकाचा लगदा करून टाकला आहे. अहवालावरून असे दिसते की आयसेनहॉवर, केनेडी, जॉन्सन, निक्सन या सर्व अध्यक्षांचा सी. आय्. ए. वर वरदहस्त होता. अमेरिकेच्या स्वतंत्र नागरिकावर सी. आय्. ए. ने करडी पाळत गुप्तपणे ठेवली होती. हजारो नागरिकांच्या साध्यारंगीत माहितीने सी. आय्. ए. च्या खतावण्या खच्चून भरल्या होत्या. त्यांचे टेलिफोन चोरून ऐकायची पक्की व्यवस्था केलेली होती. पत्र फोडून वाचल्याशिवाय त्यावर टपालशिक्का मारला जात नसे. तिकडे सामान्य अमेरिकन नागरिक मात्र आपले घटनादत्त

स्वातंत्र्य कुरवाळत होता; लिंकनप्रणीत लोकशाहीचा आदर्श प्रत्यक्षात आणला पाहिजे असे स्वतःला बजावत होता; इतर देशांच्या स्वातंत्र्यसंग्रामात रक्त सांडत होता; आपल्या स्वर्गीय सुबत्तेला स्वातंत्र्याचे झळझळीत कोंदण आहे, असे मानत होता; स्वातंत्र्यदेवीने हाती धरलेल्या मशालीत निष्ठेचे इंधन जाळत होता.

असे काही पाहिले म्हणजे आपल्या भाग्याचा आपल्यालाच हेवा करावासा वाटतो. भारतात माणसांच्या जन्ममृत्यूंचे आणि इतर दाखलेसुद्धा शाबूत राहात नाहीत; मग झटून साधी रंगीत माहिती गोळा होणे शक्यच नाही. ज्याला मी रीतसर टेलिफोन करतो त्यालासुद्धा माझे बोंबोलणे धड ऐकू जात नाही; मग चोरून ऐकणाऱ्याचें काय होईल सांगा. पत्रावरचा पत्ता वाचायला इथे कर्मचाऱ्यांना वेळ नसतो; मग ते फोडून वाचायचा खटाटोप कोण करणार? आणि हे सगळे शक्य असते तरी स्वातंत्र्यासक्त भारतीय शासनाने ते कदापि केले नसते. स्वातंत्र्य, लोकशाही, समाजवाद या कल्पना भारतीय घटनेत साकळून थिजून राहिलेल्या नाहीत; त्यांचे चैतन्यशाली अभिसरण आमच्या नित्याच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनात सहज चाललेले असते.

अहो, ज्या भारतभूमीतली लेकरे मुक्त उपासूक्तेच निर्भयपणे गात असतात त्या भूमीत सी. आय. ए. सारखी दिवाभितरी संघटना कधीही रुजणार–फोफावणार नाही! ◻

## ◻ ननानि निनीनु नुनूने नेनैनो

शाळा नव्याने उघडल्या. महाविद्यालये पुन्हा सुरू झाली. नवे शैक्षणिक वर्ष अखेर आलेच. नवा अभ्यासक्रम, तो सोपा नाही. तो मुलांना यथासांग शिकवायचा तर मुलांनी जबाबदारीने वागायला हवे. बाकी सगळे कळले तरी तेवढे नेमके त्यांना कळत नाही. हवी तशी वागतात. आपसात त्यांनी काहीही केले तरी हरकत नाही हो. पण ती शिंची शिकवणाऱ्या बाईंना सतावतात. बाई तरी काय करणार? त्यांनी वर्गांतर्गत सुरक्षेसाठी आणि शांततेसाठी नन्नाचा जाहीरनामा काढून त्याची मातेच्या कठोरपणाने अंमलबजावणी केली. हसतखेळत शिकवायच्या नव्या पद्धतीनुसार मुलांना जे सांगायचे ते त्यांनी गाण्यात सांगितले. ते गाणे असे :

मुलांनो मुलांनो
बोलू नका बोलू नका
मुलांनो मुलांनो
हालू नका हालू नका १
मुलांनो मुलांनो
तापू नका तापू नका
मुलांनो मुलांनो
लपू नका लपू नका २
मुलांनो मुलांनो
खोकू नका खोकू नका
मुलांनो मुलांनो
शिकू नका शिकू नका ३
मुलांनो मुलांनो
रडू नका रडू नका
मुलांनो मुलांनो
ओर्डू नका ओर्डू नका ४
मुलांनो मुलांनो
पाहू नका पाहू नका
मुलांनो मुलांनो
हाहू नका हाहू नका ५
मुलांनो मुलांनो
खाऊ नका खाऊ नका
मुलांनो मुलांनो
गाऊ नका गाऊ नका ६
मुलांनो मुलांनो
मुलांनो मुलांनो
ननानि निनीनु
नुनूने नेनैनो ७
ननानिनीनुनूनेनैनोनौनंनः ।
ननानिनीनुनूनेनैनोनौनंनः ।।

हे गाणे एकटद्या आवाजात म्हटले पाहिजे असे नाही. मुलेही त्यात सहभागी झाल्यास ते समूहगीताच्या ढंगाने छान म्हणता येते. ◻

## ◻ कथांचे दोन प्रकार

कथा सांगणे आणि ऐकणे ही मानवाची आदिकाळापासूनची सहजप्रेरणा असावी, असे मानण्यास प्रत्यवाय नसावा, अशी, प्रशिक्षितपाटव लाभलेल्या (आणि लादलेल्या) मराठीच्या प्राध्यापकाच्या ऐटीत सुरुवात करता येईल. कथांचे स्थूलमानाने दोन प्रकार




संभवतात : काही कथा सत्य असतात; काही कथा सत्य नसतात. सत्य सांगणाऱ्या कथांबद्दल आपल्याला फारसे बोलता यायचे नाही. सत्य न सांगणाऱ्या, पण इतर बरेच काही सांगणाऱ्या, कथांबद्दल बोलण्यात गंमत आहे. दोन प्रकारच्या या कथा ऐकणारे-वाचणारे लोक मात्र कित्येक वेळा अगदी बगदादी वहार उडवून देतात. म्हणजे, कथा सत्य असते; संपूर्ण सत्य असते; पण लोक असे इस्पिकचे गुलाम की तिच्यावर विश्वासच ठेवत नाहीत. उदाहरणार्थ, देशात आणीबाणीची परिस्थिती असली तरी. आपल्या लोकशाही-यंत्रणेत मूलभूत स्वरूपाचा कोणताही बदल झालेला नाही, असे संपूर्ण सत्य पंतप्रधानांनी सांगितले; पण काही पाखंडी पंढरीनाथांना ते पटत नाही. इतके कशाला, महात्मा गांधी नावाचा एक अलौकिक माणूस या देशात, या शतकात, होऊन गेला हे सत्य तुम्हाआम्हाला चांगले ठाऊक आहे; पण नवीन गंडळींना ते खरे वाटत नाही. तसा पुरावा दाखवा, अशी अव्वाच्यासव्वा मागणी करतात ते. उलट, एखादी कथा सत्य नसते; ती सत्य नसणेच शक्य असते; पण लोक असे बदामचे एक्के असतात की ती सत्य मानून थुईथुई करत राहतात.

अडीच-तीन महिन्यांपूर्वी एका कानडी दैनिकात एक बातमी आली : बातमीत म्हटले होते की तेवीस मे रोजी चंद्रग्रहण असून त्यामुळे फार मोठा भूकंप होणार आहे. झाले. डोकी घरात ठेवून लोकांनी घरे सोडली; जिकडेतिकडे हाहाकार माजवला. वस्तुतः चंद्रग्रहण आणि भूकंप यांचा अनोन्यसंबंध नाही हे शास्त्रज्ञांनी केव्हाच सांगितलेले आहे. अरुणाचल प्रदेशाच्या लोहित जिल्ह्यात अशीच हकीगत घडली. आपण सात फूट उंचीच्या मर्कट मानवांना (यांच्याच एका उपजातीला 'मानव-मर्कट' म्हणतात.) पकडले असून तज्ज्ञांच्या निरीक्षणासाठी त्यांना शिलाँगला नेणार आहोत, असा दावा एका टिकोजीरावाने केला. लोकांना ते खरेच वाटले. हिमालयातले 'येती' 'येती' म्हणतात ते हेच असणार असे म्हणत त्यांचे दर्शन घेण्यासाठी लोकांनी गर्दी केली; पण कसचे काय नि कसचे काय–शेणात पाय नि हायहाय असे झाले. झिरमिळी थापच होती ती. काही दिवसांपूर्वी टांझानियाच्या किनाऱ्यावर एक जलचर पकडण्यात आला. 'हात, पाय, बोटे, अंगठे, एक कान, एक शिंग, एक वशिंड, एक लखलखता डोळा आणि दाढी' असलेला तो समुद्रसैतान आहे, अशी बातमी खुद्द माहितीखात्याने दिली. वर्णनावरून प्रकरण भयंकरच वाटत होते; परंतु आता असा पक्का निर्णय लागला आहे की सापडलेला जलचर सैतान-बैतान नाही. त्याला इंग्रजीत 'ड्युगाँग' म्हणतात; मराठीत 'पाणगाय.' पाणगाय हा प्राणी हिंदी महासागरात मिळतो-क्वचित मिळतो. त्याच्या दहा फूट लांब देहाच्या दोन्ही टोकांना पायांसारखे काही तरी लोंबत असते; पण ड्युगाँग यापूर्वीसुद्धा मिळालेले आहेत; म्हणून टांझानियाच्या किनाऱ्यावर जे मिळाले त्याला एकदम समुद्रसैतान ठरवणाऱ्या सोकाजीचे डोके बऱ्यापैकी सुपीक असले पाहिजे.

अशा मौजेच्या सुपीकडोक्या माणसाला बडबडी माणसे तुच्छतेने 'थापाड्या-बाताड्या म्हणतात. खरी गोष्ट अशी आहे की सत्य सांगायला जेवढी हिंमत लागते त्यापेक्षा जास्त हिंमत असत्य सांगायला लागते. सत्य सांगून टाकले की मन कसे, उलटी करून झटकून टाकलेल्या पिशवीसारखे, मोकळे होते. असत्याचे तसे नाही : लोकांना ते सत्य वाटते आहे ना, हे चाचपत-चुचपत, मध्यवर्ती असत्याला नीट उभे करायला बाजूबाजूंनी उपअसत्यांचे टेकू देत, सगळे मांडावे लागते: तोपर्यंत मन, चढावावर रिक्षा ओढून नेणाऱ्या रिक्षावाल्यांच्या छातीसारखे, धपापत असते. त्यानंतरसुद्धा ते तसे मोकळे होतच नाही.

सत्य न सांगणाऱ्या कथांना—थापा-फोकनाड्यांना——सत्याचा थोडाबहुत, ग्रॅमभर-किलोभर, आधार असतोच ही गोष्ट आपण कधीही विसरता कामा नये. कधीकधी तर निखळ-निर्भेळ सत्यावर, ती बंडलगुंडल थाप आहे अशा समजुतीने, संपूर्ण विश्वास टाकला जातो. ( माझ्या बाबतीत तर हे इतक्या वेळा झाले आहे की आताशा मी थापा मारायचे सोडून दिले आहे. मी सत्यच 'मारतो'; आणि लोकांना ते खरे वाटते. ) वीतभर इक्षुदंडातून हातभर उंच ग्लास रस काढणाऱ्या थापस्वी कलाकाराचे मला ढेपभर कौतुक आहे. ज्यांना असे कौतुक नाही ती मंडळी रस मात्र मिटक्या मारीत पीत असतात आणि पिऊन झाल्यावरसुद्धा मिशांना लागलेला रस पुसायची आठवण त्यांना राहात नाही.

—अनंतराव



# अर्जेंटिना
## संपापुढे सरकार नमले
वा. दा. रानडे

कामगारांची पगारवाढीची मागणी मान्य होऊन त्यांनी सार्वत्रिक संप मागे घेतल्याने अर्जेंटिनातील पेचप्रसंग तात्पुरता मिटला आहे. पेराँ पक्षीयांची राजवट कितपत स्थिर राहील की अर्जेंटिनात पुन्हा लष्करी राजवट येईल ? देशापुढील आर्थिक प्रश्न समाधानकारकपणे सोडविण्यात सध्याच्या सरकारला कितपत यश येते.यावर याचे उत्तर अवलंबून राहील.

दोन वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकांत माजी अध्यक्ष पेराँ यांच्या पक्षाचा विजय होऊन अठरा वर्षांनंतर त्यांच्या हाती पुन्हा सत्ता आली. पक्षाचे नेते जुआन पेराँ यांना माद्रिदहून बोलावून घेण्यात आले. बहात्तर वर्षांच्या या नेत्याची देशाच्या अध्यक्षपदी पुन्हा निवड झाली आणि त्यांची तिसरी पत्नी इसाबेल यांना उपाध्यक्ष निवडण्यात आले. पेराँ यांच्या निधनानंतर इसाबेल अध्यक्ष झाल्या. जनरल पेराँ यांनी प्रथम १९४६ साली सत्ता हाती घेऊन देशात हुकुमशाही प्रस्थापित केली होती. औद्योगिक कामगारांचा पाठिंबा हा त्यांच्या सत्तेचा आधार होता. आपल्या नऊ वर्षांच्या कारकीर्दीत कामगारांच्या खऱ्या उत्पन्नात त्यांनी ४७ टक्के वाढ केली; पण शेतमजूर आणि मध्यमवर्गात त्यांच्या राजवटीबद्दल असंतोष होता. सरकारी शाळांतून धार्मिक शिक्षण बंद करणे, धार्मिक संस्था, चर्चेस, शाळा यांना करात सूट देण्याची सवलत रद्द करणे, घटस्फोट आणि वेश्याव्यवसायास कायद्याने मान्यता देणे या त्यांच्या सुधारणांमुळे रोमन कॅथॉलिकांचा रोष व विरोध त्यांनी ओढवून घेतला. सप्टेंबर १९५५ मध्ये लष्करी क्रांती होऊन पेराँ यांची राजवट उलथली गेली; देशापुढील मुख्य समस्या लष्करी नेतेही सोडवू शकले नाहीत त्यामुळेच दोन वर्षांपूर्वीच्या निवडणुकांत पेराँ यांच्या पक्षाने पुन्हा विजय मिळविला.

भरमसाट चलनवाढीस आळा घालणे हा नव्या राजवटीपुढे मुख्य प्रश्न होता. पेराँ यांनी पुन्हा सत्ता हाती घेतली तेव्हा चलनवाढ ८० टक्के झाली होती. पेराँ यांची पहिली राजवट आणि अठरा वर्षांनंतरची दुसरी राजवट यांच्या दरम्यानच्या अठरा वर्षांत झालेला एक महत्त्वाचा बदल म्हणजे कामगारसंघटना अधिक लढाऊ झाल्या आहेत, राजकीयदृष्ट्या अधिक जागृत आणि संघटित झाल्या आहेत. संदिग्ध आश्वासनांनी त्यांचे समाधान होत नाही. सार्वत्रिक संप करून आमच्या संघटित सामर्थ्यावर आमच्या मागण्या आम्ही मिळवू शकतो हे त्यांनी आपल्या यशस्वी संपाने नुकतेच दाखवून दिले. पगारवाढीची ही मागणी चलनवाढीमुळे पुढे आली. चलनवाढीला परिणामकारक आळा घालण्यात सरकारला यश आले असते तर पगारवाढीसाठी एवढा तीव्र लढा कामगारांनी केला नसता.

जनरल कॉन्फेडरेशन ऑफ लेबर ही अर्जेंटिनातील सर्वांत मोठी कामगार संघटना असून तिचे तीस लाख सभासद आहेत. तिने कारखान्यांच्या व्यवस्थापकाशी वाटाघाटी करून १३० टक्के पगारवाढीस त्यांची मान्यता मिळविली. वास्तविक कारखान्यांनी पगारवाढ देण्याचे मान्य केल्यानंतर सरकारने हस्तक्षेप करून ती रोखण्याचे कारण नव्हते. समाजकल्याणमंत्री जोसलोपेझ रेगा यांनी या तडजोडीस विरोध केला. काटकसर व आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने एवढी मोठी पगारवाढ देणे योग्य होणार नाही. त्यातून चलनफुगवटा आणखी वाढेल असे त्यांचे म्हणणे होते. मंत्रिमंडळाने त्यांच्या भूमिकेस पाठिंबा दिला. अध्यक्ष इसाबेल पेराँ यांनी हस्तक्षेप करून पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक पगारवाढ सध्या मिळणार नाही. पण वर्षअखेर आणखी ३० टक्के वाढ दिली जाईल असे जाहीर केले. कामगारांना हे मान्य झाले नाही, करारा प्रमाणे आम्हाला पगारवाढ मिळाली पाहिजे; या मागणीसाठी त्यांनी सार्वत्रिक संप केला. संप सुरू झाल्यानंतर मंत्रिमंडळाने राजिनामा दिला. पण संप एवढा परिणामकारक ठरला की दोन दिवसांत कामगारांची मागणी अध्यक्ष इसाबेल पेराँ यांनी मान्य केली. मंत्रिमंडळाची पुनर्घटना करण्यात आली. त्यात सर्वांत महत्त्वाचा बदल म्हणजे समाजकल्याणमंत्री रेगा यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्यात आले. रेगा हे सुरुवातीस साधे पोलिस कॉर्पोरेल होते पण चढत चढत ते मंत्री झाले. एवढेच नव्हे तर अध्यक्ष इसाबेल पेराँ यांचे विश्वासू सल्लागार बनले. अध्यक्ष हुकूम काढीत असले तरी खरी सत्ता रेगा यांच्याच हाती होती. सर्व महत्त्वाचे निर्णय तेच घेत. तेव्हा मंत्रिमंडळातून त्यांची हकालपट्टी होणे हा कामगारसंघटनांना आपला मोठा विजय वाटावा हे स्वाभाविक आहे. आर्थिक धोरण ठरविण्यात आम्हाला अधिक सहभागी करून घेतले पाहिजे अशी कामगारसंघटनांची दुसरी महत्त्वाची मागणी आहे, त्यासाठी यापुढे आग्रह धरला जाईल.

आपली सत्ता टिकवायची तर कामगारवर्गाच्या न्याय्य मागण्या सत्तारूढ पक्षाला मान्य कराव्या लागतील. कामगारवर्ग हा या पक्षाच्या पाठिंब्याचा आतापर्यंतच मुख्य आधार आहे. त्याला दुखवले तर सत्तारूढ पेराँ पक्षातच अंतर्गत संघर्ष निर्माण होईल. डावे आणि उजवे गट या पक्षात आहेतच, त्यांच्यात हितसंबंधांचा संघर्ष असून तात्पुरता समझोता झाला तरी हा संघर्ष पुनः काही दिवसांनी डोके वर काढल्याशिवाय राहणार नाही. त्याचे पर्यवसान अखेर पक्षातील फुटीत होण्याचा संभव आहे.

रेडिकल सिव्हिल युनियन हा अर्जेंटिनामधील सर्वात मोठा विरोधी पक्ष. पेराँ पक्षात संघर्ष होऊन किंवा फूट पडून तो कमकुवत झाला तर आपल्याला सत्तेवर येण्याची संधि मिळेल असे या पक्षाच्या नेत्यांना वाटते. लष्कर ही अर्जेंटिनाच्या राजकारणातील तिसरी प्रभावी शक्ती आहे. राजकीय नेत्यांच्या हाती आम्ही सत्ता सोपविली पण ते देशाला स्थिर सरकार देऊ शकले नाहीत, देशापुढील महत्त्वाचे प्रश्न सोडवू शकले नाहीत. अशा सबबी पुढे करून अर्जेंटिनात पुनः लष्करी राजवट आणण्याचा त्यांचा प्रयत्न राहील.

या अस्थिरतेचा फायदा घेण्याचा प्रयत्न 'पीपल्स रेव्होल्यूशनरी आर्मी' ही ट्रॉट्स्कीवाद्यांची संघटनाही करीत आहे. ही गनिमी संघटना असून सशस्त्र छापे घालणे, प्रमुख नेत्यांना पळविणे असे प्रकार तिने अनेकदा केले आहेत.

या विविध शक्तींच्या संघर्षात अर्जेंटिनाच्या राजकारणास निश्चित कोणते वळण

लागेल हे आताच सांगणे कठीण आहे; पण कामगारवर्गाचे सामर्थ्य वाढले आहे हे निश्चित. □

# मोझांबिक
## नव्या राष्ट्रापुढील आव्हाने

जवळजवळ पाचशे वर्षांच्या पोर्तुगीज साम्राज्यशाहीच्या पकडीतून मुक्त होऊन मोझांबिक गेल्या २५ जूनला स्वतंत्र झाले. गेल्या वर्षी २५ एप्रिलला पोर्तुगालमध्ये लष्करी क्रांति झाली तेव्हापासून पोर्तुगीज वसाहतींचा प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागला. गिनी-बिसाऊ, मोझांबिक आणि अंगोला या पोर्तुगीजांच्या आफ्रिकेतील वसाहती. त्यापैकी गिनी-बिसाऊच्या स्वातंत्र्यवाद्यांनी सप्टेंबर १९७३ मध्येच आपले स्वतंत्र प्रजासत्ताक घोषित केले होते. क्रांतीनंतरच्या नव्या पोर्तुगीज राजवटीने त्यांच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली आणि मोझांबिक व अंगोला-मधील स्वातंत्र्यलढ्याच्या नेत्यांशी सत्ता-संक्रमणाबाबत वाटाघाटी सुरू केल्या. त्यानुसार मोझांबिक २५ जूनला स्वतंत्र होईल आणि तोपर्यंतच्या काळात फ्रेलिओ ( फ्रंट फॉर दि लिबरेशन ऑफ मोझांबिक ) या राष्ट्रवादी गनीम संघटनेकडे कारभार सोपविण्यात येईल असा करार नवी पोर्तुगीज राजवट आणि फ्रेलियोचे नेते सामोरा मॅचेल यांच्यात सप्टेंबर १९७४ मध्ये झाला. त्यानुसार मोझांबिक स्वतंत्र झाले. फ्रेलियोने अकरा वर्षे चालविलेला लढा यशस्वी झाला.

फ्रेलियोची स्थापना माँडलेन यांनी केली. सप्टेंबर १९६४ मध्ये या संघटनेने पोर्तुगीजांविरुद्ध आपल्या गनिमी लढ्याला सुरुवात केली. प्रथम उत्तरेकडच्या काबोडेल्गाडो प्रांतात त्यांचा लढा सुरू झाला. तो प्रांत ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी टेट प्रांत, ईशान्य भाग, मध्यभाग आणि पुढे दक्षिणेकडल्या टोकापर्यंत आपल्या हालचाली वाढविल्या. दहा वर्षांत बहुतेक ग्रामीण भाग त्यांच्या ताब्यात आला होता व फक्त शहरे पोर्तुगीजांच्या ताब्यात होती. पोर्तुगीजांची साठ हजार सेना मोझांबिकमध्ये होती व अंदाजपत्रकाचा ४४ टक्के भाग स्वातंत्र्यचळवळ दडपून टाकण्यासाठी खर्च करण्यात येत होता. फ्रेलियोच्या लढ्याचा जोर वाढला तसा १९७३-७४ मध्ये पोर्तुगीजांनी लष्करी खर्च आणखी सहा लाख पौंडांनी वाढविला. पण केवळ लष्करी खर्च वाढवून स्वातंत्र्यचळवळी दडपून टाकता येत नाहीत. पोर्तुगीज सैनिकच युद्धास कंटाळले. त्यांनी जनरल स्पिनोलांच्या नेतृत्वाखाली बंड करून पोर्तुगालमध्ये क्रांति केली. अभेद्य मानल्या गेलेल्या पोर्तुगीज साम्राज्यशाहीचा तट ढासळू लागला व मोझांबिकचे स्वातंत्र्य जवळ आले.

फ्रेलियोचे संस्थापक व अध्यक्ष माँडलेन यांचा एका पुस्तकात दडविलेल्या बाँबचा स्फोट होऊन खून झाला. पोर्तुगीजांनीच हा बाँब तेथे दडवून ठेवला होता. माँडलेन यांचा खून केल्यावर फ्रेलियोची चळवळ थंडावेल हा पोर्तुगीजांचा अंदाज चुकला. माँडलेननंतर मॅचेलकडे फ्रेलियोचे नेतृत्व आले त्यांनी तेवढ्याच जिद्दीने व पद्धतशीरपणे चळवळ पुढे चालू ठेवली व यशस्वी केली.

फ्रेलियोच्या कडव्या शिस्तबद्ध दलाने गनिमी हल्ले करून पोर्तुगीजांना जेरीस आणले हे तर खरेच; पण ताब्यात घेतलेल्या प्रदेशात व्यवस्थित कारभार करून त्यांनी लोकांची मने जिंकली. शाळा, हॉस्पिटले, सहकारी संस्था काढल्या. टेट प्रांतात पोर्तुगीजांनी एकही शाळा काढलेली नव्हती, तेथे शिक्षणाची सुरुवात फ्रेलियोनेच प्रथम केली. या शिक्षणकार्यात महत्त्वाचा वाटा फ्रेलियोचे दिवंगत अध्यक्ष माँडलेन यांच्या पत्नी श्रीमती जेनेट माँडलेन यांनी उचलला. दारेसलाम-मध्ये मोझांबिक इन्स्टिटयूट ही संस्था त्या चालवीत. या संस्थेने फ्रेलियोने उघडलेल्या शाळांसाठी क्रमिक पुस्तके तयार केली. गनिमी सैनिकांना शिक्षणाबद्दल एवढी ओढ होती की रसोईखान्याच्या झोपडीत मेणबत्तीच्या प्रकाशात दारूगोळ्याच्या रिकाम्या पेट्यांची बाके बनवून हे सैनिक त्यावर फ्रेलियोने पुरविलेली पुस्तके वाचीत असल्याचे परदेशी वार्ताहरांना दिसून आले नव्या राष्ट्राच्या उभारणीची तयारी फ्रेलियोने याप्रमाणे स्वातंत्र्यापूर्वीपासूनच चालविली होती.

स्वतंत्र मोझांबिकचे अध्यक्ष मॅचेल समाजवादी आहेत पण त्यांच्यावर रशियाचा प्रभाव राहील, चीनचा राहील की अलिप्त राष्ट्रांचा राहील ? फ्रेलियोच्या स्वातंत्र्यलढ्याला रशिया व चीन या दोन्ही कम्युनिस्ट राष्ट्रांनी लष्करी व आर्थिक मदत केलेली आहे. रशियापेक्षा चीनची मदत जास्त आहे. चीनने आपले तंत्रज्ञही पाठविले आहेत. नव्या राष्ट्राच्या उभारणीसाठी मोझांबिकला यापुढेही आर्थिक व तांत्रिक मदतीची गरज आहे, पण ही मदत स्वीकारताना त्याबरोबरच मदत करणाऱ्या राष्ट्रांचा प्रभाव आपल्या धोरणांवर पडता कामा नये याची दक्षता अध्यक्ष मॅचेल घेत आहेत. त्यांचा समाजवाद रशियन किंवा चिनी छापाचा नसून मोझांबिकची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन त्याचे वळण ठरेल. अध्यक्ष मॅचेल वसाहतविरोधी लढ्यातून पुढे आलेले आहेत. अलिप्त राष्ट्रांकडे त्यांचा ओढा असणे स्वाभाविक आहे. मोझांबिक स्वतंत्र होताच भारताने त्यास मान्यता दिली व राजकीय संबंध जोडले. या नव्या राष्ट्राच्या आर्थिक विकासास भारताने शक्य ती मदत केली पाहिजे.

मोझांबिक स्वतंत्र झाल्याचा परिणाम दक्षिण आफ्रिका व ऱ्होडेशियातील अल्पसंख्य गोऱ्या राजवटींवर काय होईल ? मोझांबिक-मधील पोर्तुगीज राजवट, दक्षिण आफ्रिका आणि ऱ्होडेशिया या गोऱ्या राजवटींनी आपली सत्ता टिकविण्यासाठी आफ्रिकनांच्या स्वातंत्र्यचळवळींविरुद्ध संयुक्त आघाडी केली होती. मोझांबिक स्वतंत्र झाल्याने या आघाडीतील एक दुवा निखळला. त्याचा परिणाम त्यांना जाणवल्याशिवाय राहणार नाही. ऱ्होडेशियाभोवती काळ्या आफ्रिकन राष्ट्रांचा गराडा पडेल आणि दक्षिण आफ्रिकेच्या सीमेवर गनिमांच्या हालचाली यापुढे सुरू होतील. या अल्पसंख्य गोऱ्या राजवटी नष्ट होऊन बहुसंख्य आफ्रिकनांच्या हाती तेथील सत्ता गेली पाहिजे असे मोझांबिकचे नेते मॅचेल यांना कितीही वाटत असले तरी दक्षिण आफ्रिकेशी एकदम कडव्या संघर्षाची भूमिका घ्यावयाची की काय हे ठरविताना त्या देशाशी असलेल्या आर्थिक संबंधाचाही विचार त्यांना करावा लागेल. मोझांबिक-मधील एक लाख कामगार दक्षिण आफ्रिकेतील खाणीत काम करीत असतात. हे काम बंद झाले तर या एक लाख कामगारांच्या बेकारीच्या प्रश्नास मॅचेल यांना तोंड द्यावे लागेल. इतर राष्ट्रांची याबाबत मदत मिळवून दक्षिण आफ्रिका व ऱ्होडेशिया विरुद्धचा लढा अधिक तीव्र करण्याचा त्यांचा प्रयत्न राहील. □

'दि कोर्स ऑफ माय लाइफ'
सी. डी. देशमुख

'रोझेस इन डिसेंबर'
–ॲन ऑटोबायोग्राफी
एम्. सी. छगला

# दोन आत्मचरित्रे परिचय व परीक्षण

## ग. प्र. प्रधान

श्री. चिंतामणराव देशमुख "The Course of My Life" व बॅ. छगला यांचे 'Roses in December' या दोन्ही आत्मचरित्रांबद्दल माझ्या मनात अनेक वाचकांप्रमाणे मोठे कुतूहल होते. भारताच्या सार्वजनिक जीवनात आपल्या बुद्धिवैभवाने, आणि कर्तृत्वाने तळपलेल्या या दोन व्यक्तींची भाषणे मी ऐकली आहेत. त्यांचे काही लेख मी वाचले आहेत. वेगवेगळ्या अधिकारपदांवरून त्यांनी केलेली कामगिरी मला परिचित आहे; पण सुपरिचितापलीकडील अपरिचित समजावे, जे व्यक्त झाले त्याच्यामागील अव्यक्त जाणून घ्यावे, जी कृती घडली त्या कृतीच्या मागच्या मनातील ऊर्मीचे दर्शन घडावे, असे मला तीव्रतेने वाटत होते आणि म्हणून मोठ्या अपेक्षा मनात बाळगून मी ही दोन आत्मचरित्रे वाचली. श्री. चिंतामणराव देशमुखांनी प्रस्तावनेत 'हे आत्मचरित्र नाही' अशी आपल्या पुस्तकाची मर्यादा स्पष्ट केली असली व त्यामुळे वाङ्मयीन निकष काटेकोरपणे लावून आत्मचरित्र म्हणून या पुस्तकाचे परीक्षण करता आले नाही तरी ते आत्मकथनच आहे हे उघड आहे. या आत्मकथनामधून लेखकाच्या जीवनाच्या प्रवाहाचे दर्शन होते आणि त्याची खरीखुरी ओळख पटते. ही वस्तुस्थिती असल्यामुळे स्थूलमानाने मी त्यांचा आत्मचरित्र म्हणूनच उल्लेख करणार आहे.

ही दोन्ही आत्मचरित्रे केवळ आत्माविष्कारासाठी लिहिलेली नाहीत. किंबहुना देशमुख व छगला या दोघांनीही त्यांची वैयक्तिक सुखदुःखे आणि त्यांच्या मनात उठलेले भावनांचे कल्लोळ, यांना आपल्या निवेदनात अत्यल्प स्थान दिलेले आहे. ज्या कालात त्यांचे कर्तृत्व बहरले तो कालखंड, त्यांचे अनेक समकालीन, त्यांच्या सार्वजनिक जीवनातील संघर्ष व समरप्रसंग, त्यांच्या जीवनातील बौद्धिक निष्ठा, विविध जबाबदाऱ्यांच्या जागांवर असताना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील तणावांतून मार्ग काढताना त्यांना उमगलेले वास्तवाचे स्वरूप इत्यादि सर्व तपशील मोठ्या रेखीवपणे या दोन आत्मचरित्रांत आलेला आहे.

वाचकांबरोबर हितगुज करीत असताना देशमुख व छगला या दोघांनीही आपापल्या सार्वजनिक जीवनाचा पट उलगडून दाखविला आहे आणि म्हणून या आत्मचरित्रांचे परीक्षण करताना या कालखंडातील भारतातील राजकीय परिस्थिती, साजिक जीवनातील विविध प्रवाह आणि परिस्थितीने निर्माण केलेली आव्हाने या संदर्भात या दोन थोर व्यक्तींच्या कर्तृत्वाचे विश्लेषण करणे उचित ठरेल असे मला वाटते.

हे करण्यापूर्वी एका गोष्टीचा थोडा विचार करणे आवश्यक आहे. तो म्हणजे देशमुख व छगला या दोघांनीही त्यांच्या वैयक्तिक जीवनातील सुखदुःखे, आशा-निराशा यांचा केवळ ओझरता उल्लेख केलेला आढळतो याचे नेमके काय कारण असावे ? याचे एक कारण हे की, या दोघांच्याही आयुष्यात बुद्धी. तर्क यांनाच भावनेपेक्षा अधिक महत्त्वाचे स्थान आहे; परंतु याहीपेक्षा महत्त्वाचे कारण म्हणजे या दोघांनाही खाजगी भावनांची वाच्यता करणे, वैयक्तिक सुखदुःखांचे सार्वजनिक प्रगटीकरण करणे रुचत नाही. त्या दोघांनीही स्वतःच्या भावजीवनाचा स्फटिकमिनार (आयव्हरी टॉवर) उभारला आहे. या मिनारात काही अगदी मोजक्या व्यक्ती सोडल्या तर इतरांना प्रवेश नाही. दुसऱ्याने आपल्या अंतरंगात डोकवावे हे या दोघांनाही आवडणार नाही. त्यांचे आयुष्यातील संकेत मोठे काटेकोर आहेत. त्यामुळे ही आत्मचरित्रे वाचताना येथे सौजन्य असले तरी जिव्हाळा बेताबाताचा आहे हे सतत जाणवत राहते. देशमुख आणि छगला ही दोन्ही मोठी माणसे सोलीव चवीढवीची आहेत. खाणेपिणे, राहणे, भाषण, संभाषण आदि गोष्टी अगदी नेटकेपणाने (करेक्टली) झाल्या पाहिजेत हा त्यांचा कटाक्ष आहे आणि त्यांचे लेखनही तसेच आहे. आत्मकथन करताना दोघेहीजण कधी भावनेच्या आवेगात वाहून जात नाहीत. त्यांचे रागलोभही मोठ्या संयत रीतीनेच प्रगट होतात. त्यांच्या वृत्तीतील या खानदानी (Aristocracy) मुळे माझ्यासारखा वाचक प्रथम काहीसा बिचकतो; पण ही आत्मचरित्रे वाचताना हे खानदान केवळ परंपरेतून आलेले नाही, या खानदानाला बुद्धिवैभवाचे अधिष्ठान आहे हे लक्षात येते आणि मग वेगळ्या पातळीवर या दोन लेखकांचे व आपले नाते जुळते. छगलांनी आपल्या निवेदनाच्या ओघात एका ठिकाणी (Aristrocracy of the intellect and equality of opportunity चे हिरीरीने समर्थन केले आहे आणि या दोनही आत्मचरित्रांतील सूत्र तेच आहे. या बौद्धिक खानदानीचे दर्शन मोठे विलोभनीय आहे. येथे संपत्तीचा उद्दामपणा नाही, सत्तेचा उन्माद नाही. येथे आहे बुद्धिवैभवाचे तेज. जी कामे देशमुख व छगला यांनी केली, ज्या समस्या त्यांनी हाताळल्या, जे यश त्यांनी संपादन केले, त्या सर्वांतून

त्यांच्या बुद्धीच्या मनोरम विलासांचे दर्शन होते आणि हेच या दोनही आत्मचरित्रांचे सौंदर्य आहे.

देशमुख आणि छगला या दोघांच्या जीवनातील बौद्धिक सामर्थ्यामुळे त्यांची विवेचक-दृष्टी कधी चळली नाही. त्यांच्या मनाचा तोल कधी ढळला नाही; पण यामधूनच त्यांच्या जीवनात एक मर्यादा निर्माण झाली. ही दोन आत्मचरित्रे वाचताना सतत लक्षात येते ते हे की, देशमुख व छगला या दोघांनी आपल्या ध्येयाची उपासनाही मोठ्या सावधपणे केली. त्यांनी कधी स्वतःला झोकून दिले नाही. पतंगाप्रमाणे ध्येयाच्या ज्योतीवर त्यांनी झेप घेतली नाही. या दोघांनीही वादळी सागरात आपली जीवननौका कधी हाकारली नाही. सतत किनाऱ्याचे अवधान राखले. देशमुख व छगला यांनी आयुष्यात वेडावून जाऊन अज्ञात शिखरे कधी शोधली नाहीत. त्यांच्या आयुष्याची बहुतेक सर्व वाटचाल राजमार्गानेच झाली. काही वेळा ते पाऊलवाटेने गेले तरी ही मळलेली पाऊलवाटच होती. नव्या वाटा शोधण्याचे साहस देशमुख व छगला यांच्या स्वभावात नाही. हे म्हणताना लो. टिळक, म. गांधी अगर पंडित नेहरू यांच्या पद्धतीने त्यांनी जगायला पाहिजे होते असे मी म्हणत नाही; पण ज्या उदारमतवादी विचारसरणीबद्दल आणि नेमस्त प्रवृत्तीबद्दल देशमुख व छगला या दोघांनाही आदर आहे, त्या उदारमतवादी भूमिकेतून राजकारण करणाऱ्या ना. गोखल्यांच्या ध्येयजीवनाची मला आठवण होते. ' सार्वजनिक जीवनात काम करणे म्हणजे अज्ञात सागरावरील प्रवासासारखे आहे आणि पैलतीराला काय आहे हे कोणालाच समजू शकत नाही, ' अशा अर्थाचे गोखल्यांचे उद्गार प्रसिद्ध आहेत. उदारमतवादी तत्त्वज्ञान आचरताना गोखले ज्या समर्पणवृत्तीने जगले, ती वृत्ती या दोन आत्मचरित्रांत अभावानेच जाणवते. देशमुख आणि छगला हे भावुकतेच्या आहारी गेले नाहीत हे त्यांचे मोठेपण; पण त्याचबरोबर उत्कट भावनेवर बुद्धीचे सतत नियंत्रण ठेवल्यामुळे ते स्वतःला कधी विसरू शकले नाहीत. त्यामुळेच ही दोन आत्मचरित्रे वाचताना त्यांच्या जीवनाच्या संथ लयीने आपले मन प्रसन्न झाले तरी वादळवाऱ्याने भरलेल्या किंवा विजेप्रमाणे तळपणाऱ्या जीवनाच्या प्रत्ययाने निर्माण होणारी अस्वस्थता आणि प्रक्षोभ आपल्या अनुभवास येत नाही.

देशमुख आणि छगला या दोघांच्या मनांची घडण कशी झाली, त्यांच्या बुद्धीवर कसे संस्कार होत गेले हे समजेल या अपेक्षेने या दोनही आत्मचरित्रांची सुरुवातीची प्रकरणे मी वाचली. छगला यांनी अगदी त्रोटकपणे आपल्या शैशवाचा उल्लेख केलेला आहे. अगदी लहानपणी झालेला आईचा मृत्यू, आजोबांच्या प्रेमाची पाखर, डी. सिल्व्हा हायस्कूलमधील कठोर शिस्त व अकारण झालेल्या शिक्षेने दुखावलेले मन या व अन्य उल्लेखांतून एकलेपणाने जगणाऱ्या या मुलाचे मन पुस्तकात अधिकाधिक कसे गुंतत गेले याची कल्पना येते. सेन्ट झेविअर हायस्कूल व सेन्ट झेविअर कॉलेज या संस्थांतील फादर्सच्या शिकविण्याच्या प्रभावी पद्धतीमुळे छगलांच्या बुद्धीला लहान वयातच चांगली धार आली आणि त्यांचे मन परीक्षेच्या यशात वा एखाद्याच विषयाच्या अभ्यासात गुंतून न राहता चौफेर वाचनाकडे वळले; पण हे सारे छगलांनी फारच अलिप्तपणे लिहिले आहे आणि त्यांच्या मनावर या काळात परिणाम करणाऱ्या एकाही व्यक्तीचे स्वभावचित्र त्यांनी रेखाटलेले नाही.

याउलट देशमुखांच्या आत्मचरित्रातील पहिले प्रकरण कौटुंबिक वातावरणाच्या जिव्हाळ्याने केलेल्या चित्रणामुळे हृद्य झाले आहे. रोह्याचा रम्य परिसर, देशमुखकुटुंबातील प्रेमळपणा. कायस्थ–प्रभूंचे खास आवडीचे खाद्यपदार्थ–कोलंबी आणि अन्य मासळी व दिवाळीतील कानवले–घरच्या गणपती उत्सवातील उत्साह इत्यादी उल्लेखांतून कुलाबा जिल्ह्यातील सुखवस्तु कायस्थ-प्रभू कुटुंबाच्या जीवनाची यथातथ्य कल्पना येते. जोशी नावाच्या एका शिक्षकामुळे मेळ्यातील पदे व शिवरामपंत परांजपे यांचे ' काळ ' पत्रातील अग्रलेख यांच्याद्वारा देशमुखांचा विद्यार्थीदशेतच जहाल राजकारणाशी परिचय झाला; परंतु घरातील नेमस्त वातावरणामुळे, अंगभूत नेमस्त प्रवृत्तीमुळे आणि हायस्कूल शिक्षणासाठी मुंबईस जावे लागलेमुळे हा संस्कार लवकरच पुसला गेला. मुंबईला प्रा. आर. के. लागू हे असामान्य शिक्षक देशमुखांना लाभले. इंग्रजी व संस्कृत भाषांवरील प्रभुत्व, कोणत्याही विषयाचा व्यासंग करण्याची रेखीव पद्धत या गोष्टी देशमुख त्यांच्याजवळून शिकले आणि मॅट्रिकच्या परीक्षेत त्यांनी अत्युच्च यश संपादन केले. शिष्याबद्दल नितांत प्रेम व त्याच्या भवितव्याबद्दल उच्च महत्त्वाकांक्षा असणाऱ्या या गुरूच्या सूचनेवरून देशमुखांनी आय. सी. एस. व्हावयाचे ठरविले. प्रा. लागूंच्याबद्दलची देशमुखांची आदराची भावना व्यक्त झाली असली तरी आपल्या जीवनावर इतका खोल परिणाम करणाऱ्या अद्वितीय अध्यापकाचे व्यक्तिचित्र त्यांनी रेखाटलेले नाही, त्यामुळे या साऱ्या निवेदनाला उणेपणा आलेला आहे.

देशमुख केम्ब्रिजला गेले. तेथे त्यांनी विज्ञान हा खास अभ्यासाचा विषय निवडला आणि सायन्सचा ट्राय पॉस मिळवून आय. सी. एस. च्या परीक्षेतही अभूतपूर्व यश मिळविले. ' दोन परीक्षांच्या अभ्यासाचे दडपण असूनही ' केम्ब्रिजमधील माझे वास्तव्य ' हा एक चित्तथरारक (Exhilicating) अनुभव होता. ' असे विधान देशमुखांनी केले आहे; परंतु या चित्तथरारकतेचा प्रत्यय वाचकाला मात्र येत नाही. हे केवळ विधान राहते. केम्ब्रिज विद्यापीठातील जीवनाचे वर्णन यापेक्षा किती तरी अधिक बहारदारपणे करावयास हवे होते.

देशमुख आय. सी. एस. परीक्षा पास झाले त्या वेळी लो. टिळक इंग्लंडमध्ये चिरोल खटल्यासाठी गेले होते. देशमुख त्यांना भेटावयास गेले व आपण सनदी नोकर व्हावे की राजकारणात शिरावे याबाबत त्यांनी लोकमान्यांचा सल्ला विचारला. त्यावर लो. टिळक म्हणाले, ' तू राजकारणात येऊ नकोस. हिंदुस्थानला लवकरच स्वराज्य मिळेल व ते बळकट करण्यासाठी कार्यकुशल व बुद्धिमान अधिकारी लागतील. ' लोकमान्यांच्या या उद्गारावरून त्यांची राजकीय दूरदृष्टि व मनुष्यस्वभावाची पारख लक्षात येते. लढाऊ राजकारणात पडणारी व्यक्ती सल्ला विचारीत नाही. ते एक झपाटणारे वेड असते आणि माणसाला घरकुलाबाहेर घेऊन जाते. सल्ला विचारणाऱ्या देशमुखांना ते झेपणारे नाही; पण त्यांच्या असामान्य बुद्धीचा उपयोग देशाला खास होईल हे लोकमान्यांनी क्षणार्धात ओळखले. ही आठवण ज्या रीतीने देशमुखांनी सांगितली आहे त्यात मात्र त्यांच्या कर्तृत्वाचा विशेष लोकमान्यांना जाणवला इतकाच ध्वनी उमटतो.

छगला हे सेन्ट झेविअर कॉलेजमध्ये गेल्यावर अभ्यासाबरोबर

अन्य चळवळींतही त्यांना रस वाटू लागला. त्या वेळी जिना हे राष्ट्रीय विचारांचा हिरीरीने पुरस्कार करणारे नामवंत तरुण वकील म्हणून मुंबईत गाजत होते आणि छगला त्यांना 'हिरो' मानत होते. मोर्ले या उदारमतवादी लेखकाने लिहिलेल्या ग्लॅडस्टन या ब्रिटिश मुत्सद्याच्या चरित्राचाही तरुण छगलांच्या मनावर मोठा प्रभाव पडला आणि आपणही भावी आयुष्यात संसदीय कर्तृत्व गाजवावे अशी स्वप्ने ते मनाशी रंगवू लागले. घरची सुस्थिती असल्यामुळे बॅरिस्टर होण्यासाठी त्यांनी इंग्लंडला जाण्याचे ठरविले आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात त्यांनी प्रवेश घेतला. ऑक्सफर्ड विद्यापीठातील बौद्धिक स्वातंत्र्य, तेथील विद्यार्थ्यांचे मुक्त जीवन, मजलिसमध्ये छगलांनी घेतलेला पुढाकार, तेथे गाजलेले वादविवाद आदी गोष्टींचे छगलांनी बहारीचे वर्णन केले आहे. 'राजा' सप्रू, पुरुषोत्तम त्रिकम, दिलीपकुमार रॉय आदि सहाध्यायांची वैशिष्टचे, त्यांच्या मैत्रीत लाभलेला आनंद, सरोजिनी नायडूंचे मजलिसमध्ये झालेले अप्रतिम काव्यमय शैलीतील भाषण, छगलांनी परीक्षेत काढलेला इटलीचा नकाशा हा भूकंपानंतरच्या इटलीचा आहे का असा तोंडी परीक्षेच्या वेळी परीक्षकांनी विचारलेला खोचक प्रश्न आदी गोष्टींच्या वर्णनामुळे अतिशय रसपूर्ण झालेल्या या प्रकरणाचा शेवट काव्यात्म शैलीतील सुंदर परिच्छेदाने झालेला आहे. लेखक जणू नुकत्याच संपलेल्या विद्यार्थिदशेचे वर्णन करीत आहे असे वाटते इतकी या प्रकरणाची निवेदनशैली ताजी टवटवीत आहे. या ठिकाणी छगला व देशमुख या दोघांच्या त्या वेळच्या मनस्थितीतील फरक तीव्रतेने लक्षात येतो. ऑक्सफर्डच्या ज्ञानाच्या तेजाने उजळलेल्या जगाचा निरोप घेताना छगला म्हणतात, की कृतिशील जीवनाच्या रणधुमाळीकडे त्यांचे मन ओढ घेत होते. याउलट चिंतामणराव देशमुखांना आपण आय. सी. एस. च्या परीक्षेत अत्युच्च यश संपादन केले याचाच मोठा अभिमान वाटत होता. सनदी नोकराच्या आयुष्याच्या सुरक्षित चाकोरीत जावयाचे हे निश्चित असल्याने देशमुखांचे मन भविष्याची स्वप्ने पाहण्यात गुंतून न पडता वर्तमानकालातील स्वपराक्रमातच साफल्य पावते. तिसऱ्या प्रकरणाच्या शेवटी देशमुखांनी त्यांचे आय. सी. एस. मधील मार्क व १९१० ते १९१७ या कालखंडात आय. सी. एस. मध्ये पहिल्या आलेल्या इंग्रज व एक दोन भारतीय विद्यार्थ्यांचे मार्क यांचा तक्ता दिलेला आहे. त्यावरून दोघे जण वगळता देशमुखांना खूपच जास्त मार्क मिळाले आहेत हे आढळून येते. त्या वयात देशमुखांना याचा, विशेषतः इंग्रज विद्यार्थ्यांहूनही आपण अधिक हुशार होतो याचा अभिमान वाटणे स्वाभाविक होते; परंतु आत्मचरित्रात आज हा मार्कांचा तक्ता येणे माझ्या मनाला खटकले. बुद्धिसामर्थ्याने जीवनाच्या विविध दालनांत प्रभुत्व मिळविणाऱ्या व्यक्तीने परीक्षेतील यशाला वाजवीपेक्षा अधिक महत्त्व द्यावे यामुळे वाचकाच्या मनाचा विरस होतो. देशमुख व छगला यांच्या मनोभूमिकेत फरक होता हे खरे असले तरी एका बाबतीत दोघाजणांच्यात विलक्षण साम्य होते. इंग्लंडमध्ये विद्यापीठात अभ्यास करताना दोघांच्याही मनांवर तत्कालीन नेमस्त विचारसरणीचा कायमचा पगडा बसला. त्या काळात इंग्लंडमध्ये नवीन विचार मांडले जात असले तरी ऑक्सफर्ड व केम्ब्रिज विद्यापीठांतील जुन्या प्राध्यापकांना व्हिक्टोरिअन युगातील मूल्येच महत्त्वाची वाटत होती आणि या प्राध्यापकांच्या विचारसरणीचाच प्रभाव या दोन तरुण विद्यार्थ्यांवर पडला. यामुळे देशमुख व छगला हे पुढील आयुष्यात बंडखोर होऊ शकले नाहीत,

## सनदी नोकरीचा रुक्ष कालखंड

आय. सी. एस्. अधिकारी म्हणून १९१९ ते १९३९ या वीस वर्षांच्या कालखंडात आपण कोणकोणत्या जबाबदाऱ्या पार पाडल्या हे देशमुखांनी ज्या रीतीने सांगितले आहे त्यावरून त्या वेळच्या नेकीच्या भारतीय सनदी नोकरांच्या मनाची कल्पना येते. वऱ्हाडात विशेषतः अमरावती जिल्ह्यात महसूल अधिकारी म्हणून काम करताना देशमुख अनेक गावात हिंडले. या गावांतून स्थानिक पुढारीपणामुळे दुफळी होती, इतकेच देशमुख लिहितात; परंतु मालगुजारी पद्धतीमुळे निर्माण झालेल्या संकुचित मध्ययुगीन समाजरचनेच्या दोषांचा उल्लेखही त्यांनी केलेला नाही. छत्तीसगडमध्ये सेटलमेन्ट कमिशनर म्हणून काम करताना देशमुखांनी अतिशय परिश्रमपूर्वक जवळजवळ सर्व गावांचे निरीक्षण केले; परंतु या संदर्भात छत्तीसगडमधील आदिवासींच्या जीवनाचे रसरशीत चित्र राहोच पण साधा त्रोटक उल्लेखही नाही, यावरून देशमुख हे खास सनदी नोकर बनून गेले होते हे स्पष्टपणे जाणवते. सनदी नोकर म्हणून केलेल्या कामाचे महत्त्व सांगताना ज्या प्रसंगाच्या संदर्भात ते काम केलेले असते त्या प्रसंगातील नाट्यपूर्ण संघर्ष किंवा विविध मोठ्या व्यक्ती यांच्याबद्दल ते काहीच लिहीत नाहीत याचेही आश्चर्य वाटते. राउंड टेबल कॉन्फरन्सच्या वेळी देशमुखांच्याकडे सर्व चर्चेचा तपशीलवार अहवाल रोज तयार करण्याचे काम होते. ही परिषद ही एक ऐतिहासिक महत्त्वाची घटना होती. या वेळी परिषदेत भाग घेणाऱ्या म. गांधी, सप्रू, जयकर, आंबेडकर, झाफरुल्लाखान आणि रॅम्से मॅक्डोनल्ड व त्यांचे सहकारी या सर्वांची वैशिष्टचे, परिषदेतील वादविवादातील तणाव, तडाजोडीचे पवित्रे आदि गोष्टी देशमुखांना कशा दिसल्या हे जाणण्याबद्दल मला अतिशय उत्सुकता होती; परंतु याबाबतीत देशमुख काहीच लिहीत नाहीत. फक्त त्यांनी तयार केलेल्या टिपणांबद्दल पंतप्रधान मॅक्डोनल्ड यांनी स्वतः पत्र लिहून संतोष व्यक्त केला, इतकेच ते सांगतात. देशमुखांच्या बुद्धिमत्तेला वा कार्यकुशलतेला मॅक्डोनल्डच्या शिफारसपत्राची जरूर काय आणि त्याचा आज आत्मचरित्रात उल्लेख करण्यात औचित्य ते कोणते? असे मला तीव्रतेने वाटले. सुदैव हे की अशी शिफारसपत्रे मिळविण्यासाठी देशमुखांनी कधी आटापीटा केला नाही. इतकेच नव्हे तर नियमांचा भंग करणाऱ्या वरिष्ठांना– मग तो ब्रिटिश गव्हर्नर असो वा कॉंग्रेस राजवटीतील मुख्य मंत्री रविशंकर शुक्ला असोत–त्यांची चूक सांगण्याचा निर्दयपणा देशमुखांनी सतत दाखविला. हे किस्से वाचताना नेकीचा सनदी नोकर कसा असे याची कल्पना येते व आजच्या तोंडपुज्या नोकरशाहीबद्दल देशमुखांनी व्यक्त केलेली खंत कशी मर्मग्राही आहे हे लक्षात येते.

सचिव म्हणून काम करताना देशमुखांनी शेतकऱ्यांच्या कर्जनिवारणविषयक कायदा, मालगुजारी रद्द करण्याचा कायदा यांसारखे पुरोगामी कायदे तयार करणे, वऱ्हाड व मध्यप्रांत यांमधील तंट्याबाबत योग्य मार्ग काढणारा मसुदा–जो दोन्ही पक्षांना व सरदार पटेलांनाही मान्य झाला–तयार करणे ही व अन्य जी मह-

त्याची कामे केली त्यांचा उल्लेख मोठ्या रेखीवपणे आलेला आहे; परंतु या सर्वांत अर्थविषयक सल्लागार म्हणून त्यांनी सादर केलेल्या निवेदनाचा उल्लेख महत्त्वाचा आहे. देशात आर्थिक मंदी आली असताना त्याविरुद्ध काय उपाययोजना करावी याबाबत मध्यप्रांत सरकारतर्फे निवेदन देताना केन्स या अर्थशास्त्रज्ञाच्या आधारे प्रे. रूझवेल्ट यांनी अमेरिकेत 'न्यू डील' हे धोरण स्वीकारले तशी उपायोजना करावी लागेल असे देशमुखांनी सुचविले. यावरून जे काम सचिव म्हणून ते करीत होते त्या कामावरील निष्ठा, प्रखर बुद्धिमत्ता आणि व्यासंग यामुळे सनदी नोकर असतानाही स्वतंत्रपणे विचार करून देशहिताच्या योजना ते सरकारपुढे मांडू शकले हे लक्षात येते. एक गोष्ट मात्र खरी की, सनदी नोकरीची सुरक्षित चौकट असलेला देशमुखांच्या जीवनातील हा कालखंड आशय व अभिव्यक्ती या दोनही बाबतीत बराचसा रुक्ष वाटतो. पंचमढी, बैतूल या परिसरातील निसर्गसौन्दर्याचे आणि कौटुंबिक जीवनातील काही घटनांचे ओझरते उल्लेख हाच याला अल्पसा अपवाद.

१९२२ साली छगला बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानात परत आले आणि १९४१ साली हायकोर्ट जज्ज होईपर्यंत त्यांनी वकिलीचा स्वतंत्र व्यवसाय केला. सुरुवातीची काही वर्षे, 'ब्रीफलेस् बॅरिस्टर' म्हणून कशी धडपड करावी लागली हे सांगताना छगलांनी त्या वेळच्या मुंबई हायकोर्टात प्रॅक्टिस करणाऱ्या कांगा, सेटलवाड, जिना, भुलाभाई देसाई, मुनशी इत्यादि नामवंत कायदेपंडितांची व्यक्तिचित्रे मोठ्या कुशलतेने रेखाटली आहेत. थोड्या वर्षांनंतर संधी मिळाल्यावर यशस्वी बॅरिस्टर म्हणून काम करताना छगलांनी निष्ठेने काम कसे केले, अनेक नामवंत वकिलांशी दोन हात करताना आणि कठीण कज्जे चालविताना त्यांच्या मनाला साफल्य कसे लाभले हे मनोज्ञ रीतीने व्यक्त झाले आहे. विशेषतः कायद्यामुळे बुद्धीला व मनाला वळण कसे लागते व कायद्याच्या साह्याने गुंतागुंतीच्या सत्याची उकल कशी होते हे छगलांनी बहारीने सांगितले आहे.

### छगला : पराभवाचा स्वीकार


या कालखंडात छगलांना हायकोर्टात यश मिळत होते; परंतु त्यांचे मन मात्र राजकारणाकडे ओढ घेत होते. 'Politics' हे प्रकरण वाचल्याबरोबर १९२२ ते १९४१ या कालखंडात छगलांना राजकारणात हळूहळू पराभव कसा पत्करावा लागला हे समजून येते. १९२२ साली छगला जेव्हा हिंदुस्थानात आले तेव्हा चौरीचोरा येथील घटनेनंतर म. गांधींनी आपली चळवळ मागे घेतली होती व देशभर राजकारणात निराशेचे ढग आले होते. थोड्याच वर्षांत पं. मोतीलाल नेहरू व चित्तरंजन दास यांच्या स्वराज्यपार्टीने संसदीय राजकारणास सुरुवात केली. छगला यांच्या प्रकृतीस हे राजकारण मानवणारे होते. त्या वेळी जीनांच्या नेतृत्वाखालील मुस्लीम लीग खिलाफतचळवळीत पुढे आलेल्या मुल्ला–मौलवींच्या धर्मवेड्या भूमिकेस विरोध करीत होती. बॅ. जीना त्या वेळी जहाल राष्ट्रीय पुढारी मानले जात व विलिंग्डन या गव्हर्नरला मानपत्र देण्याचा डाव त्यांनी उधळून लावल्यामुळे सर्व मुंबईत ते लोकप्रिय झाले होते. मध्यवर्ती कायदेकौन्सिलमध्ये वेगळा मुस्लीमपक्ष नसावा अशी भूमिका बॅ. जीनांनी मांडली व त्यामुळे छगलांनी त्यांच्या नेतृत्वाखालील मुस्लीम लीगचे चिटणीसपद स्वीकारले. १९२६ साली जेव्हा निवडणुका झाल्या तेव्हा पं. मोतिलाल नेहरू व मौलाना आझाद यांनी जो निवडणूक–जाहीरनामा काढला त्यामध्ये जातीय भूमिका संपूर्ण बाजूस सारलेली होती. या जाहीरनाम्याच्या आधारे मुंबईत इंडियन नॅशनल पार्टी स्थापन करण्यात आली. छगला हे त्या पक्षाचे एक चिटणीस होते व या पक्षाच्या तिकिटावर बॅ. जयकर व जिना या दोघांना उभे करण्यात आले व ते निवडूनही आले.

सायमन कमिशनचा रिपोर्ट काँग्रेसने फेटाळून लावला व हिंदुस्थानची घटना तयार करण्याकरिता पं. मोतिलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली. हा नेहरू रिपोर्ट तयार करण्यासाठी ज्या काही जणांना बोलाविले त्यामध्ये छगला हे एक होते. मुस्लीम लीगने नेहरूरिपोर्टात सुचविलेल्या काही सुधारणा अमान्य केल्यामुळे सर्वपक्षीय परिषदेचा बोजवारा उडाला. यानंतर लीगने नेहरू रिपोर्ट फेटाळला व त्या मुद्द्यावर बॅ. छगला यांनी मुस्लीम लीगचा राजिनामा दिला. बॅ. छगला यांनी आत्मचरित्रात या सर्व घटना अतिशय व्यवस्थितपणे व संगतवार मांडल्या आहेत. हे सर्व वाचल्यावर राष्ट्रीय भूमिका घेऊन संसदीय राजकारण करणे ही छगला यांची भूमिका होती व त्यांनी त्याप्रमाणे कामास सुरुवातही केली होती, हे स्पष्ट होते; परंतु राजकीय परिस्थिती झपाट्याने बदलली व छगला निष्प्रभ होत गेले. यानंतर मुस्लीम लीगची भूमिका बदलली व बॅ. जिनांनी राष्ट्रीय भूमिका संपूर्णतया सोडली. त्या काळातील घटनांचा अन्वयार्थ छगला यांनी तर्काच्या आधारे लावण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु एकदा हिंदू व मुसलमान हे एकत्र राहू शकणार नाहीत ही भूमिका जिनांनी घेतल्यावर, ब्रिटिशांचे या भूमिकेस साह्य असल्यामुळे भारतीय राजकारणात एक चक्री वादळ सुरू झाले आणि त्यामुळे छगला त्यांच्या समाजापासून दूर फेकले गेले. म. गांधींनी खिलाफत चळवळीला पाठिंबा देण्यात चूक केली असे छगलांचे मत होते आणि मुस्लीम लीगच्या आक्रमक पवित्र्यापुढे काँग्रेसचे पुढारी कसेही करून हिंदू-मुस्लीम ऐक्य घडावे या भूमिकेमुळे नमत होते हेही छगलांना मान्य नव्हते; परंतु या राजकारणाला विरोध करण्याचे सामर्थ्य त्यांच्याजवळ नव्हते. मौलाना आझाद हे जिनांच्या विरोधात काँग्रेसमध्ये राहिले पण छगला त्यांना साथ देऊ शकले नाहीत. तसेच युसुफ मेहेरअल्लींनी राष्ट्रीय चळवळीत झुंझारपणे भाग घेऊन सोशॅलिस्ट विचारांच्या आधारे लीगच्या अराष्ट्रीय भूमिकेस जो खंबीर विरोध केला त्या भूमिकेशीही छगला समरस होऊ शकले नाहीत. त्यांची नेमस्त प्रकृती त्या वेळच्या राजकीय परिस्थितीच्या संदर्भात दुबळी ठरली आणि त्यामुळे एका अर्थाने त्यांचे पंखच कापले गेले. ऑक्सफर्डहून परत येताना राजकारणात धडाडीने भाग घेण्याची त्यांची स्वप्ने भंग पावली. झाली. मुस्लीम जातीयवादी राजकारणाबद्दल छगलांना अतिशय तिटकारा होता आणि तो स्पष्ट शब्दांत त्यांनी मांडला आहे. आयुष्यभर 'सेक्युलॅरिझम्' वरील त्यांची निष्ठा अढळ राहिली; परंतु या त्यांच्या भूमिकेमुळे मुसलमान समाजातून त्यांची मुळेच उखडली गेली. ते केवळ एक बुद्धिमान कायदेपंडित म्हणून एकाकी राहिले. पुढे, फाळणीच्या वेळी जो जातीयरूप राजकारणाचा वणवा भडकत गेला त्या वेळी तर छगला अन्य राष्ट्रीय मुसलमानांप्रमाणेच मुस्लीम जनतेपासून दूर फेकले गेले. भारतातील राष्ट्रीय मुसलमानांची राजकारणात शोकांतिका झाली आणि त्याला आपल्या राष्ट्रीय

पुढाऱ्यांची धोरणेच कारणीभूत होती. छगलांनी हे स्पष्टपण म्हटले आहे; परंतु यामुळे ज्या मानसिक वेदना त्यांना दीर्घकाल सोसाव्या लागल्या त्याबाबत मात्र त्यांनी तक्रार केलेली नाही.

छगलांनी कृतिशील राजकारणातून जी माघार घेतली तिच्या संदर्भात आणखीही एका गोष्टीचा उल्लेख करावयास हवा तो हा की, स्वराज्यपार्टीचे काम १९२८ पर्यंत चालले. या वेळी छगला हे अगदी तरुण होते आणि त्यांनी या पक्षाच्या कामात भाग घ्यायला थोडी सुरुवात केली होती तोच असहकाराच्या चळवळीचे रणशिंग म. गांधींनी १९३० साली फुंकले आणि संसदीय राजकारणाचे महत्त्वच संपुष्टात आले. देश नवचैतन्याने भारून गेला. स्वराज्य-पक्षाचे अध्वर्यु पंडित मोतीलाल नेहरूही या चळवळीत सामील झाले; परंतु जवाहरलालजींच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या लाहोर काँग्रेस-मध्ये संपूर्ण स्वराज्याचा ठराव पास होत असताना हजर असलेल्या छगलांच्या मनाला या नवचैतन्याचा स्पर्श झाला नाही. लढाऊ राजकारण त्यांना झेपणारेच नव्हते. सायमन कमिशनच्या अह-वालाला उत्तर देणारा रिपोर्ट तयार करण्यात ते सहभागी झाले होते; पण या रिपोर्टाविरुद्ध मेहेरअल्लींनी जी तडफदार निदर्शने केली त्यामध्ये छगला सामील झाले नाहीत. स्वातंत्र्यसमराच्या काळात हे पर्यंकपांडित्य खुजे ठरले आणि त्यामुळे छगला हे राज-कारणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर झाले. पं. नेहरूंच्या सांगण्यावरून मुंबईत सिव्हिल लिबर्टीज युनियनचे काम करण्याचे त्यांनी मान्य केले; परंतु १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्यावर राजकारण अधिक वादळी होऊ लागले आणि ही पूर्वचिन्हे दिसू लागत असता-नाच छगलांनी वकिलीचा स्वतंत्र व्यवसाय सोडून हायकोर्ट जज्ज होण्याचे मान्य केले. माझी अपेक्षा होती की, या धकाधकीच्या राजकारणात आपणास सार्वजनिक जीवनापासून दूर का व्हावे लागले याबाबत बॅ. छगलांनी प्रांजळ विश्लेषण करावयास हवे होते. त्यांनी धड आत्मसमर्थनही केलेले नाही, त्यामुळे आत्मचरित्रातील Politics या प्रकरणाच्या उत्तरार्धाला उणेपणा आलेला आहे. मला हे प्रकरण वाचल्यावर असे वाटले की, छगलांनी आपली राजकीय पराभवाची व्यथा व्यक्त केलेली नसली तरी त्यांच्या मनातील सल लपून राहत नाही. छगलांना यापुढील आयुष्यात व्यावहारिक यश मिळाले; पण ऐन उमेदीत परिस्थितीमुळे त्यांना 'Heat and dust of battle' (ऑक्सफर्ड या प्रकरणाच्या शेवटी छगलांनी वापरलेले शब्द ) पासून माघार घ्यावी लागली. यापुढील आयुष्यात अधिकाराची जागा व सत्ताधिशांचा आधार यांच्यापासून दूर न होता समाजसेवा करावयाची ही मर्यादा त्यांच्या जीवनाला पडली. एका मूलभूत तडजोडीमुळे एका बुद्धिमान सामाजिक कार्यकर्त्याच्या जीवनाचा परिघ सीमित झाला. स्वप्नभंगामुळे विद्ध झालेल्या मनाची आर्त अवस्था व्यक्त करणे छगलांच्या मनस्वी स्वभावाला मानवणारे नव्हते; परंतु राजकारणाच्या वेगवान प्रवाहात दमछाक

पृष्ठ १९ वर



# रक्तगंध

● शाम फरांदे ●

तो उभाय्. एकटा. डोक्यावर हात ठेवून. त्याला कसलं तरी दुःख असावं. त्याच्या चेहऱ्यावर दिसतं हे दुःख डोकं जाम गरगरू लागतं. आठवू नये त्या गोष्टी आठवू लागतात. तो सिगरेट काढतो. सिलगावतो. जोरदार झुरका मारतो. आयुष्य असं का असतं? असं स्वतःलाच म्हणतो. असू दे लेट मी होप फॉर बेटर थिंग इन लाइफ. मग तो आठवू लागतो काही तरी. काय बरं? हो दॅट्स व्हॉट? तेच ते. आय मस्ट गो होम, माय वाइफ माइट बी वेटिंग फॉर मी. जाऊ लागतो. सिगरेटचा पुन्हा एकदा जोरदार झुरका मारतो.

'साहेब ऽऽ!'

'यस्.'

'मी रामा.'

'रामा!'

'हो मी रामा.'

'काय काम आहे?'

'माझं काम......!'

'कसलं?'

'प्रोबेशन पिरिअड संपून सहा महिने झालेत; पण मला अजून परमनंट केलेलं नाही. माझ्यावरोबरचे पर्मनंट होऊन तीन महिने झालेत...'

'ओ ऽ आय् सी, तू उद्या भेट. मी करतो तुझं काम.'

'साहेब!'

'काय रे...?'

'फार उपकार झाले.'

'कसचे...कसचे...! जा बघु आता.'

'नाही पण......' पाय धरतो

'सोड रे...मी साधा माणूस, माझे पाय काय धरतोस?'

'नाही साहेब. तुम्ही पोटाला लावलंत. तुम्ही आम्हाला देवासारखे.'

'ऊऽ...अरे वेडया, पाय परमेश्वराचेच धरावेत, माणसाचे नाहीत. अन् हे बघ तो पहातोय् आपणा सर्वांकडे, त्याला भिऊन वागायला हवं.'

शून्यात पाहू लागतो. रामा निघून जातो. रामावर विचार करू लागतो. ही माणसं फार भोळी. प्रेम करणारी. अशी माणसं मिळाली म्हणून–आज आपण काही तरी करू शकलो. या माणसांत आपल्याला परमेश्वराचा साक्षात्कार झालाय् म्हणून आपण यांची सेवा करू लागलोय् अन्...त्याच्या डोळयांसमोरून झर्रकन एकेक प्रसंग निसटू लागतात. हिरव्या गर्द निसर्गाचं संगीत तो पिऊ लागतो डोळयांनी. सोनेरी पिवळी झाक असलेले असंख्य मेघ ज्यांच्यावर निळं आकाश अधांतरी विसावलय्. हिरवे, पिवळे, नारंगी, लाल रंगांचे असंख्य मेघ घरंगळताहेत पर्वतावरून. वा ऽ फँटॅस्टिक! सोनेरी किरणांचे दोर या मेघांना गच्च विणून न्हायलेत आणि या साऱ्या दृश्याचा तोच फक्त एकटा साक्षीदार असावा याचा त्याला अभिमान वाटू लागतो. छाती दोन इंच फुगते; पण लागलीच कुठुन तरी–मुलायम स्वर येतात, कोण बरं गातंय्! कुणी तरी गंधर्वकन्या गात असावी. आहा ऽ मस्त. सुरांचा गोडवा वाढतो. सूर काळजात घुसतात–असं त्याला वाटतं. आता अगदी जवळून आवाज येतो. मग तो स्वतःवर मनोमन खूष होतो. इतक्यात सुरातून लोंबणारे शब्द त्याच्या कानावर पडतात. 'साकिया ऽऽ आज मुझे–नीन्द नही आयेगी ऽऽ...' खर्रर्रर्रर्र फोनो बंद झाल्यानंतरची शांतता त्याला भेडसावू लागलीय्. बायकोचा कर्णकर्कश आवाज त्याला जाणवतोय्. 'घरात काही आहे की नाही याचा काही विचार आहे की नाही? सक्काळ-संध्याकाळ, सक्काळ–संध्याकाळ लष्करच्या भाकरी भाजायच्या...बस्स. झालं. घरात तेलं नाही, धान्य नाही. तुमचं हे असं वागणं पसंत नाही. किती दिवस मी माहेरून पैसे आणणार?'

आवाज तोच पण किती विसंगत. च्यायला आपलं आयुष्य हीच एक जबरदस्त विसंगती आहे. जो आवाज साकिया म्हणून हाकारतो तोच आवाज इतका निर्दय बनावा? जाऊ दे असंच टकरा खात खात आपलं आयुष्य जाणार. जाऊ दे. दॅट्स ऑल राइट. काय करू मग? ती म्हणते लष्करच्या भाकरी भाजणं बंद.

पण मी शपथ घेतलीय्.

आता ते शक्य नाहीय्.

या मार्गापासून दूर जाणं.

What to do? What to do? What to do? What to do? जाऊ दे. तो वाट काढील. तोच मार्ग दाखवील. परमेश्वरा, दाखव ना मार्ग, दाखव ना रे... असा विचार डोक्यात आलाय् अन्...एकाएकी रक्ताचा प्रवाह त्याच्या डोळयांसमोर वाहू लागतो. रक्ताचे थारोळे, त्यात पडलेला त्याचा बाप......नको ऽ नको ऽ नो! नो! माय फादर. बाबा ऽऽऽ बाबा ऽऽऽ Where is the God? God could not save him. तू त्याला वाचवू शकला नाहीस. नाहीस. त्याला आठवतं त्याचा बाप कुलीकाम करायचा. उंच उंच इलेक्ट्रिक पोलवर चढायचा. तारा आवळणं त्याचं काम. प्रामाणिक. त्याच्या बापासारखा प्रामाणिक कामगार झाला नाही असं त्याला जुने कामगार सांगायचे. मग त्याचा ऊर भरून यायचा. त्याचा बाप असाच एके दिवशी पोलवर चढला अन्......

रक्त. रक्ताचं थारोळं. त्यात तडफडणारा त्याचा बाप, त्याची आई अन् तो धावत आले होते त्यांना कळल्यावर. तिला काही सुचलं नव्हतं. तिनं टाहो फोडला होता. तो सुद्धा ती रात्र रडला होता. त्याचं जग एकाकी अनाथ असं झालेलं. त्यातून तो वर आला; पण त्याला अधूनमधून झटके यायचे.

बाबांच्या मावानं तो आरडायचा. बाप रक्ताच्या थारोळ्यात तडफडत असलेली स्वप्नं पडायची. मग तो झोपेतून किंचाळायचा. किती भयंकर आयुष्य काढलं त्यानं. How terrible life I had ! असं म्हणायचा तो. मग त्याला फार फार वाईट वाटायचं. त्यानं रक्त पाहिलं होतं. ते त्याच्या बापाचं होतं. मग त्यानं कसम खाल्ली. हे रक्त, या रक्तातून वाहणाऱ्या वेदना त्याला कायमच्या शमवून टाकायच्याहेत.

तो शिकला भिक्षा मागून. खूप डोकेफोड केली. खूप कष्ट घेतले. त्याला कळली होती कामगाराच्या घामाची किंमत. त्याला कळली होती कामगाराच्या रक्ताची किंमत. मग तो पेटून उठला. गर्जू लागला 'कामगार जिंदाबादऽ' 'कामगार जिंदाबादऽ' त्यानं संघटना उभारली. तो लढू लागला. झगडू लागला. त्यानं युद्ध पुकारलं. हे युद्ध तो लढणार होता अमानुष जगाशी. हे युद्ध तो लढणार होता जगातल्या पशुतेशी.

त्याची आई

तो–दोघंच. हेलपाटे मारायची ऑफिसात. ऑफिसर बोंबलायचा. शिव्या द्यायचा. आईनं पाय धरले. विनवण्या केल्या पण... त्याच्या बापाचे पैसे मिळाले नाहीतच. त्याची आई रडायची बापाला आठवून.

तो पण मग रडायचा. त्याचं मन बंड करायचं. त्याला माहीत होतं हे जग खोटयाचं आहे. खरं काहीच नाही. तो पेटून उठला. त्याच्या हृदयात अंगार पेटला. तो झगडू लागला असत्याशी. तो आता आयुष्यभर झगडणार होता.

'साहेबऽ'

'यस्.'

'माझं काम...'

'काय रे...?'

'माझा प्रॉव्हिडंट फंड अजून मिळाला नाही.'

'तेवढं बघा, तुमच्याशिवाय कोण पाहणार गरिबांकडे.'

'बरं बरं मी करतो तुझं काम. तू उद्या भेट.'

रक्ताचा प्रवाह अचानक समोर दिसू लागतो. त्याला फार–'फील' होतं. त्याच्या बापाचे पैसे दाबून टाकले होते अधिकाऱ्यांनी. त्याच्या बापाचं आयुष्य ही गोष्ट त्यांच्या खिजगणतीतसुद्धा नव्हती !

त्याच्या बापाच्या रक्ताला मोल नसावं !
त्याच्या बापाच्या घामाला मोल नसावं !
त्याच्या बापाच्या कष्टाला मोल नसावं !
का नसावं ? का ? का ? का ? का ?
आमचा घाम, आमचे रक्त.

आमच्या वेदना, आमचे दुःख, सारं सारं आम्हीच का सहन करायचं ? होच मुळी आपला जन्मच त्याकरता आहे. आज त्याला हे फार खटकतं. आज तो फार मोठा पुढारी झालाय्. आज तो कामगारांचा राजा झालाय्. आज तो उद्दाम जगाला धडा शिकवू लागलाय्. जनावरांबरोबर झुंज देऊ लागलाय्. त्याच्या बापासाठी कोणी झुंज दिली नव्हती मग त्यानं का द्यावी ? का द्यावी ? त्याला लाल रक्ताचा प्रवाह दिसतो पुन्हा. रक्ताच्या चिळकांड्या, त्यात निथळणारा त्याचा बाप वगैरे. मग त्याचं रक्त उसळ्या घेऊ लागतं. तो बेभान होतो. पेटतो. चिडतो. खवळतो. सूडाचा अंगार पेटू लागतो हृदयात. सूड ! नो ! सूड नाही. झुंज अन्यायाविरुद्धची.



'साकियाऽऽ' (पुन्हा सूर गुंजू लागतात. भ्रमर होऊन हुंगलेल्या गुलाबी दिवसांची त्याला याद येते. आहाऽऽ काय मज्जा यायची त्या दिवसात. मोहोरलेले दिवस. शृंगारानं बहरलेल्या रात्री. गात्रं धुंद करणाऱ्या रात्री. आभाळानं घेतलेली धरेची चुंबनं वगैरे तसंच बरचसं फॅंटॅस्टिक ! वाऽ पण...

बायकोची याद, बायकोची फिर्याद. अमुक नाही– तमुक आणा. तमुक नाही अमुक आणा. वैताग. नको बुवा संसार. नको ! नकोच मुळी. 'साकियाऽऽ' पुन्हा गीताचे स्वर कानांवर येतात. मी प्रेम केलं. इमानदारी. सालं आय् वुड हॅव डीसीव्हड द वर्ल्ड बट नॉट हर. म्हणून लग्न. बंधन.

पण आता हे अवघड वाटायला लागलंय्. आय डोंट वॉंट बाईंडिंग्ज. जाऊ दे, तिची तरी काय चूक ? लग्न मी केलंय्. निस्तरलं पाहिजे. तिचं पण बरोबरय्. आपण घरच्यासाठी किती वेळ खर्च करतो ? चला जावं घरी. घरी येतो. बायको सोनुल्याला मांडीवर घेऊन बसलीय्. चेहरा भांबावलेला. भेदरलेला. च्यायला, व्हॉट हॅपन्ड ?

'काय ग ! काय झालं ?'

'बाळाला तापंय्'

'मग चेहरा का असा केलास वेडावाकडा ? डॉक्टरला दाखवायचं नाहीस का ?'

'डॉक्टर मघाशीच येऊन गेलेत. ते म्हणतात बाळाला चांगल्या दवाखान्यात अॅडमिट करायला हवं.'

'मग ?'

'तुमची वाट पहात होते. डॉक्टरला डायग्नॉसिस झालेलं नाही तेव्हा...'

'बरं बरं... मी टॅक्सी घेऊन येतो. आपण दवाखान्यात जाऊ.'

हॉस्पिटलमध्ये येतात. युरीन, स्टूल, ब्लड तपासून घेतात. एक्सरे काढायला हवा. डॉ. म्हणतो.

याला दोन दिवसात ऑपरेशन करायला हवं. बायकोच्या डोळ्यांत पाणी. तो हादरलाय्. एकुलता एक पोर. त्यातून लहान. त्याला 'फील' होतं. फारच 'फील' होतं. बायकोला थोपटतो. तिला सावरतो, 'अग, ऑपरेशनचं काय विशेष, डोंट वरी. सारं काही व्यवस्थित पार पडेल.' दोन दिवस. फक्त दोन दिवस डॉक्टर इंजेक्शने देतो.

'आज अॅडमीट करायची जरुरी नाही, उद्या केलंत तरी चालेल. या इंजेक्शननं त्याला आराम वाटेल अन् या गोळ्या आज नी उद्या आठवणीनं द्या बरं...'

घरीं येतात. तो स्वस्थ बसतो. त्याला अस्वस्थ वाटू लागतं. कसं तरीच वाटतं. बेल वाजते टर्रर्रर्रर्न्... कुणी तरी आलंय्. 'साहेबऽ'

'यस'

'परवाच्या संपाची सिद्धता झालीय्.'

'ओऽ आय्. सी. प्रत्येक डिपार्टमेंटच्या वर्कर्सना कॉंटॅक्ट केलं ?'

'हो'

'बोर्डस् लावलेत ?'

'हो.'

'कॉर्नर मीटिंग्ज घेतल्या ?'

'हो.'

'मग आता असं करा, साऱ्यांना आज गोल्डन पार्कवर गोळा करा...'

'होय साहेब, तशी नोटीस फिरवलीय्, युनियनचे सारे लोक येणार आहेत.'

'बरं... मी येतोच ऑफिसवर तुम्ही व्हा पुढे.'

तो जातो युनियन ऑफिसवर. हे ऑफिस निरनिराळ्या पुढाऱ्यांच्या फोटोंनी सुशोभित केलेलं असतं. लेनिन–मार्क्सच्या जोडीला राष्ट्रीय पुढाऱ्यांचे फोटो असतात. त्याचे सुद्धा फोटो असतात. कामगारासमोर भाषण करतानाचे. फोटोवरून नजर फिरवतो. त्याची छाती फुगते. त्याला आठवतात युनियन बांधताना त्याने घेतलेले कष्ट. त्यानं युनियन बांधली. त्याच्यामुळे युनियन फोफावली. त्याचे सहकारी जिवाला जीव देणारे. त्याच्यामागे एकवटून उभे ऱ्हायले. तो अध्यक्ष झालाय् युनियनचा. युनियनच्या प्रथम वर्धापनदिनी झालेली भाषणं त्याला आठवली. सदूनं केलेलं भाषण. सदू पोलवर काम करणारा कुली.त्याच्या बापाच्या वेळचा. त्याच्या बापाचादोस्त. त्याचं भाषण गद्गदून टाकणारं. तो म्हणाला. 'दोस्तांनो, मी अडाणी माणूस, काय बोलणार पर एक गोष्ट सांगतो... तों हाये... परमेश्वरानं आज कौल दिलाया गरिबाच्या बाजूनं. ह्यो अधिक्ष्य सायेब माझ्या दोस्ताचा पोरगा. ह्याला मी ऱ्हानपणापासून पायलाय्, ह्यो लई मोटा हुनार– लई मोटा हुनार. याचा बाप तडपडून म्येला त्येच्याकडं कुणी बगीटलं ऱ्हाई पर... आज ह्यो पट्ट्या अन्यावाइरुद्ध उबा ऱ्हाईलाय. 'देवाची करनी आन् नारळात पाणी.' तो भारावून गेला. गहिवरला. डोळ्यातून घो घो पाणी वाहू लागलं. त्याला माणसाची किंमत कळली. त्याला माणुसकीची किंमत कळली. अशी माणसं त्याला भेटली म्हणून जगण्याला आधार आलाय.

संध्याकाळ झालीय्. त्याला जायचांय भाषणाला. त्याला गेलंच पाहिजे. आग पेटवायचीय कामगारांच्या हृदयात. अंधार संपवायचाय त्यांच्यातला. प्रकाश विखरून टाकायचाय्. तो जातो मीटिंगकडे. लोक जमलेले असतात. एक मोट्ठा, गच्च तुडुंब जनसंमर्द जमलाय्. तो येतो. सारे त्याच्या विजयाचे नारे लावतात. घोषणांनी आभाळ गर्जून जातं. त्याच्या नावाचा जल्लोश होतो. तो उभा रहातो. भाषणाला सुरुवात करतो.

'मित्रहो,'

'आज आपण एका महान यज्ञाला सुरुवात करणार आहोत. हा यज्ञ–श्रमिकांचाय्. ह्या यज्ञात सामील व्हायला हजारो रसिक इथं जमलेत. घामाचे समुद्र वाहवून तुम्ही जगाला प्रकाश दिलाय्. सुख दिलंय्. पण् तुम्ही सुखी आहात काय ? कष्ट तुमचे, घाम तुमचा. तुम्ही–फक्त मरमर मरायचं. कुणासाठी ? का ? या प्रश्नांची उत्तरं तुम्हाला–ठाऊक असावीत. आहेत. आपण सारेजण आता युद्ध पुकरणार आहोत. या आर्थिक विषमतेबरोबर. आपण झगडणार आहोत भांडवली वृत्तीबरोबर. आपला झगडा ह्या माणसाबरोबर नाही तर माणसातल्या अमानुषतेबरोबर आहे. माणसातला 'माणूस' जागा करण्यासाठी आपण भांडणार आहोत. या यज्ञाला आहुती लागते रक्ताची, ती आपण द्यायला तयार व्हायला हवं. हा यज्ञ ही एक सुरुवात आहे रामराज्याच्या उदयाची. हा यज्ञ संपेल तेव्हा नवी पहाट उगवणार आहे अन् सारी दुःखं संपणार आहेत. म्हणून झगडायचं, झुंज द्यायची.' असं काही तरी बरंच टेरिबल बोलला तो. टाळ्यांचा कडकडाट झाला. त्याचं नाव दुमदुमू लागलं. लोकांनी जयजयकार केला त्याचा. त्यानं डिक्लेअर केलं परवापासून बेमुदत बंद पुकारायचाय् म्हणून. मागण्य मान्य झाल्याच पाहिजेत. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत झगडा द्यायचा. त्याच्यासमोर बरेच प्रश्न असतात. बोनस, ग्रॅच्युइटी, महागाई वगैरे. पोलवर काम करण्याऱ्या वर्करच्या आयुष्याची हमी या साऱ्या प्रश्नांनी त्याच्या डोक्यात थैमान

घातले होते. तो आता शांत रहाणार नव्हता.

अचानक रक्ताचा प्रवाह डोळ्यांसमोरून वाहू लागला. थारोळं, त्याचा बाप रक्ताने माखलेला. त्याच्या डोळ्यांसमोर 'जीसस' उभा राहिला. रक्ताने माखलेला. हे रक्त तो पाहतो. ह्या रक्तातून क्रांती होणार असते. हे रक्तच त्याला प्रेरणा देत असतं. त्याला वाटतं आपणसुद्धां रक्ताचं अर्घ्य व्हावं मानवतेसाठी, फक्त मानवतेसाठी, होच मुळी. माझा बाप, जीसस क्राइस्ट, कामगार, रक्त हे सारं काय चाललंय्? व्हॉट इज धिस्? जीस खिळला गेला. आपणसुद्धा खिळलं जावं. रक्ताचे पाट वहावेत. या रक्तातून एक प्रचंड वृक्ष उभा रहावा. मग या वृक्षाच्या सुखद सावलीत हजारो कामगार समाधानानं विसावतील अन् मग...

त्याच्या नावाचा जल्लोश चालूच असतो. तो भारावून गेलेला असतो. त्याला वाटतं आपलं स्वप्न पुरं होणार. आपण बदलणार हे सामाजिक वातावरण. आपण दूर करणार या विषमतेच्या भिंती. आपण गप्प बसलो तर...! कसं शक्यय्? हे होणारच. It must happen.' परमेश्वरा, मी आयुष्यात तुला काही मागितलं नाही माझ्यासाठी; पण आता सर्वांसाठी हा यज्ञ करतोय्. या कार्यात यश देच!' अशी करुणा भाकतो. परवा त्याचा सत्याग्रह सुरू होणार असतो. बोर्ड लागतात. रस्त्यारस्त्यावर, चौकाचौकात 'विद्युतकामगारांचा बेमुदत बंद' तयारी जोरात झालीय्. प्रत्येक कामगार पेटून उठलाय्. लढा द्यायचाय. माघार घ्यायची नाही. उद्याचा दिवस संपला की परवा विद्युतमंडळाच्या लोकांना नाक मुठीत धरून आमच्या मागण्या मान्य कराव्या लागतील. करायलाच हव्यात.

जिथं कामगारांच्या जिवाची शाश्वती नाही, जिथं कामगारांच्या श्रमाला मोल नाही, जिथं कामगारांच्या घामाला मोल नाही—तिथं प्रामाणिकपणानं काम करायच. काय उपयोग होतोय याचा? रक्त ओकून काम करणारे काय खातात? कसे रहातात? कसे जगतात? याचा कुणी विचार केलाय का? नो! कुणीच नाही म्हणून आपल्याला करावा लागलाय्,

आज तो दिवस उजाडलाय. तो अस्वस्थ झालाय्. तीन दिवसांत तो घरी गेला नाही. त्याच्यासमोर 'बंद' फक्त 'बंद' सत्याग्रह. त्यानं सांगितलं होतं. सरकार मुस्कटदाबी करेल. गोळीबार होतील. नोकऱ्या जातील, अत्याचार होईल, पण...निर्भयपणे या साऱ्या गोष्टींना सामोरं गेलं पाहिजे.

बंद यशस्वी झालाय्. शंभर टक्के. त्याला फोनवर फोन येताहेत. मित्रांचे, राजकीय पुढाऱ्यांचे. साऱ्यांनी त्याचं अभिनंदन केलंय्. तो मनोमन खूष झालाय्. त्याला अभिमान वाटू लागलाय् स्वतःच्या ताकदीचा. तो आता तडजोड करणार नाही. त्याला तडजोड नकोय् मुळी. सी. एम. चा फोन. संप मागे मागे घ्या म्हणून विनवणी करतोय्. तीन-चतुर्थांश मागण्या मान्य आहेत त्याला. He is terribly frightened कारण... विद्युतपुरवठा बंद झालाय्. कारखाने बंद झालेत. प्रॉडक्शन बंद झालंय्. लक्षावधी रुपयांची हानी होतेय्, मिनिटामिनिटाला सी. एम. फोन करतोय् पुन्हा पुन्हा. पण...हा आता ताठलाय्. हा तसा बधणार नाही. ह्याला सरकारला वाकवायचं आहे. सत्ताधाऱ्यांना वाकवायचं आहे. आता तो सूडानं पेटून उठलाय्. त्याचे डोळे लकाकू लागलेत. त्याला आपल्या ताकदीचा गर्व वाटू लागलाय्. तो झुकणार नाही. सारे त्याच्या पायाशी यायला हवेत.

अखेर त्यानं जिंकली, सरकार नमलं.
मागण्या मान्य, बंद मागे घेतलाय्

याचा विजय. कामगारांचा विजय. रक्ताचा विजय याच्या बापाच्या. त्याला आज कृत्यकृत्य झाल्यासारखं वाटू लागलंय्. त्याला वाटतं ओरडून जगाला सांगावं की 'मी विजयी आहे.' 'मी विजयी आहे.' आज त्यानं लढाई जिंकलीय् उद्दाम जगाबरोबरची. वृत्तपत्रांचे प्रतिनिधी जमलेत. त्याची मुलाखत घेतलीय्. त्याचे पटापट स्नॅप्स मारले गेले. तो आता घरी जायला निघालाय्. त्याला बायकोला सांगायचंय सारं. त्याचा पराक्रम तिला सांगायचाय्. तिनं हे ऐकलं तर ती नाचेल आनंदाने. ओरडेल. घट्ट मिठी मारेल. टॅक्सी पकडलीय्. तो ड्रायव्हरला सांगतोय् वेग वाढवायला. 'वाढव!' वाढव... आणखी वाढव स्पीड! मला लवकर जायचंय् घरीऽ वेग दे! वेग देऽ वेग! वेग! वेग! गाडी ऐंशीच्या स्पीडने चाललीय् तरी तो म्हणतोय् वेग वाढव म्हणून. त्याच्या आनंदाला वेग आलाय्. अ ट्रेमेंडस स्पीड. आवेग जबरदस्त आवेग आहे तिला सांगण्याचा.

खर्र्र्र्र्र्र्र्र; गाडी थांबते. नोट फेकतो ड्रायव्हरच्या अंगावर. त्याला घाई झालीय्, फार घाई झालीय्. तिला भेटण्याची. तो धावत आत घुसतो. ओरडतो 'राधाऽऽ राधाऽ। 'राधाऽऽ' आत गर्दी जमलेली असते बायकामाणसांची. त्याला वाटं आपल्या बायकोचं अभिनंदन करायला हे सारे जमले असावेत. तो घुसतो घोळक्यात. पाहतो. त्याच्या छातीत धस्स् होतं, त्याचं काळीज चरकतं. बायको त्याला पाहून हंबरडा फोडते.

त्याला आता काही सुचत नाही. तो खाली बसलाय्. बाळाला हातात घेतोय्. बाळाला शांत झोप लागलीय्. कायमची झोप. बायको आक्रोश करतेय्. ओरडतेय्. त्याच्या डोळ्यांतून आपोआप पाण्याचे कढत थेंब ओघळू लागलेत. तो बायकोला थोपटतोय्. असं का व्हावं? असं का घडावं? बाळ माझा बाळ. बाळाकड आता पहावत नाही. बायको किंचाळते अचानक.

'तुम्ही खुनी आहात ऽऽ आपल्या बाळाला मारलंत ऽऽ

झालं का तुमचं समाधान ऽऽ! चालते व्हा! मला तोंड दाखवू नकाऽ तुम्हाला माहिती होतं बाळाला बरं नाही. तीन दिवस झाले तुम्ही घरी नाही' आपलं बाळ ऑपरेशनसाठी ऑपरेशनरूममध्ये नेलं पण... ऑपरेशनच झालं नाही.·. लाइट नव्हता. तुम्ही बंद केला होतात—दुसऱ्यासाठी पोटच्या पोराला मारलंत. किती निर्दयी आहात ऽ निर्दयी ऽऽ निर्दयी ऽऽऽऽ, राधे, तुला कसं सांगू मी निर्दयी नाही जग निर्दयी आहे. बाळाच्या अंगावर अश्रूंचा अभिषेक होतोय्. तो पहातोय् बाळाकडे.

बाळाच्या चेहऱ्यावर तेज असतं, बाळाचा चेहरा हसरा असतो. अचानक रक्ताचं थारोळं समोर येतं. त्याचा बाप आता हसत असतो. रक्ताच्या फवाऱ्यातून पारिजाताची फुलं इतस्ततः विखुरली जातात. त्याला दिसतं जीसस क्राइस्ट, आपलं बाळ अन् बाप यांचा चेहरा एकच आहे. मग तो ओरडतो मोठ्याने ओरडतो" परमेश्वरा ऽऽ मी तुझं काय् केलंय ऽऽ का शिक्षा दिलीस मला ऽऽ

त्याच्या डोळ्यांसमोर रक्ताचा प्रचंड प्रवाह वाहतोय्. त्याचा बाप, जीसस क्राइस्ट, बाळ फिरू लागलेत त्याच्या डोक्याभोवती. घोषणांचे प्रचंड आवाज ऐकू येताहेत. त्याच्या गळ्यात हजारो पुष्पहार घातले जातात. अश्रूंचा प्रचंड वर्षाव होतो. सारे हार वाहून जातात या प्रवाहात. फुलं विखुरली जातात आसमंतात. या फुलांचा गंध आसमंत हुंगत असतो. ☐ ☐

# तुमची मदत असेल तर आम्ही तुमची अधिक चांगली सेवा करू शकू

| १९७३-७४ मध्ये आयुर्विमा महामंडळाने दिलेल्या क्लेम्सची संख्या | १९७३-७४ मध्ये आयुर्विमा महामंडळाने निकालात काढलेल्या क्लेम्सची रक्कम |
|---|---|
| ३.७४ लाख | रु १०७.३६ कोटी |

१९७३-७४ मध्ये दाखल केल्या गेलेल्या एकूण क्लेम्सपैकी ७९% क्लेम्स आयुर्विमा महामंडळाने निकालात काढले. राष्ट्रीयीकरणापूर्वी खाजगी विमा कंपन्यांकडून या बाबतीत ज्या गतीने काम होत असे, त्यापेक्षा आमचे यश कितीतरी पटीने अधिक वेगवान ठरते आहे.

पॉलिसीधारक वा त्यांचे वारस यानी पॉलिसी डॉक्युमेंट, मृत्यूचा दाखला आणि/किंवा वारसाहक्क इ. संबंधीचे दस्तऐवज वेळीच न पुरविल्याने पुष्कळसे क्लेम्स निकालात काढता आले नाहीत. असे असूनही ३६ लाख रु. चे १२५० क्लेम्स आम्ही निकालात काढू शकलो. तरीही अजून आमचे संपूर्ण समाधान झालेले नाही. आमच्या कामाच्या पद्धतीत आम्ही सतत सुधारणा करीतच राहिलो आहोत. 'क्लेम पेमेंट सर्व्हिस' नावाचा सेवाविभाग आम्ही याच दृष्टीने चालू केला आहे. अशा प्रकारचा विभाग भारतात इतरत्र नाही. क्लेम्स निकालात काढावयाच्या कामाला आम्ही अग्रहक्क देतो.

तुमचे क्लेम लौकरात लौकर निकालात निघणे वा न निघणे सर्वस्वी तुमच्यावर अवलंबून आहे. तुमच्या वयाची महामंडळाकडून मान्यता आपल्या पश्चात् पॉलिसीचे पैसे कोणास मिळावेत याचा नामनिर्देश, पत्त्यात झालेला बदल याबाबतची माहिती महामंडळास विनाविलंब द्या.

डिस्चार्ज व्हाऊचर महामंडळाकडून महिनाभर आधीच पाठविले जाते, हे ध्यानात असू द्या. प्रस्तुत व्हाऊचर, आवश्यक तपशील संपूर्ण भरून पॉलिसीसह ती ज्या कचेरीतून दिली गेली असेल त्या कचेरीकडे ताबडतोब पाठवा.

तुमच्या क्लेमबाबत काही विलंब झालाच तर पॉलिसीसंबंधीचा अखेरचा व्यवहार महामंडळाच्या ज्या कचेरीने केला असेल त्या कचेरीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याशी संपर्क साधा. आपणास काही शंका असल्यास मार्गदर्शनासाठी आपले एजंट किंवा महामंडळाच्या नजिकच्या कचेरीशी संपर्क साधा.

**तुमच्या सहकार्याने आम्ही तुमची अधिक चांगली सेवा करू शकू.**

योगक्षेमं वहाम्यहम्

## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया

RADEUS/LIC/AS-8

दोन आत्मचरित्रे—परिचय व परीक्षण : पृष्ठ १३ वरून

झाल्यामुळे किनाऱ्याकडे परतताना त्यांना जे दुःख झाले असणार त्याची कल्पना सहृदय वाचकाला येऊ शकेल.

राजकीय जीवनाला रामराम ठोकून हायकोर्ट जज्ज झाल्यावर छगलांनी अत्यंत निष्ठापूर्वक त्या जागेवर काम केले आणि या कामात त्यांच्या बुद्धिमत्तेला व कायद्याच्या आधारे सत्यशोधन करणाऱ्या त्यांच्या मनाला उदंड आनंद मिळाला. या कालखंडातील न्यायमूर्ती कानिया, दिवेटिया, तेंडुलकर, बावडेकर आदींची वैशिष्ट्ये छगलांनी मोजक्या शब्दांत परंतु अतिशय मार्मिकपणे टिपली आहेत. बोमंट या इंग्रज न्यायाधिशाला स्वातंत्र्यसंपादनासाठी भारतीयांनी कायदेभंग करणे मान्य नव्हते व त्यामुळे ते अनेकदा स्वातंत्र्यचळवळीच्या विरोधी बोलत; परंतु याच बोमंटसाहेबांचे पुरुषोत्तमदास त्रिकमदास या समाजवादी बॅरिस्टरवर अतिशय प्रेम होते व ते त्यांना जेलमध्ये भेटावयासही गेले, ही घटना छगला यांनी ज्या रीतीने सांगितली आहे त्यावरून मनुष्यस्वभावातील विसंगत वाटणाऱ्या प्रवृत्ती ते किती सहृदयतेने समजून घेत हे कळून येते. ◻

१९३९ साली चिंतामणराव देशमुखांच्या जीवनात कर्तृत्वाचे एक नवे दालन उघडले गेले. सनदी नोकर म्हणून काम करताना ज्या मर्यादा त्यांच्या बुद्धिमत्तेवर व कर्तृत्वावर पडल्या होत्या त्या मर्यादा देशाच्या आर्थिक व्यवहाराच्या क्षेत्रात रिझर्व बँकेचे डेप्युटी गव्हर्नर व नंतर गव्हर्नर झाल्यावर राहिल्या नाहीत. या क्षेत्रात आत्मविश्वासाने पावले टाकताना देशमुखांना कसे साफल्य वाटत होते हे त्यांच्या आत्मचरित्रातील Central Banker या विभागात प्रत्ययास येते. देशमुख हे रिझर्व बँकेचे गव्हर्नर झालेले पहिले भारतीय होते. त्याबद्दल वाटणारा आनंद व अभिमान बॅ. जयकर, धनंजयराव गाडगीळ आदि नेत्यांनी व विचारवंतांनी व्यक्त केला; परंतु त्यांच्या गौरवोद्‌गाराचा उल्लेख करतानाच देशमुखांनी शिल्पकार करमरकर यांनी त्यांना लिहिलेल्या पत्राचा व 'Fisher Girl' या आपल्या विख्यात कलाकृतीची ब्रॉन्झ प्रतिकृती देशमुखांना भेट म्हणून दिली त्याचा ज्या रीतीने उल्लेख केलेला आहे त्यावरून त्यांच्या रसिक मनाची साक्ष पटते.

१९४६ च्या मे महिन्यात त्या वेळचे व्हाइसरॉय वेव्हेल यांनी देशमुखांना पत्र लिहून नव्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये फायनान्स–मेंबर म्हणून येण्यास ते तयार आहेत का, अशी विचारणा केली. या पत्राला देशमुखांनी लिहिलेले उत्तराचे पत्र अतिशय मार्मिक व देशमुखांच्या स्वभावावर प्रकाश टाकणारे आहे. ही मानाची जागा स्वीकारणे हे आपल्याला शक्य होणार नाही हे कळविताना देशमुख लिहितात, 'बदलत्या परिस्थितीत फायनान्स–मेंबरच्या कामाचे स्वरूप अधिकाधिक राजकीय होत जाईल व यापेक्षा रिझर्व बँकेचे गव्हर्नर म्हणून राजकारणापासून दूर असलेले व Technical कामच मी अधिक प्रभावीपणे व सातत्याने करू शकेन.' आपली प्रकृती उत्तम नसताना राजकारणाच्या नव्या क्षेत्रात पदार्पण करणे व नवी 'करिअर' सुरू करणे शक्य नाही असेही देशमुखांनी या पत्रात लिहिले आहे. येथे स्वतःचे सामर्थ्य व मर्यादा यांची पूर्ण जाणीव असलेल्या देशमुखांच्या Intellectual Integrity (बौद्धिक प्रामाणिकपणाच्या) झालेल्या आविष्कारामुळे माझ्या मनातील त्यांच्याबद्दलचा आदर दुणावला.

देशमुख व छगला यांच्या आयुष्याच्या वेगवेगळ्या अवस्थांत लो. टिळक, म. गांधी व पं. नेहरू या तिघांनी भारताचे नेतृत्व केले. या तीन थोर नेत्यांबद्दल देशमुख व छगला यांना काय वाटत होते हे या दोन आत्मचरित्रांत स्पष्टपणे व्यक्त झाले आहे. लोकमान्यांना ज्या वेळी हिंदुस्थानात सर्वश्रेष्ठ नेते म्हणून मान्यता मिळाली होती त्या १९१४ ते १९१९ या कालखंडात देशमुख व छगला हे तरुण विद्यार्थी होते. तरुण मनाला जहाल राजकारणाबद्दल वाटणारे आकर्षण व लोकमान्यांची असामान्य बुद्धिमत्ता यामुळे देशमुख व छगला या दोघांच्याही मनात त्यांच्याबद्दल नितांत आदराची भावना होती. जहाल राजकारण करीत असताही कायद्याबद्दलचा लोकमान्यांचा दृष्टिकोन छगलांच्या मनोभूमिकेशी जुळता होता; परंतु लोकमान्यांच्या त्यागाबद्दल व कर्तृत्वाबद्दल आदर असला तरी या काळात देशमुख व छगला हे दोघेही इंग्लंडमध्ये विद्यार्थी म्हणून अभ्यास करीत असल्यामुळे लोकमान्यांच्या राजकीय चळवळींशी त्यांचा दुरूनही संबंध येणे शक्य नव्हते.

म. गांधींचे पुढारीपण देशमुख व छगला या दोघांच्याही वृत्तीला मानवण्यासारखे नव्हते. सर्वसामान्य माणसाला स्वातंत्र्यलढ्यात सामील करून घेण्यासाठी म. गांधींनी दिलेला चरख्यावरील भर, मिठाचा सत्याग्रह आदि गोष्टींत या दोघांना फारसे स्वारस्य नव्हते. म. गांधी जी आतल्या आवाजाची भाषा बोलत ती आणि गांधीयुगात प्रत्यक्ष कृतीवर भर देताना दुय्यम गांधीवाद्यांकडून बुद्धिवंतांचा जो उपहास होई तोही देशमुख व छगला यांना रुचण्यासारखा नव्हता. त्यामुळे म. गांधींच्या असहकारितेच्या युगासंबंधी या दोन आत्मचरित्रांत मौनच स्वीकारलेले आहे. अर्थात् महात्माजींच्या मोठेपणाची योग्य कल्पना दोघांनाही होती. राउंड टेबल कॉन्फरन्सच्या वेळी व पुढे मध्यप्रदेशात काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाले तेव्हा देशमुखांना गांधीजींना जवळून पाहण्याची संधी लाभली आणि त्याबाबत त्यांनी केलेल्या ओझरत्या उल्लेखातूनही आदराची भावना व्यक्त झाली आहे. १९४४ साली म. गांधी जुहू येथे होते त्या वेळी देशमुख मुद्दाम त्यांना भेटावयास गेले. या वेळी आपल्या मनात काय आले हे सांगण्याऐवजी जोआकिम अल्वा यांनी या भेटीबद्दल जे वृत्तपत्रांत लिहिले ते देशमुखांनी उद्‌धृत केले आहे. भावना संयमानेच व्यक्त करावी हा देशमुखांचा स्वभाव असला तरी या ठिकाणी या पत्रलेखकाच्या उताऱ्याद्वारा आपल्या भावनेचे जे अगदी ओझरते दिग्दर्शन त्यांनी केले आहे ते फार रुक्ष वाटते. याउलट १९४६ साली

संयुक्त राष्ट्रसंघात दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाच्या धोरणाविरुद्ध भारताची बाजू प्रभावीपणे मांडून परत आल्यावर छगला ज्या वेळी गांधीजींना भेटावयास गेले त्या वेळचा प्रसंग छोटा असला तरी त्यामधून छगलांची भावना हृद्यपणे प्रगट झालेली आहे. साबरमती-आश्रमात गांधीजी त्यांच्या नेहमीच्या वाडग्यातून जेवण घेत होते व नेहमीचाच पंचा ते नेसले होते. छगला लिहितात, 'माझ्या अंगावर अद्ययावत फॅशनचा सूट होता आणि इतक्या मोठ्या माणसाला मी अशा कपड्यात भेटावयाला आलो याची मला लाज वाटली.' छगला बूट काढू लागले तेव्हा महात्माजी त्यांना गुजराथीत म्हणाले, 'तसेच आत आलात तरी चालेल.' छगला लिहितात, 'मी ही सूचना मानली नाहीच व त्या वेळी जे किमान मला करणे शक्य होते ते करावे म्हणून अनवाणी महात्माजींच्या खोलीत गेलो.' गांधीजींनी छगलांच्या कामगिरीबद्दल जो आत्मीयता दाखविली त्याबद्दल वाटणारी धन्यता छगलांनी मोजक्या शब्दांत उत्कटपणे व्यक्त केली आहे.

### ते वचन भारताने पाळले असते तर....

म. गांधी व देशमुख या दोघांचा निकटचा संबंध येण्याची शक्यता नव्हती; परंतु एका अतिशय महत्त्वाच्या बाबतीत महात्माजींनी नैतिक भूमिका घेऊन जो आग्रह धरला त्याच आशयाचे मत तत्पूर्वी देशमुखांनी तज्ज्ञ अधिकारी म्हणून मांडले होते आणि दोघांचेही ते मत डावलले गेले, ही घटना देशमुखांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत रेखीवपणे सांगितली आहे. भारताची फाळणी झाली तेव्हा देशमुख केंद्रसरकारचे अर्थविषयक सल्लागार होते. फाळणीच्या वेळी जो करार झाला त्यानुसार भारताने पाकिस्तानला १५ ऑगस्ट १९४७ ला वीस कोट रुपये द्यावयाचे व मार्च १९४८ पर्यंत उरलेले पंचावन्न कोट रुपये द्यावयाचे असे ठरले होते. देशमुखांच्या मते हा करार योग्य होता. त्यानुसार वीस कोट रुपये दिले गेले; परंतु नंतर ज्या कटकटी सुरू झाल्या व काश्मीरवर पाकिस्तानने जो हल्ला केला त्यामुळे उरलेले पंचावन्न कोट रुपये अडवून ठेवण्याचे भारताच्या केंद्रसरकारने ठरविले. या संदर्भात देशमुख लिहितात, 'पाकिस्तान व भारत यांची एकच केंद्रीय बँक एप्रिल १९४८ पर्यंत असावी व तोपर्यंत एकच चलन (करन्सी) दोन देशांत असावे असे ठरले असताना कराराप्रमाणे रक्कम देण्याचे वचन भारताने पाळावयास हवे होते. पाकिस्तानची स्वतंत्र केंद्रीय बँक १ एप्रिलला होईपर्यंत रिझर्व बँकेने पाकिस्तानला काही सवलत द्यावयास हवी असा दृष्टिकोन, मला ज्या वेळी दिल्लीस सल्लामसलतीसाठी बोलावण्यात आले त्या वेळी सरकारसमोर मी मांडला; परंतु माझी सूचना फेटाळून लावण्यात आली. पुढे या प्रश्नावर पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री झाफरुल्लाखान यांनी तक्रार केली आणि त्यांनी शिवराळ शब्दांत आरोप केल्यामुळे या प्रश्नाला विकृत प्रसिद्धी मिळाली. म. गांधींनी या वेळी भारताने आपले वचन पाळावे असा आग्रह धरला व सरकारने तो न मानल्यामुळे उपवास सुरू केला. अखेर भारत सरकारने आपली भूमिका बदलली व पं. नेहरूंनी पंचावन्न कोट रुपये देण्याचे जाहीर केले. या सर्व घटनेबाबत देशमुख लिहितात, 'मला अद्यापही असे वाटते की (करार न पाळण्याच्या) आपल्या घोडचुकीमुळे हा दुर्दैवी तंटा उपस्थित झाला व वाढला. त्यामुळेच गांधीजींच्या विरुद्ध आत्यंतिक जातीय प्रवृत्ती तीव्रतेने उफाळून आल्या. आपल्या सरकारने वेगळी भूमिका घेतली असती तर म. गांधींचा खून टळला असता की काय ही इतिहासातील एक मोजमाप न करता येण्यासारखी (Inponderable) घटना आहे.'

देशमुखांच्या आत्मचरित्रातील हा भाग वाचताना माझे मन सुन्न झाले आणि म. गांधींच्या अगदी जवळ असणाऱ्या श्रेष्ठ व्यक्तींच्या एका निर्णयामुळे गांधींचा मृत्यू समीप आला या देशमुखांच्या सूचक पण स्पष्ट अभिप्रायामुळे माझे मन प्रक्षुब्ध झाले. सुप्रसिद्ध इतिहासकार टॉइन्बी याने एका ठिकाणी इतिहासातील अंधारात असलेल्या आतील घटनांचा (Shadowy interiors of history) उल्लेख केलेला आहे, त्यापैकीच ही घटना आहे. सुपरिचितामागील अपरिचित म्हणतात ते हेच आणि असे सत्यकथन अप्रिय वाटले तरी त्यामुळेच राजकीय आत्मचरित्रांना महत्त्व प्राप्त होते.

१९४७ पासून पंडित नेहरूंचे युग सुरू झाले. स्वातंत्र्योत्तर कालात ज्या जबाबदाऱ्या नव्याने पार पाडावयाच्या होत्या त्यासाठी देशातील बुद्धिमान व कर्तबगार माणसे एकत्र आणणे, त्यांच्या प्रवृत्तींनुसार त्यांच्यावर कामे सोपविणे हे करणे आवश्यक होते. स्वाभाविकपणे स्वातंत्र्यसंग्रामाच्या कालखंडात बाजूला असलेल्या परंतु आपली बुद्धिमत्ता व कर्तबगारी देशहिताच्या कारणी लावावयास उत्सुक असलेल्या देशमुख व छगला यांच्यासारख्या व्यक्तींना महत्त्व प्राप्त झाले. पंडितजींनी त्यांच्याकडून सहकार्याची अपेक्षा केली आणि त्यांनीही पंडितजींना साथ दिली. देशमुखांनी प्रथम जागतिक बँक व फंड यांच्या एक्झिक्युटिव्ह बोर्डावर भारताचे प्रतिनिधी म्हणून काम केले. पुढे त्यांनी अर्थमंत्रीपद स्वीकारले व नंतर मतभेद झाल्यामुळे त्यांनी त्या पदाचा राजिनामा दिला. तरी बाजूला न होता विद्यापीठ अनुदानमंडळ, दिल्ली विद्यापीठ, इंडिया इंटरनॅशनल सेंटर, नॅशनल बुक ट्रस्ट आदि महत्त्वाच्या ठिकाणी त्यांनी प्रमुख म्हणून जबाबदाऱ्या स्वीकारल्या व पार पाडल्या. छगला सुरुवातीस मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश झाले. हे काम करतानाच ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले. नंतर आंतरराष्ट्रीय डिप्लोमसीच्या क्षेत्रात अमेरिका व इंग्लंडमध्ये त्यांनी भारताचे राजदूत म्हणून कामगिरी बजावली आणि शेवटी त्यांनी मंत्रिमंडळात प्रवेश करून शिक्षणमंत्रीपद स्वीकारले. या विविध जबाबदाऱ्या पार पाडताना आलेले अनुभव देशमुख व छगला यांनी निर्भीडपणे कथन केले आहेत. त्या सर्वांचा विस्ताराने परामर्श घेणे शक्य नाही. म्हणून काही ठळक गोष्टींचाच उल्लेख मी करणार आहे. पंडित नेहरूंशी देशमुख व छगला यांचा आलेला संबंध, पंडितजींच्या स्वभावाबद्दल आणि त्यांच्या वेगवेगळ्या निर्णयांबद्दल या दोघांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया यांमधून त्या दोघांच्या व पं. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वावरही प्रकाश पडतो. एक गोष्ट खरी की, पंडितजी पंतप्रधान असल्यामुळे अखेरचा निर्णय तेच घेऊ शकत होते; पण त्यांच्या अधिकाराचा योग्य मान राखताना देशमुख व छगला दोघांनीही स्वाभिमानाला कधी मुरड घातली नाही, कधी तोंडपुजेपणा केला नाही. स्वतःची मते निर्भयपणे मांडली आणि निर्णय झाल्यावर मात्र त्याची अंमलबजावणी निष्ठेने केली. ज्या वेळी मूलभूत स्वरूपाचे मतभेद झाले त्या वेळी देशमुखांनी मंत्रिपदाचा त्याग केला आणि छगलाही पुढे तात्त्विक मतभेदाच्या

मुद्द्यावर इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळातून बाहेर पडले. देशमुखांनी 'Cabint at work' या प्रकरणात पंडित नेहरूंच्याबद्दल पुढील उद्‌गार काढले आहेत. 'मंत्रिमंडळाचे प्रमुख म्हणून पंडित नेहरू सौम्यपणे, दुसऱ्याला जाणून घेऊन व लोकशाही पद्धतीने वागत. ते आपल्या सहकाऱ्यांवर आपला निर्णय कधीच लादत नसत...मी मंत्रिमंडळात होतो तेव्हा मंत्रिमंडळातील निर्णय घेताना कधी मते घेतली जात नसत. चर्चेनंतर सर्वसंमत (by Consensus) निर्णय होई.'

देशमुखांनी १९५३ च्या मार्च महिन्यात पं. नेहरू व ते यांच्यामध्ये जो मतभेद झाला होता त्याचे वर्णन 'चहाच्या पेल्यातील वादळ,' असे केलेले आहे. देशमुख हे ऑस्ट्रेलियात असताना पंडित नेहरूंनी असा निर्णय घेतला की, 'ऑडिटर जनरलने बजेटिंग सिस्टिम व फायनान्शिअल कंट्रोल' यांचे परीक्षण करून त्यावरील अभिप्राय पंतप्रधानांना सादर करावा. देशमुखांना हे कळल्यावर त्यांनी या पद्धतीस जोरदार हरकत घेतली व अर्थमंत्रालयाची टिपणीच मंत्रिमंडळासमोर गेली पाहिजे असा आग्रह धरला. पं. नेहरूंनी हा मुद्दा सामान्यपणे मान्य केला; परंतु दरम्यान या प्रश्नावर वादावादी होऊन देशमुखांनी राजिनामा द्यावयाचे ठरविले. त्या वेळी पंडितजी म्हणाले, 'पण पंतप्रधान हाच शेवटी प्रमुख (Boss) आहे.' त्यावर देशमुख शांतपणे उत्तरले, 'हे खरे आहे; पण मंत्र्यालाही स्वतःच्या पद्धतीने (on his own terms) काम करावयाचे किंवा राजीनामा द्यावयाचा हे स्वातंत्र्य नेहमी असतेच.' पंडित नेहरूंनी समझोत्याचे धोरण स्वीकारल्याने हे वादळ शमले. आजच्या संदर्भात देशमुखांचा बाणेदारपणा व पंडितजींची उदारमनस्का यांचे महत्त्व विशेष जाणवते.

भाषावार प्रांतरचनेबाबत देशमुख हे फारसे उत्साही नव्हते. मुंबई हा महाराष्ट्राचाच भाग आहे असे त्यांचे मत होते; परंतु केन्द्रिय मंत्रिमंडळाने महाराष्ट्र, गुजराथ व मुंबई अशी तीन राज्ये करण्याचा निर्णय घेतला व देशमुखांनी विदर्भाच्या नेत्यांचे महाराष्ट्रात सामील होण्याबाबत मन वळविले. यानंतर आठदहा दिवसांनी पं. नेहरूंनी 'मुंबई शहर केन्द्रशासित होईल अशी घोषणा केली. देशमुखांना ही गोष्ट मुळीच मान्य नव्हती व कुलाबा जिल्ह्यातील जनतेचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी राजीनामा देण्याचे ठरविले. प्रथम याला संमती देणाऱ्या देवगिरीकर व हिरे यांनी आयत्या वेळी कसा अवसानघात केला हे देशमुखांनी योग्य अशा कठोर शब्दांत सांगितले आहे. नंतर मुंबईत मोरारजीभाईंनी अमानुष गोळीबार कसा केला आणि त्यानंतर देशमुखांनी राजिनामा देताना सात्त्विक संतापाने भरलेले भाषण कसे केले आणि अखेर फिरोज गांधी व अशोक मेहता यांनी मूळ विधेयकास सुचविलेल्या दुरुस्त्यानुसार महाराष्ट्र-गुजरात हे विशाल द्विभाषिक राज्य कसे आले या सर्व घटनांचे वर्णन आहे. वस्तुतः देशमुखांच्या राजकीय जीवनातील हा मोठा समरप्रसंग होता. त्या वेळी त्यांनी स्वतःची तत्त्वनिष्ठ भूमिका कायम ठेवून मंत्रिमंडळाचा राजिनामा दिला; पण हा सर्व प्रसंग त्यांनी अत्यंत अलिप्तपणे सांगितला आहे. त्या वेळी महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा एक उदात्त आविष्कार म्हणून या राजिनाम्याचे सर्व मराठी जनतेने किती उत्स्फूर्त स्वागत केले होते याची आठवण ज्यांना असेल त्यांना देशमुखांच्या या संयमपूर्ण आत्मविलोपी (self effacing) लेखनाचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही.

## एक आश्चर्य

एका गोष्टीबद्दल देशमुखांच्या अनेक मित्रांना आश्चर्य वाटले ते हे की त्यांना द्विभाषिक मान्य असल्यामुळे पंतप्रधानांच्यातील व त्यांच्यातील मतभेदाचा मुद्दा संपला होता. असे असताना त्यांना परत मंत्रिमंडळात का बोलावण्यात आले नाही ? मुंबईतील एका संशोधक लेखकाने देशमुखांना असे सांगितले की, विशाल द्विभाषिक हेच काँग्रेस पक्षाला व नेत्यांना प्रथमपासून हवे होते. यावर देशमुख लिहितात. 'हे त्यांचे म्हणणे मान्य केले तर माझा राजीनामा मिळेपर्यंत त्यांनी नाटक केले असे म्हणावे लागेल. हा माझ्या मित्रांनी लाविलेला अन्वयार्थ मला मुळीच मान्य नाही. कारण पंडित नेहरूंच्याकडून अशी निंद्य कारवाई किंवा दुटप्पीपणा घडणे शक्य नाही असे माझे स्पष्ट मत आहे.' या देशमुखांच्या उद्‌गारातही त्यांची न्यायबुद्धी व पंडित नेहरूंच्याबद्दलचा त्यांच्या मनातील योग्य आदर यांचे सुंदर प्रतिबिंब उमटलेले आहे.

देशमुखांनी आपली साठ वर्षे कोणत्या दिवशी पूर्ण होणार याबद्दल कोणाला कळविले नव्हते; परंतु त्या दिवशी पं. नेहरू अचानक आले आणि म्हणाले, 'देशमुख, आज तुमचा साठावा वाढदिवस आहे हे मला का सांगितले नाहीत ? ...मी शुभेच्छा देण्यास आलो आहे.' या अकृत्रिम स्नेहभावनेमुळे देशमुखांचे मन भरून आले. 'पंडित नेहरूंची ती भेट आणि सौम्य स्मिताने उजळलेला त्यांचा चेहरा' याचा उल्लेख करून देशमुख म्हणतात, 'I wish circumstances had permitted of our cultivating a close friendship' (आम्हा दोघात अधिक निकटचा स्नेह निर्माण व्हावा अशी परिस्थिती असती तर किती बरे झाले असते !)

पंडित नेहरू व छगला दोघांवरही ब्रिटिश उदारमतवादी परंपरेचा परिणाम झालेला, दोघेही सेक्युलॅरिझमचे कट्टे पुरस्कर्ते, दोघांचाही इहवादी व विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन– या सर्व गोष्टींमुळे स्वाभाविकपणेच छगलांना पंडित नेहरूंबद्दल सतत आदर व स्नेह वाटे आणि पंडित नेहरूही त्यांना मित्र मानत. छगलांची बुद्धिमत्ता, कायद्याचे सूक्ष्म ज्ञान, राजनीतिनिपुणता या आणि अन्य गुणांना पंडित नेहरूंनी स्वातंत्र्योत्तर कालात भरपूर वाव दिला आणि छगलांनीही पंडितजींनी सोपविलेल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना आपल्या अंगच्या गुणांचा, व्यासंगाचा आणि प्रयत्नशीलतेचा पुरेपूर उपयोग केला. असे असूनही त्यांच्यामध्ये दुरावा निर्माण व्हावा असे काही प्रसंग आलेच. मुंदडा-प्रकरणाच्या वेळी या चौकशीस जादा प्रसिद्धी मिळेल अशा रीतीने छगलांनी कामकाज चालविले असे पंडितजींचे मत झाले व त्यांनी आपल्या मनातील संतोष व्यक्तही केला. त्या बाबतीत छगलांनी स्पष्टीकरणाचे पत्र पाठविल्यावर पंडित नेहरूंनी त्यांना उत्तरात 'तुम्ही मला लिहिलेत ते बरे झाले. माझे मुंबईतील विधान लोकांच्या वागणुकीविरुद्ध होते.' असे लिहून प्रकरणावर पडदा टाकला.

या एकूण प्रकरणाबद्दल लिहिताना छगलांनी, पंडित नेहरूंच्या मनात त्या वेळचे अर्थमंत्री टी. टी. कृष्णमाचारी यांच्याबद्दल किती आपुलकी होती व या चवकशीच्या अहवालात छगलांनी ज्या तऱ्हेचे

ताशेरे (Strictures) कृष्णमाचारींवर झाडले होते ते पंडितजींना पसंत नव्हते, हे स्पष्टपणे लिहिले आहे. याबद्दल छगला लिहितात, 'मला या सर्व गोष्टींबद्दल काळजी वाटली नाही. मी माझे काम सदसद्विवेकबुद्धीला स्मरून केले होते आणि त्यानुसार मी माझ्या निर्णयाप्रत आलो होतो. तो निर्णय पंतप्रधानांना किंवा अन्य कोणाला आवडेल किंवा नाही याचा काही संबंध नव्हता.' या शब्दांनुसार हे स्पष्ट होते की, पं. नेहरूंच्याबद्दल छगलांच्या मनात आदर असला तरी न्यायाधीश म्हणून कर्तव्य पार पाडताना निःस्पृह राहणे हे त्यांना परमपवित्र कर्तव्य वाटत होते. छगलांच्या या स्वतंत्र वृत्तीचे महत्त्व वाटत असल्यामुळेच या मतभेदांच्या प्रसंगानंतर काही दिवसांनी पंडित नेहरूंनी १९५८ साली छगलांची अमेरिकेत भारताचे राजदूत म्हणून नेमणूक केली.

आत्मचरित्राच्या सोळाव्या प्रकरणात छगलांनी पंडित नेहरू पंतप्रधान म्हणून कसे वागत याचे विस्तृत वर्णन करून पंडितजींचे औदार्य, मनाचा मोठेपणा आणि विशाल दृष्टिकोन यांचा त्यांच्या मनावर झालेला परिणाम अतिशय जिव्हाळ्याने व्यक्त केला आहे. त्यांची काही वाक्ये उद्धृत करण्याचा मला मोह आवरत नाही : 'पंडित नेहरू हे एक श्रेष्ठ मानवतावादी होते आणि त्यांचा मानवतावाद पुरोगामी (radical) होता...कर्मकांडाचा त्यांना तिटकारा वाटे. ते खरे लोकशाहीवादी होते...त्यांना चटकन राग येई आणि हेही खरे की, कित्येकदा टीकेचा त्यांना संताप येत असे...मी ज्या वेळी त्यांच्या विचारापेक्षा वेगळा विचार मांडत असे त्या वेळी त्यांच्या स्वभावानुसार ते एकदम 'What do you mean ?' (याचा अर्थ काय ?) म्हणून मला गप्प करू पहात; पण मी निर्धाराने भूमिका मांडली की ते ऐकू लागत आणि निर्णय करतेवेळी माझे म्हणणे विचारात घेत.'

वैयक्तिकरीत्या नेहरूंच्या स्नेहाचा व आतिथ्याचा जो सुखद अनुभव आला त्याच्या छगलांनी केलेल्या वर्णनातून दोघांतील स्नेहबंधनाची कल्पना येते.

१९६४ साली छगला सिक्युरिटी कौन्सिलच्या बैठकीहून परत आले त्या दिवशी ते पं. नेहरूंना भेटले नाहीत. पंडितजी डेहराडूनहून विश्रांती घेऊन परत आल्यावर त्यांना भेटायचे असे त्यांनी ठरविले आणि दुर्दैवाने पंडितजींचे दुसऱ्याच दिवशी निधन झाले. यासंबंधी छगला लिहितात, 'न्यूयॉर्कहून आल्यावर ताबडतोब मी पंडितजींना भेटायला गेलो नाही याबद्दल मी स्वतःला कधी क्षमा करू शकणार नाही.' या एका वाक्यातून त्यांच्या मनाच्या वेदनेचा प्रत्यय येतो.

## दोघांची निवेदनशैली

देशमुख व छगला या दोघांनी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताचे प्रतिनिधी म्हणून महत्त्वाची कामगिरी केली आहे; पण यासंबंधी दोघांच्या निवेदनशैलीत दोन ध्रुवांचे अंतर आहे. देशमुख हे आपले काम काय होते हे सांगून ज्या व्यक्ती त्यांना भेटल्या त्यांच्याबद्दल, "ते फार बुद्धिमान गृहस्थ होते', 'त्यांचा स्वभाव मनमिळाऊ होता', अशी त्रोटक विधाने करतात. देशमुखांची कामगिरी आर्थिक क्षेत्रातील असल्यामुळे त्याबाबतचा फार तांत्रिक तपशील देण्यात हशील नाही असे त्यांना वाटत असावे. छगलांची कामगिरी राजनैतिक स्वरूपाची असल्यामुळे सामान्य वाचकाला रस वाटेल अशा अनेक गोष्टी त्यांनी आकर्षक शैलीत सांगितल्या आहेत. अमेरिकेतील राजकीय मतप्रवाह, भारताबद्दलचे गैरसमज, ते दूर करण्यासाठी छगलांनी केलेले प्रयत्न, त्यांना भेटलेल्या व्यक्ती व वल्ली यांमुळे 'डिप्लोमसी युनायटेड स्टेटस्' हे प्रकरण अतिशय बहारीचे झाले आहे. छगला इंग्लंडमध्ये राजदूत असताना राष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या इंग्लंडभेटीच्या वेळी त्यांच्या (राधाकृष्णन यांच्या) अनौपचारिक स्वभावाचे छगलांनी सांगितलेले किस्से मोठे खुमासदार आहेत. भारताचे राष्ट्रपती औपचारिक संकेत बाजूला सारून आपल्या पुस्तकाच्या प्रकाशकाकडे जातात व आपली पुस्तके कशी खपतात याची चवकशी करतात, हा प्रसंग मोठ्या गंमतीशीरपणे छगलांनी सांगितला आहे. छगला आयर्लंडमध्ये गेले असता प्रेसिडेंट डी व्हॅलेरा यांची जी भेट झाली आणि ब्रेंडन बेहेन या नाटककाराच्या ब्रिटिशविरोधी रागाचा जो उद्रेक त्यांना पहावयास मिळाला त्याचे वेचक शब्दांतील चित्रणही मनोरम आहे. त्यामानाने फिडेल कॅस्ट्रो व चे गिव्हेरा यांची शब्दचित्रे फिकी आहेत.

छगला व देशमुख या दोघांचेही कृष्णमेनन यांच्याशी फारसे पटले नाही. छगलांनी मेनन यांच्या उद्धट वागण्यावर कठोर टीका केली आहे. याउलट देशमुखांनी एकच वाक्य लिहिले आहे पण ते अगदी मर्मभेदक आहे. कृष्णमेनन यांचे व आपले संबंध कसे होते हे सांगताना देशमुख लिहितात, 'Our relations have always been of uneasily peaceful existence' ...डॉ. आंबेडकर यांच्याबद्दल लिहिताना छगला यांनी त्यांच्या भेदक बुद्धिमत्तेचा आदराने उल्लेख केला असून अस्पृश्यांच्या झालेल्या अमानुष छळाचा त्यांच्या मनावर कसा परिणाम झाला हे थोडक्यात सांगितले आहे. देशमुखांनी मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी म्हणून आंबेडकरांच्यावर लिहिलेला परिच्छेद अतिशय मार्मिक आहे. त्यांतील वाक्य पुढीलप्रमाणे : 'आंबेडकरांच्या कठोर बाह्य स्वरूपामागे त्यांचे सौहार्द आणि इतरांना समजून घेण्याची वृत्ती दडलेली होती.'

छगला यांनी लालबहादुर शास्त्री यांचे पंतप्रधान म्हणून रेखाटलेले व्यक्तिचित्र अत्यंत वास्तव आणि सहृदयतापूर्ण आहे. पंतप्रधान इंदिरा गांधींच्याबद्दलचे त्यांचे विश्लेषणही उद्बोधक आहे. इंदिरा गांधी सत्तेचे राजकारण अत्यंत कुशलतेने व तितक्याच कठोरतेने खेळतात हे सांगून इंदिराजींच्या राजकारणाचा म. गांधींनी प्रतिपादलेल्या राजकीय मूल्याशी सुतराम संबंध नाही असा त्यांनी स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला आहे.

देशमुख व छगला यांच्या सार्वजनिक जीवनाचे जे चित्र त्यांच्या आत्मचरित्रांतून उमटले आहे त्यावरून देशमुख आर्थिक व शिक्षणक्षेत्रातील कार्यात आणि छगला कायद्याच्या शिक्षणक्षेत्रातील कार्यात खरे रंगून गेले होते, हे प्रत्ययास येते. या क्षेत्रातील त्यांच्या भूमिकेचे थोडे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

छगलांनी कायद्याबद्दल जे लिहिले आहे त्यावरून कायद्यावर त्यांची किती गाढ निष्ठा आहे हे कळून येते. कायद्याबद्दल ते लिहितात, 'कायद्यामुळे मनाला फार चांगले वळण लागते. नेमका, रेखीव आणि सुस्पष्ट विचार कसा करावा ते कायदाच शिकवितो. प्रत्येक शब्दाला अर्थाची निश्चित छटा असते आणि त्या संदर्भात तो शब्द अगदी योग्य जागी यावा लागतो. कायद्याचे सुसंस्कार

झालेले मन शब्दजंजाळात कधी गुंतून पडत नाही. असे मन तर्कशुद्ध विचार करते आणि स्वतःच्या मानसिक प्रक्रियेतून जे निष्कर्ष निघतील त्यांना निर्भयपणे तोंड देते.' न्यायपद्धतीबद्दल बोलताना ते म्हणतात, 'सत्याला अनेक पैलू असतात. सत्यामध्ये अनेक विसंगतीही आणि परस्परविरोधी गोष्टीही असतात. कायद्यामध्ये वाकबगार असलेल्या दोन मनांनी सत्याच्या सर्व बाजू न्यायासनासमोर मांडल्यावर तिसऱ्या तज्ज्ञ मनाने निर्णयाप्रत यावे–या रीतीने होणारा निर्णय हा अंतिम सत्याच्या जास्तीत जास्त जवळचा असतो आणि या मार्गानेच कायद्यानुसार न्याय मिळतो.'

वकिलाने फापट पसाऱ्यात गुंतून न राहता मुख्य मुद्द्याला हात घालावा हे सांगून छगला म्हणतात, 'वकिलाने अंगी बाणवावयाचा सर्वांत महत्त्वाचा गुण म्हणजे बौद्धिक प्रामाणिकपणा.' कायदा व स्वातंत्र्य नेहमी हातात हात घालून चालतात असे विधान केल्यावर छगला म्हणतात, 'कायदा व कायदेपंडित यांनी स्वातंत्र्य प्रस्थापित व्हावे आणि त्याच्या कक्षा वाढाव्यात यासाठी मोठी कामगिरी बजावली आहे.'

या अवतरणांवरून हे स्पष्ट होईल की, वकील व न्यायाधीश म्हणून काम करताना छगलांनी सत्यशोधनाचे प्रभावी साधन म्हणून कायद्यावर श्रद्धा ठेवली, या श्रद्धेबद्दल आदर बाळगूनही मला एक गोष्ट मांडावीशी वाटते ती ही की, प्रस्थापित समाजाचा व हितसंबंधाच्या चौकटीतच छगला यांनी कायद्याचा विचार केला आहे. आजच्या समाजात खाजगी मालमत्ता राखणे हा कायद्यानुसार पवित्र अधिकार मानला जातो. या अधिकारानुसार उत्पादनाच्या साधनांची मालकी मूठभर लोकांच्या हातात असली आणि त्यांनी बाकीच्या समाजाचे व विशेषतः श्रमजीवी वर्गाचे आर्थिक शोषण केले तरी छगला म्हणतात की, कायद्यानुसार त्याला ते करण्याचा अधिकार आहे. छगला कायद्याचा विचार करताना कायदेपंडिताच्या मानसिक प्रक्रियांचा विचार करतात; परंतु जेथे कायदा अपुरा पडतो त्या सामाजिक वा आर्थिक प्रक्रियांचा विचार ते करीत नाहीत. या त्यांच्या विचारांच्या मर्यादेमुळेच म. गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळीला जे नैतिक अधिष्ठान होते ते त्यांना मानवले नाही. यामुळेच पार्लमेंटबद्दल लिहिताना, बॅ. नाथ पै यांनी जी घटनादुरुस्ती सुचविली होती तिचा परामर्ष घेणे त्यांना महत्त्वाचे वाटत नाही. कायदा व स्वातंत्र्य हे शब्दप्रयोग करताना व्यक्तिस्वातंत्र्य हे छगलांना अभिप्रेत असले तरी भांडवलशाही समाजाच्या चौकटीत कायद्याचे पालन करीत गरीबवर्गाच्या स्वातंत्र्याचा कसा संकोच होतो हे ते विचारात घेत नाहीत. त्यांच्यासारख्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेच्या पंडिताने कायदा व समाजपरिवर्तन या संदर्भात मूलगामी विवेचन करण्याऐवजी विषमतेवर आधारलेल्या समाजाच्या संदर्भात कायद्याचे गोडवे गावेत याबद्दल मला सखेदाश्चर्य वाटले. ज्या लो. टिळकांच्याबद्दल छगलांना नितांत आदर आहे त्या लोकमान्य टिळकांनी 'कायदा व नीती (ethics) यांची फारकत झाली तर कायदा मोडून नीतीचे पालन केले पाहिजे व त्यासाठी होणारे शासन निर्भयपणे स्वीकारले पाहिजे,' ही भूमिका मांडली होती; परंतु लो. टिळकांच्या १९०८ च्या खटल्याच्या वेळचे अमर उद्गार खोदलेली शिला (टॅबलेट्) बसविताना धन्यता वाटणाऱ्या बॅ. छगलांनी त्या उद्गारातून कायद्याबाबतचा जो दृष्टिकोन प्रगट झाला आहे तो दृष्टिकोन स्वीकारलेला नाही. व्हिक्टोरिअन उदारमतवादाचा जो पगडा छगला यांच्या मनावर ऑक्सफर्डला विद्यार्थिदशेत बसला त्यामुळे आर्थिक, सामाजिक व राजकीय क्रांतीच्या संदर्भात कायद्याचा विचार करण्याच्या मार्गाकडे ते कधी वळले नाहीत.

## आर्थिक धोरणाची बैठक

चिंतामणराव देशमुख यांनी अर्थमंत्री म्हणून जे पहिले भाषण केले त्या भाषणाच्या शेवटी त्यांनी शासनाच्या आर्थिक धोरणाची आठ सूत्रे सांगितली, ती त्यांनी आपल्या आत्मचरित्राच्या १७४ पानावर उद्धृत केली आहेत. त्याचप्रमाणे Economic Developments in India : A Personal Retrospect या पुस्तकामधील Epilogue मधील जो भाग त्यांनी सेंट्रल बॅंकिंग फॉर ए न्यू नेशन या प्रकरणाच्या सुरुवातीस दिला आहे त्यावरून त्यांचा नियोजनविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. ते म्हणतात, 'एखाद्या पुढाऱ्याने जनतेला भारून टाकले आणि हुकुमशाही पद्धतीची राजवट असली तर एखाद्या राष्ट्राला नेत्रदीपक प्रगती काही काळ करता आली तरी एका पिढीच्या पलीकडे हा प्रयोग चालणे शक्य नाही. भीतीतून अगर अतिउत्साहातून निर्माण झालेल्या तीव्र तणावाचे वातावरण पद्धतशीर आणि टिकाऊ पद्धतीच्या विकासाला अनुकूल नसते.' ते पुढे म्हणतात, 'नियोजन करणाऱ्यांनी मानवी स्वभावातील प्रमादशीलतेबरोबरच आर्थिक जीवनातील अनिश्चततेचाही विचार केला पाहिजे. उपलब्ध असलेली साधनसंपत्ती आणि प्रामाणिकपणे केलेला कारभार याबाबतचे अचूक गणित मांडले तरी अपेक्षित परिणाम साध्य होणार नाही किंवा कदाचित अत्यंत निराशा वाटावी इतकेच साध्य होईल....नियोजनकाराला केव्हा केव्हा एकाच वेळी सारख्याच महत्त्वाच्या व तातडीने करणे आवश्यक असलेल्या उद्दिष्टांपैकी एकच उद्दिष्ट निवडावे लागेल. संक्रमणाच्या काळात असे संघर्ष तीव्र होणे अपरिहार्य आहे...क्षणिक दृष्टिक्षेपात जे भयावह वाटेल ते राष्ट्राच्या इतिहासाच्या संदर्भात तितके काळेकुट्ट भासणार नाही.' आपल्या लोकांचे दीर्घकाल सहकार्य मिळविण्यासाठी लोकांना झेपेल असाच कार्यक्रम घ्यावा असा आग्रह धरताना देशमुख म्हणतात, की आपण नवजीवन घडवीत आहोत असा आवेश अगर क्रूस खांद्यावर घेतल्याचा अभिनिवेश यापेक्षा वास्तववादी दृष्टिकोन ठेवून, विकास हा इतिहासाच्या प्रवाहातील एक टप्पा आहे याचे भान ठेवले पाहिजे.

देशमुखांचा पुरोगामी दृष्टिकोनातून नियोजन करण्यास विरोध नाही; परंतु वास्तवतेचे भान ठेवून आपल्या समाजाला झेपेल इतक्याच वेगाने केलेली प्रगती टिकाऊ होऊ शकेल असे त्यांचे मत आहे. प्रश्न असा आहे की, दीर्घकाल विषम वागणूक मिळून जे गरीब, अर्धपोटी राहिले, त्यांच्या आकांक्षांची तृप्ती या 'सावकाश' वादाने (gradualism) होऊ शकेल का? शिवाय नियोजनाच्या सुरुवातीच्या अवस्थेत जर मूलभूत बदलांना सुरुवात केली नाही तर विकासाच्या प्रक्रियेत जे प्रथम सधन बनतात आणि आर्थिक व राजकीय सत्ताकेंद्रे काबीज करतात त्यांचे अधिराज्य समाजावर दीर्घकाल चालू राहते आणि देशमुखांच्या भूमिकेतून ही प्रक्रिया थांबू शकणार नाही. समाजपरिवर्तनात सामान्यांचा महत्त्वाचा भाग असू शकतो हे तज्ज्ञ म्हणुन नियोजनाकडे पाहणाऱ्या देशमुखांना

मान्य आहे असे या आत्मचरित्रात प्रगट झालेले नाही. या बाबतीत धनंजयराव गाडगीळ यांची भूमिका याहून वेगळी व अधिक पुरोगामी होती.

देशमुखांनी अर्थमंत्री म्हणून केलेल्या पहिल्या भाषणातील आठ सूत्रांपैकी एक सूत्र 'ग्रामीण भागातील बेकारी कमी करण्यासाठी शक्य असेल तितकी (as far as possible) मदत करणे' हे आहे. म्हणजे ज्या समाजरचनेमुळे बेकारी निर्माण झाली ती बदलून जमिनीचे फेरवाटप करून ग्रामीण भागात नवा पराक्रम जागृत करणे हा कणखर पुरोगामी कार्यक्रम मांडण्याऐवजी बेकारीचे दुःख अंशतः हलके करणे इतकीच जबाबदारी ते घेतात. देशमुखांच्या आर्थिक धोरणातील ही मर्यादा लक्षात ठेवली पाहिजे. एक गोष्ट खरी की, देशमुखांनी आखून दिलेल्या धोरणाचेही नंतर पालन करण्यात आले नाही. मर्यादित चलनवाढीचे त्यांचे धोरण बाजूस सारून ते अर्थमंत्री म्हणून बाजूला झाल्यावर पहिल्याच वर्षात चारशे कोटींची चलनवाढ करण्यात आली; परंतु केंद्रसरकारच्या गेल्या सतरा वर्षांतील दिवाळखोर धोरणापेक्षा देशमुखांनी आखलेले आर्थिक धोरण अधिक वास्तव असले तरी आर्थिक समता व सामाजिक न्याय यांच्या संदर्भात ते अपुरेच पडते.

या संदर्भात आणखी दोन गोष्टी देशमुखांच्या भूमिकेवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. आयुर्विमा-व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण ही देशमुखांनी केलेली अतिशय महत्त्वाची पुरोगामी कामगिरी आहे; पण या राष्ट्रीयीकरणाच्या मागच्या भूमिकेचे स्पष्टीकरण करण्याऐवजी देशमुख हा राष्ट्रीयीकरणाचा महत्त्वाचा निर्णय आपण शेवटपर्यंत गुप्त राखू शकलो याचाच अभिमानाने उल्लेख करतात. ही गुप्तता महत्त्वाची असली तरी तिचे महत्त्व केवळ प्रशासकीय (Administrative) आहे. यामुळे आयुर्विम्याचे राष्ट्रीयीकरण हे देशमुखांच्या दृष्टीने प्रशासकीय पाऊल होते अशी अज्ञ वाचकांची गैरसमजूत होण्याची भीती आहे.

दुसरा एक प्रसंग १९५४ साली घडला. लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनात 'आर्थिक धोरणा'वर चर्चा चालू असताना भागवत झा आझाद या काँग्रेसच्या खासदाराने 'भारतात समाजवादी पद्धती (pattern) ची अर्थरचना असावी' अशी दुरुस्ती सुचविली. तेव्हा पं. नेहरू देशमुखांकडे वळून म्हणाले, 'ही दुरुस्ती स्वीकारण्यास तुमची काही हरकत आहे का?' यावर देशमुख लिहितात, 'अशा पद्धतीत बसेल अशा दोन महत्त्वाच्या उपाययोजना (measures) सुरू करून मी प्रत्यक्षात आणल्या असल्यामुळे माझी काही हरकत नाही असे उत्तर त्यांनी दिले आणि उपसूचना स्वीकारण्याचा अधिकार मला देण्यात आला.'

यावरून हे स्पष्ट होते की, समाजवादाला देशमुखांची हरकत नाही, समाजवाद या शब्दाचा ते विटाळ मानत नाहीत; परंतु याच्यापलीकडे जाऊन केवळ एक-दोन उपाययोजनांपाशी न थांबता समाजवादाची सुस्पष्ट आकृती देशासमोर मांडली पाहिजे असे त्यांना वाटत नाही.

## शिक्षणक्षेत्रातील कार्य महत्त्वपूर्ण

राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती सर्वसाधारणपणे शिक्षणक्षेत्रापासून दूर असतात; परंतु देशमुख व छगला या दोघांचेही विद्येवर जे प्रेम आहे आणि आपल्या समाजाला भावी काळात लाभणारे नेतृत्व हे ज्ञानसंपन्न असले पाहिजे अशी जी त्यांच्या मनाची ओढ आहे त्यामुळे या दोन थोर व्यक्तींनी शिक्षणक्षेत्रात महत्त्वाची कामगिरी करून दाखविली आहे. देशमुख हे विद्यापीठ अनुदान-मंडळाचे अध्यक्ष असताना पदव्युत्तर शिक्षणाचा दर्जा सुधारावा आणि विद्यापीठातील व महाविद्यालयातील अध्यापकांना सुधारित वेतनश्रेणी मिळावी यासाठी निर्धाराने पावले टाकली. या कामाबद्दल लिहिताना देशमुखांच्या मनातील साफल्याची भावना व्यक्त झाली आहे.

छगला हे शिक्षणमंत्री असताना डॉ. कोठारींच्या अध्यक्षतेखाली त्यांनी शिक्षणविषयक कमिशन नेमले आणि या कमिशनने भारतातील शिक्षणक्षेत्राला योग्य वळण लागावे यासाठी मौलिक सूचना केल्या. आपल्या कारकीर्दीत हे घडले याबद्दल छगलांना वाटणारा अभिमान, त्यांनी मनमोकळेपणाने व्यक्त केला आहे. अलिगड विद्यापीठाच्या स्वरूपात बदल व्हावा यासाठी शिक्षणमंत्री असताना छगला यांनी जे प्रयत्न केले त्याबद्दल मोठेच वादळ उठले; परंतु छगला यांनी प्रागतिक दृष्टिकोन अत्यंत निर्भयपणे मांडला. अलिगड विद्यापीठ हे इस्लामी संस्कृतीचे प्रतीक आहे हे म्हणणे मान्य करताना छगलांनी हे स्पष्ट केले की, धर्मातीत (सेक्युलर) भारताच्या संदर्भातच या गोष्टीचा विचार केला पाहिजे. अलिगड विद्यापीठ ही धार्मिक संस्था नसून राष्ट्रीय महत्त्वाची शैक्षणिक संस्था आहे ही भूमिका छगलांनी खंबीरपणे घेतल्यामुळे भारतातील प्रतिगामी मुसलमानांचा त्यांच्यावर मोठा रोष झाला. छगलांनी कुलगुरू म्हणून नियुक्त केलेल्या अलियावर जंग यांच्यावर खुनी हल्ला झाला आणि ते त्या हल्ल्यात जबर जखमी झाले. छगला यांनाही अनेक धमक्या देण्यात आल्या; परंतु त्यांनी या विषारी प्रचाराला व धमक्यांना भीक घातली नाही. या सर्व घटनेबाबत निवेदन करताना प्रतिगामी मुसलमानांबद्दलचा छगलांचा तीव्र संताप उफाळून आला असून शैक्षणिक मूल्यांबद्दलची त्यांची निर्मळ निष्ठा उत्कटतेने व्यक्त झाली आहे. उर्दू भाषेबद्दल छगलांना प्रेम आहे आणि भारताच्या सांस्कृतिक जीवनात या भाषेस व ह्या भाषेतील साहित्यास योग्य स्थान मिळण्यासाठी देवनागरी लिपी स्वीकारली पाहिजे हे त्यांचे मत त्यांनी आपल्या मित्रांना पटविण्याचा प्रयत्न केला. यावरून त्यांचा बुद्धिवादी दृष्टिकोन स्पष्ट होतो.

देशमुख व छगला या दोघांनीही शिक्षणक्षेत्रात–विशेषतः उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात–दर्जा सतत उंचावत जावा, असा आग्रह धरला आणि त्या दिशेने शक्य ते प्रयत्न केले. या त्यांच्या भूमिकेबद्दल मला आदर आहे; परतु जो समाज आजवर शिक्षणापासून वंचित राहिला त्या समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आकांक्षा पूर्ण कशा करता येतील याबद्दल दोघांनी काहीहि प्रयत्न वा विवेचन केलेले नाही. सामान्यांच्या जीवनाशी या दोघांचा दुरूनच संबंध आल्यामुळे ग्रामीण भागातील नव्या ऊर्मी त्यांना अपरिचितच राहिल्या.

छगलांनी शिक्षणमंत्री म्हणून उच्च शिक्षणातील इंग्रजीच्या स्थानाबद्दल जे धोरण स्वीकारले, त्या धोरणात बदल झाल्यावर त्यांनी परराष्ट्र मंत्रिपदाचा राजीनामा दिला यावरून त्यांचा आग्रह किती पराकोटीचा होता हे समजून येते. इंग्रजी भाषेबद्दलची त्यांची

भूमिका मला मान्य नसली तरी त्यांनी आत्मचरित्रात आपला दृष्टिकोन अतिशय तळमळीने न प्रभावीपणाने मांडला आहे आणि आधुनिक युगात ज्ञानसंपादनाचे श्रेष्ठ साधन म्हणून इंग्रजीचे जे स्थान आहे त्यामुळेच इंग्रजीचे ते समर्थन करतात हे त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागेल. देशमुख व छगला या दोघांनीही त्यांच्या शिक्षणक्षेत्रातील कामगिरीबाबत निवेदन करताना शिक्षणाबाबत नवा तत्त्वचिंतनपर दृष्टिकोन मांडलेला नाही. शिक्षणविषयक तत्त्वज्ञानासंबंधी त्यांची स्वतंत्र भूमिका नाही असे दिसते.

देशमुख आणि छगला यांच्या आत्मचरित्रांचे मूल्यमापन त्यांच्या कर्तृत्वाच्या कालातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनाच्या संदर्भात करण्याचा येथपर्यंत मी प्रयत्न केला. त्याचबरोबर या दोघांच्या खाजगी आयुष्याचाही थोडासा परामर्ष घेणे आवश्यक आहे.

## खाजगी जीवन

देशमुखांनी आपल्या खासगी आयुष्यातील सुखदुःखांबद्दल अगदी मोजकेच लिहिले आहे. इंग्लंडमध्ये आय. सी. एस्. ची परीक्षा दिल्यावर बॅरिस्टरीच्या परीक्षेसाठी अभ्यास करीत असताना देशमुखांनी त्यांची व रोझिना या तरुणीची ओळख कशी झाली याचा उल्लेख केला असून पुढे ते लिहितात, १९१९ -च्या शरदऋतु ( ऑटम् )मध्ये रोझिना व मी एकमेकांकडे आकृष्ट होत आहोत हे आम्हा दोघांच्याही लक्षात आले. या भावना परिणत होत गेल्या आणि ऑक्टोबरमध्ये मी तिला मागणी घातल्यावर तिने होकार दिला. खाजगी भावनांचा यापेक्षा अधिक परिस्फोट करणे देशमुखांना उचित वाटत नाही. देशमुख भारतात प्रथम एकटेच परत आले. घरी या लग्नाची बातमी देणे हे एक दिव्य होते; परंतु प्रा. लागूंच्या मार्फत ही वार्ता आईवडिलांना कळविल्यावर, घरात कोणतेच वादळ झाले नाही. या वेळी देशमुखांनी त्यांच्या मनावरील ओझे कसे उतरले आणि त्यांच्या भावंडांनी त्यांना सांगून आलेल्या मुलींचे फोटो दाखवून कशी थट्टा केली याचे दोनतीन वाक्यांत आलेले वर्णन सूचक आणि हृद्य आहे. देशमुखांच्या पत्नी लवकरच हिंदुस्थानांत आल्या. देशमुख आय. सी. एस्. अधिकारी असताना त्यांचे आईवडील त्यांच्याकडे रहावयास आले असताना गोऱ्या सुनेसमवेत त्यांचे दिवस आनंदात गेले याबद्दल देशमुखांना वाटणारी धन्यता अशीच एकदोन वाक्यांत व्यक्त झाली आहे.

देशमुखांना एक मुलगी आहे आणि या मुलीस ती नऊ-दहा वर्षांची असताना इंग्लंडमध्ये तिच्या मावशीजवळ ठेवले. या मावशीचा स्वभाव अतिशय आग्रही व हक्क गाजवणारा (possessive) होता आणि त्याचा या छोट्या मुलीच्या संस्कारक्षम मनावर अनिष्ट परिणाम होऊन ती मनाने आपल्या आई-वडिलांना दुरावली. त्यामुळे देशमुखांना व त्यांच्या पत्नींना जो तीव्र मनस्ताप झाला त्याबद्दलही देशमुखांनी अतिशय संयमाने लिहिले आहे.

१९४८ नंतर सेवानिवृत्त झाल्यावर देशमुखांनी इंग्लंडमध्ये राहण्याचे ठरविले आणि तेथे घर बांधून त्याला 'रोहा' हे आपल्या गावाचे नाव ठेवले; परंतु नियतीची इच्छा वेगळी होती. त्यांच्या पत्नीचे आकस्मिक निधन झाले. देशमुख त्या वेळी हिंदुस्थानात होते. या दुःखद घटनेचे वर्णन करतानाही देशमुखांनी त्यांच्या मनात त्या वेळी भावनांचा जो प्रक्षोभ झाला असेल तो व्यक्त केलेला नाही. पुढे मुलीचे लग्न झाले. तिला आपली चूक कळून आली आणि तिच्याकडून नियमाने पत्रे येतात ही सुखद घटनाही देशमुखांनी मोजक्या शब्दांत सांगितली आहे. सुखाच्या व दुःखाच्या तीव्र प्रसंगांतील उत्कट भावना इतरांसमोर मांडण्याचे कारण नाही; जीवनातील आघात मूकपणे सोसायचे असतात अशी देशमुखांची प्रगल्भ वृत्ती आहे.

पुढे देशमुख केन्द्रीय मंत्री असताना दुर्गाबाईंशी त्यांची ओळख झाल्यावर त्यांनी दुर्गाबाईंची बुद्धिमत्ता, कर्तृत्व आणि समाजहिताची तळमळ याबद्दल देशमुखांनी पुष्कळच मोकळेपणाने लिहिले आहे. दुर्गाबाईंशी लग्न झाल्यावर देशमुखांच्या आत्मकथनातील आशयात आणि अभिव्यक्तीत झालेला फरक जाणवतो. दुर्गाबाईंच्या पूर्वायुष्याबद्दल लिहिताना एका बुद्धिमान स्त्रीने म. गांधींच्या चळवळीत घेतलेला भाग, त्यांची समाजहिताची तळमळ, समाजकल्याणाबाबतचा त्यांचा स्वतंत्र दृष्टिकोन या सर्व गोष्टींबद्दल देशमुखांना वाटणारा सकौतुक अभिमान सहजतेने व्यक्त झाला आहे. नेहमी प्रत्येक शब्द तोलूनमापून लिहिणाऱ्या देशमुखांनी दुर्गाबाईंच्या सार्वजनिक कार्याच्या वर्णनाच्या ओघात ते बहुविध होते असे सांगताना मात्र There was a romantic variety about her career असे वाक्य लिहिले आहे. इंग्रजीत Transferred Epithet नावाचा अलंकार असतो; येथे देशमुखांच्या मनातील 'रोमॅन्टिक' हा शब्द त्यांच्या नेहमीच्या संयमावर मात करून दुर्गाबाईंना अलंकाराप्रमाणे लाभला आहे !

याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे दुर्गाबाईंच्या सामाजिक कार्यात सहभागी होताना देशमुखांच्या पूर्वीच्या पद्धतीत थोडा बदल झाला आहे. समाजातील उपेक्षित थराबद्दल क्वचित लिहिणारे देशमुख ज्या वेळी आंध्र महिलासभेमार्फत दुर्गाबाईंनी केलेल्या साक्षरतेच्या, कुटुंबनियोजनाच्या आणि अन्य कल्याणकारी कामाचे आत्मीयतेने वर्णन करतात आणि त्या कामात सहभागी होताना त्यांना वाटणारा आनंद जेव्हा व्यक्त होतो तेव्हा वाचकाला पूर्वीच्या सेटलमेन्ट कमिशनर देशमुखांची आठवण होऊन मौज वाटते. देशमुखांच्या मनावरील आय. सी. एस. च्या शृंखला गळून पडण्यासाठी दुर्गाबाईंची बेडी त्यांच्या पायात पडावी लागली !

देशमुखांचा प्रथम इंग्लंडमध्ये राहण्याचा विचार होता. नंतर पुण्यामध्ये त्यांनी 'योजना' म्हणून बंगला बांधला; परंतु अखेर ते व दुर्गाबाई हैद्राबादमध्ये 'रचना' या बंगल्यात स्थायिक झाले. रोहा-योजना-रचना असा प्रवास करीत देशमुख आता शांतपणे निवृत्तीचा काल घालवीत आहेत.

छगलांनी त्यांच्या आत्मचरित्रात 'Personal' (वैयक्तिक) हे एक प्रकरणच लिहिले आहे. या प्रकरणात छगलांनी स्वतःच्या आवडीनिवडी व स्वभाव याबद्दल मनमोकळेपणाने लिहिले आहे. 'मनाने मी अतिशय हळवा आहे' असे प्रांजळपणाने सांगून ते म्हणतात, 'माझ्या मनाविरुद्ध एखादी गोष्ट झाली की माझी मनःस्थिती एकदम बिघडते व प्रयत्न करूनही माझ्या मनातील औदासीन्य जात नाही. हा एक प्रकारचा दुबळेपणा असला तरी या स्वभावामुळेच आनंदाचे क्षण आयुष्यात दीर्घकाळ रेंगाळतात असे छगलांनी लिहिले आहे. कामाचे एक प्रकारचे वेड असल्यामुळे आपण मनाचा ताण हलका करू शकत नाही अशी कबुलीही त्यांनी दिली आहे. छगलांनी कौटुंबिक जीवनात त्यांना लाभलेल्या समाधानाचा व आनंदाचा उल्लेख

करताना पत्नीचे व्यक्तिचित्र अतिशय हळुवारपणे रेखाटले आहे. सुरुवातीच्या भागातही वकिलीला सुरुवात झाल्यावर प्रॅक्टिस जमविण्याची धडपड चालू असताना लग्न ठरल्यावर व्यवसायात यश मिळावयास सुरुवात झाली हे सांगताना छगलांनी त्यांच्या पत्नी त्यांच्या आयुष्यात भाग्योदय घेऊन आल्या असे लिहिले. छगलांच्या पत्नी या सुगृहिणी होत्या. त्या छगलांसारख्या बुद्धिमान नव्हत्या. त्यांनी सार्वजनिक काम केले नाही. मात्र छगलांच्या जीवनात त्यांची सतत साथ लाभली. देशात वा परदेशात विविध स्तरांवरील मंडळी घरी आल्यावर त्यांनी गृहिणी म्हणून त्यांचे उत्तम प्रकारे आतिथ्य केले आणि आयुष्यभर आपण कोणी तरी मोठ्या आहोत असा कधीही आव न आणता छगलांची सर्वतोपरी काळजी घेतली. छगलांच्या विविध व्यापांमुळे व कामाच्या हव्यासामुळे कौटुंबिक जीवनात त्यांना फारसे लक्ष देता आले नाही. त्या साऱ्या जबाबदाऱ्या त्यांच्या पत्नीने सांभाळल्या हे सांगताना ती हे सारे करणारच असे मी गृहीत धरीत होतो. (I took her for granted) असे लिहिले आहे. या वाक्यात पत्नीच्या निधनानंतर तिच्या अस्तित्वाचे महत्त्व छगलांना तीव्रतेने कसे जाणवले हे व्यक्त झाले असून सार्वजनिक कार्यात गुंतलेल्या आत्मकेन्द्रित जीवनामुळे त्यांच्या हातून पत्नीला एका अर्थाने झालेल्या अन्यायाची कबुली दिली आहे.

या प्रकरणाप्रमाणेच शेवटी परिशिष्टात दिलेली पत्र छगलांच्या स्वभावावर प्रकाश टाकणारी आहेत; परंतु त्याहीपेक्षा छगलांनी १९५८ साली आकाशवाणीवर As I look back (मागे वळून पाहताना) या केलेल्या भाषणातील उतारा अतिशय सुंदर आहे. 'आपण इतके व्यवहारी होत चाललो आहोत आणि कठोर वास्तव आपल्या इतक्या जवळ असते की आपण भावनेला आयुष्यात स्थान देत नाही; परंतु भावनेमुळेच जीवनाला रुची येते...

...जसे आपण जास्त दिवस जगतो तसतसे आयुष्यातील सहिष्णुतेचे महत्त्व कळत जाते... जीवनाला 'माया' समजून संन्यास घेणे आणि एकांतात तपश्चर्या करणे या मार्गाबद्दल छगला म्हणतात, 'ज्या समस्यांमुळे लोक राजकीय व आर्थिक दास्यात खितपत पडलेले असतात त्या समस्यांची सोडवणूक होणे आवश्यक असताना केवळ स्वतःच्या आत्म्याचा विचार करण्याचा व्यक्तीला काय अधिकार आहे?' त्यापेक्षा भगवद्गीतेत सांगितलेले अनासक्तीचे आणि निष्काम कर्मयोगाचे तत्त्वज्ञान अधिक योग्य आहे असे छगलांना वाटते.

शैली ही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वातूनच स्फुरत असते. देशमुखांच्या स्वभावातील नेटकेपणा व काटेकोरपणा त्यांच्या भाषाशैलीतून प्रकट झाला आहे. छगला यांच्या शैलीत अधिक मोकळेपणा व प्रसन्नता आहे. देशमुखांनी आपल्या आत्मचरित्रातील कथनाला 'दी कोर्स ऑफ माय लाइफ' (माझ्या जीवनाची वाटचाल) हे दिलेले आणि छगलांनी आपल्या आत्मचरित्राला रोझेस इन डिसेंबर (शिशिर-ऋतूतील गुलाब) हे दिलेले काव्यात्मशीर्षक या दोहोतील हा फरक चांगलाच बोलका असून ही शीर्षके दोघांच्या स्वभाववैशिष्ट्याला साजेशी आहेत.

काही महान व्यक्ती इतिहासाला वळण लावतात. अशा व्यक्तींच्या समर्पणामुळे मानवी जीवनावर दीर्घकाल टिकणारा परिणाम होतो. अशा व्यक्तींचे वर्णन बर्नार्ड शॉने 'मेन ऑफ डेस्टिनी' (नियतीने निवडलेल्या व्यक्ती) असे केले आहे. देशमुख व छगला या वर्गातील नाहीत. तरीही पण बुद्धिमत्ता, कर्तृत्व आणि कार्यावरील निष्ठा यामुळे त्या दोघांनी जे कार्य केले त्यामुळे आपल्या राष्ट्राचे जीवन संपन्न झाले. देशमुख व छगला या दोघांचीही आत्मचरित्रे वाचल्यावर या दोघांच्या वाट्याला आलेली असामान्य बुद्धिमत्ता, व्यासंगामुळे आणि विविध समस्यांशी नेटाने भिडल्यामुळे या बुद्धीला आलेली धार आणि या बुद्धीचा प्रभावी साधन म्हणून निष्ठापूर्वक उपयोग करून त्यांनी केलेली देशसेवा यांची उज्ज्वल प्रतिमा आपल्या मनावर उमटते आणि नंदादीपाप्रमाणे समाजाला स्निग्ध प्रकाश दीर्घकाल देणाऱ्या या दोन व्यक्तींबद्दल आपले मन आदराने भरून येते. ही दोन आत्मचरित्रे वाचल्यावर आपले मन या वाचनाने अधिक जाणते झाले असा सुखद अनुभव येतो आणि Our souls are sweeter and saner for what we have read या एका ग्रंथकाराच्या उक्तीची सत्यता प्रत्ययास येते.

**स मा प्त**


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणें ३०

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १९-७-७५ ते २५-७-७५

**मेष : जागेचा प्रश्न सुटेल**

या आठवड्यात झालेला शनीचा बदल तुमच्या सुखस्थानी होत आहे. शनी हा तसा शुभ ग्रह नाही. सुखस्थानी आलेला हा ग्रह तुमच्या जागेचा प्रश्न यशस्वीपणे सोडवील. जशी ज्याची परिस्थिती असेल तशी त्याची जागेची समस्या सुटू शकेल. तुम्ही फ्लॅट घेऊ शकाल. शेतकऱ्यांना शेतीव्यवसायात लाभदायक असे काही करता येईल. शेतजमीन मिळू शकेल. विद्यार्थ्यांना परीक्षेत यशप्राप्ती होईल. तांत्रिक ज्ञान मिळवलेल्या पदवीधरांना या आठवड्यात नोकरी मिळू शकेल. कोणताही स्वतंत्र उद्योग करावयाचा झाल्यास प्लॅस्टिक व खते यांच्याशी संबंधित असा करा. रविवारी अपेक्षित व्यक्ती भेटेल. तुमचे महत्त्वाचे काम होईल. सोमवार ते गुरुवार नोकरी व न्यायालयाची कामे होतील. तरुण-तरुणींनी प्रेमात पडणे या वेळी हिताचे ठरेल. संततीचा योग आहे. महिलांनी अवघड काम करू नये. नोकरीत मन लावून काम करावे.

**वृषभ : नव्या क्षेत्रात प्रवेश**

तुम्ही साडेसातीतून मुक्त होत आहात हीच मुळी एक घटना तुमच्या बाबतीत महत्त्वाची ठरणार आहे. जो शनी तुम्हास नुकसानीचे धक्के देत होता तोच शनी आता तुमच्या सुप्त कर्तबगारीला प्रोत्साहक व उपकारक ठरणार आहे. तुम्ही मनात जे काही ठरवाल ते या वेळी कृतीत उतरण्याची शक्यता आहे. ध्येय, निष्ठा, तडफ यांचा प्रत्यय येईल. आत्मसामर्थ्य वाढणाऱ्या घटनांची सुरुवात या वेळी होईल. शनिवार व सोमवार, गुरुवार व शुक्रवार तुमच्या बाबतीत महत्त्वाचे ठरावेत. कोर्टकचेरीचे निकाल तुमच्या मनाला आनंद देतील. नवे बळ प्राप्त होईल. इंजिनियरिंग उद्योग, शेतीमाल, रासायनिक खते, कडधान्ये यांचा व्यापार करणे या वेळी जास्त हिताचे ठरेल. नवे मित्र, उद्योगपती व श्रीमंत व्यक्ती भेटतील. तुमच्या योजनांना साहाय्य होईल. नोकरीत तुमच्या कामाचे चीज होऊन नव्या क्षेत्राची जबाबदारी तुमच्यावर सोपवण्यात येईल. महिलांनी नोकरीत बदल करायला हरकत नाही.

**मिथुन : शनीचा बदल**

पहिला शनी बदलून आता दुसरा आला आहे याची दखल तुम्हाला न घेऊन चालणार नाही. पैसा आणि कुटुंब याबाबतीत या शनीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पहिल्या शनीमुळे तुमचे सामर्थ्य वाढले होते. अनेक क्षेत्रांत तुमचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते ते तसेच आता राहील याची खात्री बाळगून चालणार नाही. याचा अर्थ एकदम काही प्रतिकूल घडेल असे मात्र नाही. काही अघटित पण आगामी व्यावसायिक जीवनावर अनुकूल परिणाम करणारे घडेल. तुम्हाला कोणत्याही कामात यश मिळवून देणारा दिवस म्हणजे शुक्रवार होय. कुलदेवतेची सतत उपासना ठेवा व कोणत्याही कामाला सुरुवात करा. बुधवार ते शुक्रवार नोकरीत कामाचा ताण वाढेल; पण तुमच्या कार्यक्षमतेला मालकाकडून शिफारसपत्र मिळेल. जबाबदारीही वाढेल. वकिली व बँकिंग व्यवसायात मोठे यश मिळेल. पैशाची परिस्थिती समाधान देणारी नसली तरी गरज भागेल. महिलांना वाङ्मयात प्रसिद्धी मिळेल. पहिल्या प्रसिद्धीचेदेखील सुख मिळेल.

**कर्क : नोकरीत चांगले दिवस**

साडेसाती व त्यांतच बारावा शनि यामुळे गेली अडीच-तीन वर्षे तुम्ही अगदी जिकिरीस आला होता. पण मित्रहो, सर्व प्रकारच्या त्रासांतून तुमची आतां सुटका झाली असून तुमच्या जीवनांत नवे पर्व निर्माण झाले आहे. बाराव्या शनीने तुम्हाला अनेकदां अपमान सहन करायला लावले. अपयश, असफलता, आर्थिक हानी असे कांही ना काही तुमच्या पाठीमागे लागले होते. पण आता मात्र तसे काही होणार नाही. पहिला शनि जरी साडेसाती करीत असला तरी तो तुमचे बरेच हित करील. रविवारी कविता नाटक वा इतर वाङ्मयप्रकार निर्मिण्याच्या दृष्टीने तुम्ही प्रयत्न करा. हातून चांगले लेखन होऊ शकेल. नोकरीत तुमच्या वाट्याला आलेली कटू परिस्थिती इतिहासजमा होईल. तुमच्याविषयी वाईट मत बाळगणारे अधिकारी तुमच्यावर खूष तरी होतील किंवा बदलून तरी जातील. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. महिलांना आजवर झालेला त्रास कमी होईल व नोकरींत बढती मिळेल.

**सिंह : सावधगिरीने वागा.**

साडेसाती म्हटली की अनेक माणसे दबून जातात. घाबरतात, कारण शनीचा प्रताप असतोच तसा. मित्रहो, तुम्हाला साडेसाती सुरू झाली असून शनि बारावा आहे हे ध्यानी घेऊन तुम्ही यापुढे अत्यंत सावधगिरीने वागावयास हवे. नोकरी असो, स्वतःचा धंदा असो, राजकीय परिस्थिती असो कीं आर्थिक परिस्थिती असो त्या परिस्थितींत स्थित्यंतराची चाहूल या वेळी लागणार आहे. नोकरीच्या बाबतीत फार जपून काम करा. कोणतीहि चूक होऊं देऊं नका. वरिष्ठांनी सांगितलेले काम त्रास झाला तरी योग्यप्रकारे करा. नवा उद्योग या आठवड्यात सुरू करा; पण क्षुल्लक कामासाठी तुम्हाला फार खर्च येईल. प्रामुख्याने राजकारणात तुमच्या आजच्या स्थानाला धक्के बसू लागणार आहेत. शनिमहाराजांची उपासना करा. महिलानी संसारांत संयमाने वागावे. डोके तापवून काही उपयोग होणार नाही.

**कन्या : पैसा चांगला मिळेल.**

दहाव्या शनीची कारकीर्द आता संपली आहे. हा शनि आता अकरावा आला आहे. दहाव्या शनीने आपणास नोकरीत बरीच मदत केली आहे. आपले बळ वाढवले. आपले वर्चस्व वाढवले; पण पैसा वा उद्योग यांत मात्र हवे तेवढे यश दिले नाही. आतां अकरावा शनि तुम्हाला हे सारे देणार आहे. लॉटरीवर तुमचा विश्वास असो वा नसो. अभावित धनलाभ होतो की नाही याची चर्चा न करतां तुम्ही आतां सरकारी लॉटरीत अवश्य भाग घ्या. तुमचे नशीब श्रीमंत ठरण्याची शक्यता आहे. सर्व प्रकारच्या आर्थिक विवंचना दूर होतील. कर्ज फिटेल. चार पैसे मोकळेपणाने खर्चू शकाल. शुक्रवार हा तुम्हाला लाभाचा दिवस आहे. त्या दिवशी कोणतेही काम करा. यश पदरी पडेल. सोमवार ते शुक्रवार नोकरीत कामाचा ताण. महिलांनी स्वतःचा उद्योग सुरू करावा. त्यांना मदत व पैसा मिळू शकेल.

**तूळ : नोकरीत प्रमोशन**

नोकरीत तुम्हाला आता बरकतीचे दिवस येत आहेत हीच या आठवड्यात महत्त्वाची गोष्ट होय. दहाव्या शनीचे तुमच्यावर कृपाछत्र आहे. मुळातच शनी हा तूळराशीचा मित्र आहे. विज्ञान, रसायन, इंजिनियरिंग उद्योग, पोलीस, मिलिटरी व राजकारण यांच्याशी संबंधित जी जी व्यक्ती असेल ती ती या आठवड्यात भाग्यवान ठरणार आहे. चालू नोकरीत बढती व प्रमोशन मिळेल. कोणत्याही प्रकारचा बेकार असो त्याला या वेळी काम मिळणार आहे. तुम्ही शनीबोटात सोन्याची अंगठी घाला तुमचे यश द्विगुणित होईल. रविवारी महत्त्वाचे काम होईल. तुमची स्वतःचा उद्योग सुरू करण्याची योजना प्रत्यक्षात उतरेल. मंगळवार ते गुरुवार राजकारणी व्यक्तीचा सहवास लाभून प्रवास घडेल. महिलांना कलाक्षेत्रात लाभ होईल. गणाचे चीज होईल. पैसा मिळेल.

**वृश्चिक : भाग्याच्या घटना**

तुमची रास मुळातच हुकूमशाहीचा अंगीकार करणारी आहे. उत्तम ॲडमिनिस्ट्रेटर किंवा प्रशासक ही पदवी फक्त वृश्चिक राशीच्या व्यक्तीलाच लाभली जाते. प्रिय मित्र शनी भाग्यस्थानी आला आहे ही आणखी एक पर्वणी आहे. यावर विश्वास ठेवा. या वेळी जे जे कराल ते ते तुमची गुणवत्ता वाढवणारे, तुमचा दर्जा वाढवणारे व प्रतिष्ठेची गुरुकिल्ली तुमच्या हाती देणारे ठरणार आहे. तुमच्यापैकी जे कुणी पदवीधर असतील त्यांना ऑफिसरची नोकरी मिळणार आहे. चालू नोकरीत कष्टाचे व बुद्धीचे चीज होईल. मालक असो की वरिष्ठ अधिकारी असो तुमच्या कर्तबगारीचे चीज या वेळी होणार आहे. नोकरीत मनोरथ पूर्ण होणे हेच या वेळचे वैशिष्टच होय. आर्थिक बाजू वाईट नसली तरी पैसा सहज मिळणार नाही. मन शांत ठेवा व मुत्सद्देगिरीने वागा. महिलांना सार्वजनिक कामात मोठे स्थान मिळणार आहे. माहेरी जाण्याचा योग येईल.

**धनू : तब्येत सांभाळा**

या वेळी तुम्हाला प्रेमाचा एक इशारा द्यावासा वाटतो तो म्हणजे तब्येतीच्या बाबतीत तुम्ही जाणीवपूर्वक काळजी घेणे हा होय. शनी आठवा झाला आहे याकडे दुर्लक्ष करू नका. आजवर सातव्या शनीचा तुमच्यावर दबाव होता तो आता दूर झाला आहे. तुम्ही जर एखाद्या वरिष्ठ जागेवर असाल तर तुम्ही हाताखालच्या माणसाबरोबर संयमाने व प्रेमाने वागणेच हितकारक ठरेल. शनीला अप्रामाणिकपणा व खोटेपणा आवडत नाही. आपण याचा अवमान करू नका. निष्ठा देणे हेच या वेळी आवश्यक आहे. क्षुल्लक बाबतीत निराशा होणे. हातपाय गळणे, दुर्लक्ष करणे असे काही करू नका. नोकरीत थोडा त्रास होईल. पैसा मात्र या वेळेपासून चांगला मिळेल. व्यापार-उद्योग उत्तम चालेल. दुय्यम धंदा बरकतीला येईल. महिलांनी भावनेच्या आहारी जाऊ नये. मंगळवारचा उपास करावा. नोकरीत कामाकडे लक्ष द्यावे.

**मकर : कारभारकुशलतेचा प्रत्यय**

राशीस्वामी शनी हा आता तुमच्या चंद्रासमोरच आला आहे. तुमचे सुखदुःख, तुमचे वैभव वा उद्योग हे सारे शनीवर अवलंबून आहे. कारण तो तुमचा मित्र आहे. आता तुमच्या सर्व प्रकारच्या कामाला गती येणार आहे. नोकरी असो की स्वतंत्र धंदा असो तुमच्या भाग्याला कलाटणी मिळणार आहे. नेत्रदीपक यश तुमच्या पदरी पडणार आहे. चालू नोकरीत तुमच्या कामाचे मूल्यमापन योग्य प्रकारे होईल. तुमचे आजवर डावलले हक्क आता तुमच्या पदरात पडणार आहेत. वरिष्ठांची मर्जी तुम्ही मिळवणार आहात. तुमच्या शिस्तबद्ध कारभाराचा मालक उदो उदो करतील. आर्थिक स्थिती सुधारणार आहे. कलाकौशल्यात तुमची मान उंचावणार आहे. इंजिनियरिंग उद्योग सुधारणार असून तुम्हाला नफा होणार आहे. महिलांना समाजात व राजकारणात मान मिळणार आहे. नोकरीत प्रमोशन मिळणार आहे.

**कुंभ : शत्रूचा निःपात**

शत्रुस्थानी नेहमीच उग्र वृत्तीचे ग्रह असावेत. कारण शत्रूंना शासन करण्याचे काम ते करतात. शनी हा तुमच्या राशीचा मालक असून तो आता शत्रुस्थानी आला आहे. ही घटना तुमच्या बाबतीत मोठे वरदानच ठरणार आहे. तुमचा पिंड राजकीय व उद्योगप्रधान आहे. या दोन्ही बाबतीत सारे काही तुमच्या मनाप्रमाणे घडणार आहे. तुमच्या वैयक्तिक जीवनातील विरोधक असोत वा राजकीय स्पर्धक असोत या आठवड्यात त्यांची तुमच्याविषयीची दृष्टी बदलली असेल. ते तुम्हाला आता सहकार्य देतील. राजकारणात तुमच्या वाट्याला आलेली कोंडी आता फुटणार असून एक नवे तेज तुम्हाला प्राप्त होणार आहे. तुमची प्रतिष्ठा वाढणार आहे. कोर्टात चालू असलेले खटले निकाली निघून तुम्हाला न्याय मिळणार आहे. नोकरीत तुम्ही कौशल्य दाखवलेत तर तुम्हाला योग्य ते बक्षीस मिळू शकेल. वकिलीचा व्यवसाय उत्तम चालेल. महिलांनी स्वतःचा एखादा धंदा सुरू करावा. फायदा होईल.

**मीन : गुरु-शनीची कृपा**

चंद्राबरोबर असलेल्या गुरूशी आता शनीचा शुभयोग घडत आहे. ही अत्यंत अनुकूल अशीच घटना आहे. सर्वच क्षेत्रात यश, सफलता व गुणप्रदर्शन यांचा प्रत्यय येणार आहे. प्रेसचा व्यवसाय अडचणीवर मात करून प्रगतीकडे जाईल. प्रकाशनातील अडचणी दूर होतील. कापडव्यापार असेल तर मंदीची लाट निवारण होईल. कापडगिरणी असेल तर कामगारांचे सहकार्य मिळेल. नवा उद्योग फलदायी होईल. लेखनात नाव चमकेल. रेंगाळलेले लेखन पुरे होईल. पैसा व कीर्ती मिळेल. कल्पकतेला तेज चढेल. जवळपासचा प्रवास होईल. वाहनखरेदीचा जबरदस्त योग आहे. चालू नोकरीत जबाबदारी वाढून कामाचे चीज होईल. बढतीबदलीचा योग आहे. सरकारी नोकरीपेक्षा खाजगी नोकरीत जास्त अनुकूल अनुभव येईल. दिलेली आश्वासने पुरी होतील. गुरुवारी कामात यश मिळेल. महिलांना मंगलकार्यात मोठेपणा मिळेल. चार पैसे मनासारखे खर्च करता येतील. □



मिलीनंतर जया भादुरी पडद्यावर राहणार की नाही ? चित्रव्यवसायापुढे अस्वस्थ प्रश्नचिन्ह उभं आहे. उलटसुलट चर्चा दबत्या आवाजात सुरू आहे. अशा वेळी जयाचा एक सहाध्यायी, आजही जया आपलं सुखदुःख ज्याच्याजवळ बोलते असा निकटचा मित्र आणि जयासाठी चंदेरी नगरीची दारं खुली करून देणाऱ्या ' सुमन 'चा दिग्दर्शक मदन बावरिया ' फिल्म इन्स्टिटयूट 'मधे भेटला. योग्य संधीची वाट पहात थांबलेल्या या गुणी दिग्दर्शकानं जया भादुरीला कलाकार आणि व्यक्ती म्हणून जवळून पाहिलं आहे. जयाबद्दल त्याच्याशी थोडं प्रत्यक्ष बोलणं आणि त्यानं तिच्यावर पूर्वी लिहिलेले लेख यातून दिसलेली जया त्याच्याच शब्दात वाचा.

# सहाध्यायाच्या दृष्टीतून जया भादुरी

अरुणा अंतरकर

भविष्यकाळ नेहेमी चोरपावलांनीच का यावा लागतो, कुणास ठाऊक ? पण तो चोरपावलांनी येतो आणि चोरपावलांनीच वावरतो खरा. इतक्या दबत्या चालीनं तो येतो, की त्याची ओळख पटेपर्यंत काळाच्या रोजनिशीत त्याची भूतकाळ म्हणून नोंद झालेली असते. कालचक्राच्या या प्रवाहाची कधीकधी चाहूलदेखील लागत नाही; पण त्याचा प्रवास अविरत चालू असतोच.

...विचार करायला लागलं की वाटतं, अरे, ही तर कालचीच गोष्ट. कालच तर आम्ही–आम्ही म्हणजे कंवर पेंटल, आत्मप्रकाश, सूरज पुरोहित, सुरेश चटवाल आणि मी–मदन बवारिया–' उपहार ' पाहायला गेलो होतो. आमच्या ' उपहार ' पाहण्याला आमच्या दृष्टीनं एक खास अर्थ होता. आमची मैत्रीण उपहारची नायिका नव्हती काय ?

सिनेमा संपला. आम्ही बाहेर आलो. जवळच एक टोळकं तावातावानं गप्पा मारत उभं होतं. जया भादुरीच्या एका उत्फुल्ल पोस्टरपाशी उभं राहूनच त्यांची चर्चा चालली होती. त्यांच्यातला एक गुजराती तरुण मधेच बोलला, ' भई वाह ! मजा आवी गयो. छोकरी शूं कमाल काम करूय छे ! '

त्या तरुणाचा हा अभिप्राय आम्हाला सर्वांनाच फार पसंत पडला. आमच्या अंगावर मूठमूठ मांस चढल्यासारखं वाटलं. पण जरा त्या तरुणाची मस्करी करावी म्हणून मी अगांतुकपणे म्हटलं, ' आपण तर बुवा बोअर झालो ! ती पोरगी तर अगदीच सुमार आहे. खि-खि हसण्यापलीकडे आणि वेडयावाकडया उडया मारण्यापलीकडे तिला काय येतंय ?' ते टोळकं एकदम चूप झालेलं पाहून मला आणखीच जोर चढला. मी म्हटलं, ' ठीक आहे. ' गुड्डी 'मधे हे हसणंखिदळणं नि उडया मारणं शोभून दिसलं. पण आता इथंही तेच ? छे ! ह्या पोरीचं काही फार दिवस चालणार नाही. खरं की नाही मंडळी ?'

बाप रे ! मी हे बोललो मात्र–तो मघाचाच तरुण खाऊ की गिळू नजरेनं माझ्याकडे पहात होता. त्याच्या कपाळाची शीर कोणत्याही क्षणी ताडताड उडू लागेल असं वाटत होतं. महामुश्किलीनं स्वतःवर ताबा ठेवत तो माझ्यावर गुरकावला, ' का हो महाशय, आपल्याला अभिनयातलं काही कळतं का ?'

आम्ही सगळी यावर पुन्हा खो खो हसलो आणि तिथून निघालो. या प्रसंगानंतर लवकरच जयाची गाठ पडली. तिला मी हा किस्सा सांगितला, तेव्हा तीही खळखळून हसली होती. नव्यानं चित्रसृष्टीत पाऊल ठेवणाऱ्या नटीसाठी ही प्रशंसात्मक प्रतिक्रिया दैवी वरदानासारखीच नाही काय ?

' गुड्डी ' आणि ' उपहार 'ची ही नवी अभिनेत्री आपल्या प्रभावी अभिनयाच्या जोरावर ' दूसरी सीता ' आणि ' मिली 'पर्यंत पोचली तेव्हा असामान्य यशाचा टिळा लावून बसली आहे. या प्रवासाच्या दरम्यान जयाच्या आयुष्यात जे जे काही घडलं ते परीकथेतल्यासारखं रोचक आणि अद्‌भुत तर आहेच, पण काल्पनिक मात्र मुळीच नाही.

या अफाट लोकप्रिय अभिनेत्रीचं खरंखुरं रूप पाहायचं असेल तर मला तिच्या ' आज 'पेक्षा तिचा ' काल ' पाहणं महत्त्वाच वाटतं. या बातचितीतूनच ती जया नजरेला पडते, जी कोणत्याही सर्वसाधारण स्त्रीप्रमाणे भावुक, स्वाभिमानी आणि हट्टी आहे. तिच्या विश्वात खुशीच्या लकेरी आहेत आणि छोटयामोठया चिंतादेखील.

जया भादुरीबाबत ' काल ' सुरू होतो जबलपूरपासून. इथे तिचा जन्म झाला. या कालमधे भोपाळचाही समावेश होतो. इथे तिचं शिक्षण झालं; इथेच ती लहानाची मोठी झाली. दर सुट्टीत ती कलकत्त्याला जायची. अशाच एका वार्षिक फेरीत तिनं सत्यजित रायच्या ' महानगर 'मधलं आपलं काम पुरं केलं होतं. हा सगळा काल जयाची किशोरावस्था सांगतो आणि ही अवस्था अद्यापही जयाला सोडून गेलेली नाही, असंच आजही वाटतं.

या ' काल 'प्रवासातला पुढचा टप्पा पुण्याच्या ' फिल्म इन्स्टिटयूट 'मधे सुरू होतो आणि मुंबईच्या ' मोहन स्टुडिओ 'मधे ' गुड्डी 'च्या मुहूर्तानिशी संपतो. प्रथम जयाचे फिल्म इन्स्टिटयूटमधले दिवस आठवू या. फिल्म इन्स्टिटयूटमधलं आमचं ते दुसरं वर्ष होतं. जुलै महिना इन्स्टिटयूटमधे नेहेमीच एक चैतन्य, एक ताजेपण घेऊन येतो.

लांबलचक सुट्टी आणि घरच्यांचा सहवास उपभोगून मंडळी पुण्याचा आल्हादक पावसाळा चाखायला परत येतात. जुन्या मित्रांना भेटायची आणि नवी भरती काय प्रकारची आहे हे पाहायची उत्सुकता प्रत्येक चेहेऱ्यावर दिसत असते. नव्या विद्यार्थ्यांना प्रारंभीचे दिवस जरा तणावाचे जातात. परंतु पहिले चार दिवस ' वरिष्ठां 'च्या हुकमानुसार काढले, की पुढच्या सुखी जीवनाची ग्वाही मिळते.

अशा त्या उत्साहाच्या वातावरणातच आमच्या कानावर एक कुणकुण आली. ' महानगर 'मधे सत्यजितकडे काम करणारी कुणी जया भादुरी ॲक्टिंग कोर्समधे दाखल झाली होती. ती येण्याआधीच तिच्या नावाचे डंके पिटले जात होते. तिच्या येण्याची आम्ही उत्सुकतेनं वाट पाहत होतो. ही काही कुणी मामुली मुलगी नसणार. तिच्या नावाला आधीच ग्लॅमर प्राप्त झालेलं होतं.

असं करता करता एक दिवस बातमी आली–' जया भादुरी आली आहे. ' बातमी कानी पडली तेव्हा आम्ही कँटीनमधे बसून चहाबरोबर तोंडाची वाफ दवडीत होतो. बातमी ऐकली मात्र,–झटकन् बाहेर आलो आणि समोर बघतो तर–हाय ! जया भादुरीच का ही ? अगदी किरकोळ, छोटी चण; अगदीच सामान्य चेहेरा. त्यातच बावरून उभी असल्यामुळे या ' रुबाबा 'त आगळीच भर पडत होती. बहुधा सीनियर विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या रॅगिंगची कल्पना असल्यामुळे तिचा चेहेरा कसनुसा झाला असावा.

हा संकोच दूर व्हायला वेळ लागला नाही. आमच्या इन्स्टिटयूटमधल्या शिक्षणाचा सर्वांत मोठा लाभ म्हणजे, इथे पाहायला मिळणारे विदेशी सिनेमे. आता विचाराल तर त्या सगळ्या सिनेमांची नावंदेखील आठवणार नाहीत; पण ते आगळेवेगळे चित्रानुभव घेताना इथल्या भावी कलाकारांच्या सर्जक अंतःकरणाच्या तारा छेडल्या जात होत्या आणि नवे सूर तेव्हाच जुळत होते एवढं नक्की. जयाच्या दृष्टीनंसुद्धा या वैचित्र्यपूर्ण चित्रानुभवांनी मौलिक कामगिरी केली. लहान वयातच जयाच्या अभिनयात दिसणारी परिपक्वता आणि स्वाभाविकता यांचं श्रेय विदेशी सिनेमांच्या तिच्या डोळस अभ्यासाला आहे. इन्स्टिटयूटच्या दिवसांत आम्हा पाच-सहा जणांचा एक ग्रूप बनून गेला. जया अर्थातच आमच्या या ग्रुपच्या नेतेमंडळीपैकी होती. या वेळी जयाला जवळून पहायची संधी मला मिळाली. अल्पावधीत सगळं वातावरण प्रभावित करण्याची, परिस्थिती ताब्यात घ्यायची जयाची जन्मजात सवय आहे. जया नेहेमी वर्तमानकाळात पूर्ण रमलेली, गढलेली दिसते ती म्हणूनच. जया स्वाभिमानी आणि अगदी सरळ स्वभावाची आहे, पण या विलक्षण सरळतेला एक दुमडलेली कड आहे– विलक्षण हट्टीपणाची, विलक्षण जिद्दीची. एखाद्या गोष्टीसाठी जया हटून बसली की तिच्यापासून तिला परावृत्त करणं ब्रह्मदेवालाही शक्य नाही. तिच्या स्वाभिमानाला एवढा धक्का लागलेला ती खपवून घेणार नाही. मला एक प्रसंग ठळकपणे आठवतो. त्या वर्षी पदवीदान समारंभासाठी आलेल्या एका सीनियर विद्यार्थ्यानं, पहिल्या वर्षाच्या जयाला फर्मावलं, ' माझ्याबाहेर चहा प्यायला बाहेर चल. ' जया कडाडली, ' यू माइंड युवर ओन बिझनेस. यू हॅव नो राइट टू ह्युमिलिएट अदर्स लाइक धिस. ' (दुसऱ्यांवर हुकमत गाजवायचा तुला काही एक अधिकार नाही. तू आपला रस्ता सुधार! ') दादागिरी करण्यासाठी प्रसिद्ध असलेला तो विद्यार्थी इतका चकित झाला, त्याच्या तोंडून शब्द फुटेना. उण्यापुऱ्या पाच फुटांच्या पोरीची ही हिम्मत ?... त्यानं निमूटपणे जयाच्या आज्ञेचं पालन करीत आपला रस्ता सुधारला. आज हा मुलगा हिंदी सिनेमातल्या ' बिझी हीरो 'मध्ये गणला जातो.

त्याच्यावरून आठवलं. जयाच्या सहाध्यायांमध्ये डॅनी, अनिल धवन, रश्मी, योगेश छाब्रा, दिनू हरिश, शशिकिरण (' बॉबी' प्रसिद्ध) आणि मुकेश आचार्य यांचा समावेश होता.

असाच आणखी एक प्रसंग आठवतो. आधीच रंगीत असलेलं इन्स्टिटयूटचं वातावरण होळीच्या दिवसांत वेगळाच रंग घेऊन येतं. कुठल्याही प्रांतातला, कुठल्याही धर्माचा विद्यार्थी असो, होळीत तो मनापासून रंगतो आणि भारतीय विद्यार्थ्यांपेक्षा होळीची मजा लुटतात टंजानिया, घाना, थायलंड, इराण, अफगाणिस्तान, नेपाळ आणि सिंगापूर या देशांचे विद्यार्थी. होळी म्हटली की छेडछाड आलीच. ह्या मस्तीची मौज लुटण्यासाठी माजी विद्यार्थीदेखील होळीच्या दिवशी मुद्दाम वेळ काढून येतात. त्याही वर्षी काहीजण आले होतेच. त्यांच्यापैकी एका जादा उत्साही तरुणानं जबरदस्तीनं जयावर रंग उडवण्याचा खटाटोप चालवला. जया जी खवळलीय म्हणता ! ' ये क्या बदतमीजी है '— तिने हिंदी फिल्मच्या हिरॉइनच्या थाटात त्याला खडसावलं. आणि गंमत पहा ! ज्युनिअर विद्यार्थ्यांना धाकात ठेवणं हा आपला जन्मसिद्ध हक्क मानणारा तो पुरुषोत्तम सारवासारव करीत जयापुढून पळ काढता झाला. आज तो एक उत्तम साउंड रेकॉर्डिस्ट म्हणून ओळखला जातो.

अर्थात दुसऱ्याच्या फिरक्या घेणं, वेळप्रसंगी दुसऱ्याला धाक दाखवणं हा जयादेखील आपला जन्मसिद्ध हक्क मानते. तसा एकही मौका ती हातचा दवडणार नाही. आणि या हल्ल्यातून अमिताभ बच्चनदेखील बचावला नाही. ' सात हिंदुस्थानी 'च्या शूटिंगसाठी अमिताभ इन्स्टिटयूटमध्ये आला होता तेव्हाची गोष्ट. नेहेमीप्रमाणे आमचा अड्डा कँटीनपाशी बसला होता. लंबूटांग अमिताभ आमच्या जवळून गेला मात्र,– त्याला ऐकू जावं अशा सुरात जया म्हणाली होती, ' हरे राम ! काय दिवस आलेयत या इन्स्टिटयूटला ! कसले कसले लोक इथे हीरो बनायला येऊ लागलेत ! ' जया नुसते बोलून थांबली नव्हती. ती या वाक्यापाठोपाठ, पोट धरधरून हसली होती. ' कसल्या कसल्या लोकां 'पैकी वाटणारा हा गृहस्थ एक दिवस आपला जीवनसाथी बनणार आहे, याची तिला कशी कल्पना असणार ? भविष्यकाळ नेहेमी चोरपावलांनी प्रवेश करीत असतो ना ?

खोडकर जयाच्या स्वभावाचा दुसरा भाग म्हणजे कमालीचा साधेपणा आणि सरळपणा. मनात आलेली गोष्ट जया

कुणाचाही मुलाहिजा न ठेवता सांगून टाकणार. यामुळेच लोकांचे बऱ्याचदा गैरसमज होतात. आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे लोक नाराज झालेले जयाला दिसतात, तेव्हा ती फार कष्टी होते आणि विचारते, ' लोक इतका का गैरसमज करून घेतात ?' आणि एकदा का जया खिन्न झाली म्हणजे पहायला नको. मुळातच ती थोडी लहरी आहे. खूपदा हसतखेळत बोलत असतानाच ती एकाएकी गप्प होते. तीक्ष्ण संवेदनाशीलता हेच तिच्या अति भावुकपणाचं कारण आहे.

दिवस चाललेलेच होते. आम्ही आमच्या फिल्मस् तयार करू लागलो. त्या वर्षी इन्स्टिटयूटमध्ये तयार झालेल्या १३ लघुपटांपैकी तब्बल आठांची नायिका होती– जया भादुरी. हे बहुधा भावी व्यस्ततेचं प्रतीक होतं. अर्थात ही गोष्ट आज कळतेय. तेव्हा पत्ता नव्हता. कारण... कारण तेच– भविष्यकाळ नेहेमी चोरपावलांनी येतो.

त्याच वर्षी मी माझी डिप्लोमा फिल्म ' सुमन ' बनवली. ' सुमन 'ची पटकथा मी जयाला नजरेसमोर ठेवूनच लिहिली होती. जयालासुद्धा ही भूमिका पहिल्या झटक्यातच पसन्त पडली. आमचा गप्पांचा विषय मग ' सुमन ' हाच होऊ लागला. गंमत म्हणजे, इन्स्टिटयूटमधल्या माझ्या वरिष्ठांनी मला सल्ला दिला की, मी जयाऐवजी दुसऱ्या कुणा मुलीला ' सुमन 'ची नायिका करावं. कारण जया अल्लड किशोरी वाटत नाही. पण मला त्यांचं म्हणणं पटलं नाही. जयाला लक्षात घेऊनच मी ' सुमन ' रचली होती. मी माझ्या मताला चिकटून राहिलो. अखेर जयाच ' सुमन 'ची नायिका निश्चित झाली. ' सुमन 'पुरी झाली मात्र,– आधी नाक मुरडणारे हेच लोक म्हणू लागले, ' या भूमिकेसाठी जयाशिवाय दुसरं कुणी चाललंच नसतं. ' जयाची आणि माझी हे ऐकून हसता हसता पुरेवाट व्हायची. ' सुमन 'च्या शूटिंगचे ते दिवस मला अजून डोळ्यांसमोर दिसतात. भल्या पहाटे साडेपाच वाजता जया हजर व्हायची. कानाभोवती स्कार्फ आणि सुमनच्या घागरा-चोळीच्या वेशावर एन. सी. सी. चा लाल रंगाचा कोट आणि हातात छोटी अटॅची केस, या थाटात येणारी जया म्हणजे चालतीबोलती बाहुली वाटायची. या एन. सी. सी. कोटामागे एक जुनी कहाणी होती. शाळेत असताना ती एन. सी. सी.त होती. एन. सी. सी. तिला मनापासून आवडायची. लाल कोट ही तिची आवडीनं जपलेली आठवण.

' सुमन 'साठी जयानं अपार श्रम घेतले. शेतातल्या खडकाळ जमिनीतून धावता पळताना अनेकदा तिचे पाय फुटून रक्तबंबाळ व्हायचे. पण तिनं एकही दिवस शूटिंग अडू दिलं नाही. शूटिंग संपतासंपता तिला ताप भरला. मी होऊनच शूटिंग स्थगित करणार होतो. पण जयानं सक्त मनाई केली. ' आत्ता आपण शूटिंग थांबवलं तर फिल्म पूर्ण व्हायची आशा नाही, मदन. तू चिंता करू नकोस. तू तुझं काम कर– मी माझं करते. ' तिनं आपला हट्ट मला मानायला लावला. ' सुमन ' पूर्ण झाली. त्या वर्षीचं श्रेष्ठ फिल्मचं सुवर्णपदक ' सुमन 'नंच पटकावले.

इन्स्टिट्यूमध्ये काही घडो, विद्युतवेगानं त्याची खबर मुंबईपर्यंत पोचतेच. जया भादुरीची कीर्ती मुंबईपर्यंत गेली होतीच. हृषिकेश ' मुखर्जी त्या वेळी ' गुड्डी 'ची पूर्वतयारी करीत होते. या सिनेमासाठी त्यांना अगदी ताजा चेहेरा हवा होता. पटकथालेखक नबेंदू घोषनी जयाचं नाव त्यांना सुचवलं. हृषिदा ताबडतोब इन्स्टिटयूटमध्ये आले. जयानं त्यांना दाखवण्यासाठी ' सुमन 'ची निवड केली. सिनेमा संपला–हृषिकेश मुखर्जीनी ' गुड्डी 'साठी जयाची निवड पक्की करून टाकली. जयाचा आनंद त्या दिवशी गगनात मावेना.

हृषिदा मुंबईला परतले. पाठोपाठ मुंबईचं दुसरं एक फिल्म युनिट जयाची कीर्ती ऐकून तिच्या फिल्मस् पहाण्यासाठी इन्स्टिटयूमध्ये डेरेदाखल झालं. या वेळी जया ' राजश्री पिक्चर्स 'चा ' उपहार 'ची नायिका बनली आणि त्यानंतर लगोलग तिसरा करार जयाकडे चालून आला. डॉ. धर्मवीर भारतींच्या ' गुनाहोंका देवता 'वर निघणाऱ्या ' एक था चंदर– एक थी सुधा 'ची नायिका बनण्याचं भाग्य जयाला लाभलं होतं. तीन बड्या संस्थांनी आपल्या महत्त्वपूर्ण सिनेमांसाठी जयाची निवड केली होती, ही गोष्ट साऱ्या इन्स्टिटयूटचा विश्वास वाढवणारी ठरली. यानंतर परीक्षा झाली. सुट्टी सुरू झाली. आमचं हे शेवटचं वर्ष होतं. तीन वर्षांच्या सहवासाचा आता शेवट होता. या तीन वर्षांत आम्ही पाचजणं फार जवळ आलो होतो. पण वियोगाचं दुःख करून चालणार नव्हतं. तो अटळ होता. जया भोपाळला जायला निघाली तेव्हा आम्ही सगळी तिला सोडायला स्टेशनवर गेलो. मी जयाला म्हटलं, ' तू पुढच्या वेळी पुण्याला येशील तेव्हा मोठ्ठी स्टार बनलेली असशील. ' ' डोंट बी सिली ! ' म्हणताना जयाच्या डोळ्यात पाणी तरारलं होतं.

काही दिवसांतच परीक्षेचा निकाल जाहीर झाला. जयानं, अपेक्षेप्रमाणे, पहिला नंबर मारला होता. अभिनयाचं सुवर्णपदक तिनं जिंकलं होतं. त्यानंतर जयानं ज्या वस्तूला हात लावला, तिचं सोनं झालं.

जयाच्या आयुष्यातलं इन्स्टिटयूटपर्व संपलं. ' मोहन स्टुडिओ 'त ' गुड्डी 'च्या मुहूर्तासाठी कॅमेऱ्यासमोर उभी रहाणारी जया एका नवा पर्वाला सामोरी जात होती. या पर्वातल्या प्रत्येक अध्यायाचं प्रत्येक पान सोनेरी होतं. या खंडातली जयाची कहाणी म्हणजे ' गुड्डी ' पासून ' कोरा कागज 'पर्यंतच्या यशस्वी अभिनय-प्रवासाची कहाणी आहे. ती असंख्य वेळा अगणित ठिकाणी सांगितली गेली आहेच. तिची पुनरावृत्ती करीत नाही. या काळात जयानं कोणकोणत्या सिनेमांत कोणकोणत्या आणि कोणाबरोबर भूमिका केल्या तेही सर्वपरिचित आहेच. हे पर्व म्हणजे जयाभोवती वाढणाऱ्या गर्दीची नि ग्लॅमरचे तट तिच्याभोवती उठण्याची कहाणी आहे. एक सामान्य मुलगी स्टार–नव्हे, सुपर स्टार बनण्याची कहाणी आहे ही. या परीकथेला शोभावा असा राजकुमारही आता कहाणीत सामील झाला आहे.

आजच्या सुपर स्टार जयाचा सर्वात मोठा विशेष म्हणजे तिचं साधेपण. साधेपणा हाच तिचा शृंगार. कोणताही आडपडदा न ठेवता प्रसिद्धी मिळवण्याच्या खुल्लम खुल्ला युगात डोक्यापासून पायापर्यंत शरीर झाकणारी जया या साधेपणाच्या बळावरच सर्वोच्च शिखर पादाक्रान्त करते. आडपडदा न ठेवणाऱ्या मात्र कुठे थांबाव हे न कळल्यामुळे भांबावल्या आणि त्यांची होडी अखेर भोवऱ्यात सापडून रसातळाला गेली.

जयानं नेहेमी मध्यमवर्गीय व्यक्तिरेखा स्वीकारल्या आहेत आणि म्हणूनच कोणताही

दिग्दर्शक तिला स्वीकारतो. कारण त्याला ती आपल्या कुटुंबियांपैकीच एक वाटते. जयानं तोच तो अभिनय केला तरी न कंटाळता बघितला जातो तो या भावनेपोटीच. दर नव्या सिनेमागणिक जया भादुरीचा 'बॉक्स ऑफिस ड्रॉ' वाढतोच आहे. आज ती सफलतम अभिनेत्री मानली जाते. तिची निश्चित अशी एक 'इमेज' तयार झालेली नाही. खुद्द जया म्हणते, 'मला माझी कोणतीच इमेज बनवायची नाही. मला नेहेमी जयाच रहायचंय.' याबाबत बोलताना मी म्हटलं, 'जया, काही लोक नेमकं याच गोष्टीमुळे तुला अयशस्वी कलाकार समजतात. त्यांचं म्हणणं, तुझा अभिनय एक सूरी होत चाललाय.' यावर जयाचा खुलासा : 'आधुनिक अभिनयशैलीत मला कोणत्याही पात्राची मन:स्थिती बुद्धिमानपणं व्यक्त करणं मोलाचं वाटतं. त्या त्या व्यक्तिरेखेचा अभ्यास करून मी एक तर स्वत:ला त्याच्यात ओतते, नाही तर त्या परिस्थितीत मी जशी वागले असते ती पद्धत त्या पात्राला देते. बस्स, हे दोनच मार्ग माझ्यापुढे असतात.'

दीर्घ सुट्टी घेतल्यानंतर जया पुन्हा कामावर रुजू झाली; 'मिली' पूर्ण केला आणि आता पुन्हा ती मोठ्या सुटीवर जाईल. कारण सांगायला नको. ते उघड गुपित आहे. भविष्यकाळाबाबत बोलायला जया फारशी उत्सुक नसते. अगोदरच मी सांगितलं की, ती वर्तमानकाळात जगणारी आहे. पुढचे बेत विचारले तर म्हणते, 'एखादी तशीच चांगली भूमिका मिळाली तर मी ती बहुतेक स्वीकारेन.' 'बहुतेक ?' मी भुवया उंचावून विचारतो. 'हो, बहुतेक.' जया हसून उत्तरते, 'कारण तितकीच ताकदीची भूमिका आली तर आधी काहीही बेत केलेला असो, मी तिच्याकडे पाठ फिरवू शकत नाही. बस्स, एवढंच सांगू शकेन मी सध्या.' जयानं अधिक काही बोलायला हवं अशातला भाग नाही. तिनं मोठमोठे बेत कधीच बोलून दाखवलेले नाहीत. त्या त्या क्षणाला योग्य आणि झटपट निर्णय ती घेऊ शकते. तिला आधी चाहूल न लागू देता अशा अनेक क्षणांनी तिच्या घराचा दरवाजा ठोठावला. जयानं त्यातल्या प्रत्येकाचा अचूक उपयोग करून घेतला. भविष्यकाळ भले चोरपावलांनी येवो, जयाकडं तो लाभ घेऊनच येतो, हा इतिहास आहे. ■ ■

## क्लिओपात्राचं नाक कमी लांब असतं तर.....

'विद्यापती', 'चंडीदास', 'बादबान', 'आरती', 'उंचे लोग' आदी गाजलेल्या आणि दर्जेदार चित्रपटांचे दिग्दर्शक फणी मुजुमदार हे 'नित्य लवकर उठे तया आरोग्य-संपत्ती भेटे' या वचनावर दृढ श्रद्धा ठेवणारे आहेत. चित्रव्यवसायाची दृढ प्रकृती कलाकारांनी वेळेवर शूटिंगला येण्यावर अवलंबून आहे; कलावंतांना शिस्त लावा—या व्यवसायातली निम्मीअधिक दुखणी छू: होतील, असा त्यांचा कळकळीचा सल्ला आहे. जबरदस्त करभार, अपुरा आणि महाग पडणारा भांडवलपुरवठा, चित्रपटांची चणचण, तळपत्या ताऱ्यांची गगनचुंबी मानधनं, सरकारी (आणि जनतेकडूनही होणारी) हेळसांड आणि कलाकारांमधला शिस्तीचा अभाव, ही रोगलक्षणं सांगून फणीदांनी सविस्तर खुलासा केला आहे तो असा :

'सकाळी बरोब्बर नवाच्या ठोक्याला, मेकप करून सेटवर येणारा कलाकार चित्रव्यवसायाचं कोटकल्याण करणारा ठरतो. व्यवसायातला छोटामोठा माणूस त्याच्याबरोबर वेळेवर काम सुरू करतो. याउलट उशिरा येणारा कलाकार सगळ्या उद्योगाच्या नाड्या आखडून ठेवत असतो. वेळेवर येणारा कलाकार चित्रनिर्मितीचा खर्च काबूत आणू शकतो. म्हणजे खर्च कमी झाल्यानं फायद्याचं प्रमाण वाढलं आणि समजा पुढे तोटाच होणार असला, तरी त्याचा काही भाग त्याच्या वेळेवर येण्यानं कमी होतो.

कलाकाराच्या वेळेवर येण्यानं तो निर्माता, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञ यांची मन:स्थिती प्रसन्न ठेवतो. नाही तर कलाकाराची वाट पहाताना या लोकांचा संताप होतो; पण तो बोलून दाखवता येत नाही; आत दडपावा लागतो. हे जास्तच वाईट. कारण मनात दडपून ठेवलेल्या संतापाचा परिणाम सर्जनशीलतेवर होतो. त्याचं काम त्याच्याकडून चोख पार पाडलं जाण्याची शक्यताच त्यामुळे नष्ट होते. त्याच्या नियमित वेळेवर येण्यानं वेळापत्रकाबरहुकूम शूटिंग पूर्ण होईल. काम भराभर पूर्ण होतंय असं पाहिल्यावर फायनान्सरही पैशाच्या थैलीचं तोंड सैल सोडील. सिनेमा चालण्यासाठी ह्याची भर घाल—ते अधिक टाक, अशा दर्जा खाली आणणाऱ्या मागण्या तो करणार नाही. वेळेवर आणि प्रसन्न मन:स्थितीत केलेल्या कामाचा परिणाम साऱ्या चित्रपटावर झाल्याचं तो पाहील, तेव्हा तो कशाला असल्या मागण्या करील ? फायनान्स वेळेवर आणि पुरा झालेला चित्रपट दर्जानेही चांगला बनेल. तो वेळच्या वेळी प्रकाशित होईल. उशिरा प्रकाशित होण्याचे कोणतेही दुष्परिणाम आपोआप टळतील. उत्तम चित्रपट देखील केवळ वेळच्या वेळी प्रकाशित न झाल्यानं मार खातो, हा अनुभव नवा नाही...'

आपले विचार स्वप्नवादात मोडणारे, आदर्श म्हणून आचरणात आणायला कठीण मानले जातील याची फणी मुजुमदारांना कल्पना आहे. ते पुढे सांगतात : 'माझे विचार अतिरेकी आहेत हे मी अमान्य करीत नाही. क्लिओपात्राचं नाक थोडं कमी लांब असतं तर सारा इतिहास बदलला असता, असं मानणाऱ्यापैकीच आहे हे. मला कल्पना आहे त्याची. फक्त नटनटीच सिनेमातल्या दोषांना वा चित्रव्यवसायाच्या नुकसानीला कारण असतात, असं माझं बिलकुल म्हणणं नाही; पण कधीकधी छोट्या छोट्या गोष्टीच क्रांती घडवून आणतात असं इतिहास सप्रमाण सांगतो. त्यावर विश्वास ठेवून, नटनटींसह आपण सगळ्यांनी वक्तशीर व्हायला काय हरकत आहे ?'

चित्रसृष्टी हे वक्तशीरपणाचं पथ्य पाळायला तयार आहे, की पेन्शनर म्हाताऱ्याचे शब्द सुज्ञपणे कानामागे टाकील ?... ■

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर